१. तिच्या विना ........................................................ ३
२. संपत्ति दुपारची साऊली ........................................ ६
३. प्रायव्हसी .......................................................... ८
४. निकालानंतरच्या हळुवार क्षणी ................................ ११
५. स्वतःच्या हातानं पायावर धोंडा ................................ १३
६. न जुळलेले गुण ................................................... १५
७. मी - माझं - माझ्यापुरता... ........................................ १७
८. रात्रशाळेतील प्रकाशयात्री ........................................ १९
९. जावयाची सासू ..................................................... २१
१०. अश्रूंचं मोल ........................................................ २३
११. दिल्या घरी... ....................................................... २५
१२. जखमी मनांच्या बेटावर ........................................... २७
१३. चौकशी सम्राट ..................................................... २९
१४. बळ-एकमेकांच्या पंखांचं! ........................................ ३२
१५. चाहूलवाटा - उद्ध्वस्त भविष्याच्या! ............................ ३४
१६. धग-कोवळ्या कुतूहलातील! ....................................... ३६
१७. नास्तिकतेचं कर्मकांड ............................................. ४०
१८. मनाचं व्यवस्थापन ................................................. ४२
१९. रवींद्रनाथांच्या मनातील शाळा .................................. ४४
२०. अविवाहितः समंजस आणि असमंजस ............................ ४६
२१. खरा दागिना ......................................................... ४८
२२. गोष्ट :धागा तुटल्या पतंगाची! .................................. ५०
२३. प्रवासातली पथ्यं .................................................. ५२
२४. अशीही एक यशोदा ! .............................................. ५४
२५. सावलीची चव ....................................................... ५६
२६. व्वा !! ................................................................ ५८
२७. बंदुकीवरचं फुलपाखरू ........................................... ६०
२८. थेंबातलं आभाळ ................................................... ६२
२९. दानत .................................................................. ६४
३०. महाशंख .............................................................. ६७

३१. सौजन्याची ऐशीतैशी ........................................७०
३२. शिक्षकाची इयत्ता..............................................७३
३३. इच्छेचं अंतर ...................................................७५
३४. घरात मी वनवासी .............................................७७

# १. तिच्या विना

एकाच घरातील दोन व्यक्तींची पत्रं. एकमेकांना कल्पना नसलेली. एका पत्रात मनातल्या चाहुलींना निर्धाराचं बळ मिळाल्याचा आनंद, तर दुसऱ्या पत्रात संयत शब्दांत तिरमिरीचे ताशेरे.

दोन्ही पत्रं एकावर एक ठेवून पुन्हा पुन्हा वर—खाली करत कितीतरी वेळ बघतोय. उत्तर तर लिहायचंय, पण काय लिहायचं? दोघंही माझी दोन्ही पत्रं वाचणार... उत्तर म्हणून लिहिलेली. त्या उत्तरानं आणखी प्रश्न निर्माण व्हायला नकोत.

दोन वेगळे सूर; पण आपल्या सुराशी प्रामाणिक. एक ज्येष्ठवयीन वडील, एक अठ्ठाविशीचा त्यांचा मुलगा. वडील लिहितात— 'सुगंध' दिवाळी अंकातील तुमची कथा वाचली— 'सातवा ऋतू.' गेले अनेक महिने मी याच संभ्रमात होतो. आता संभ्रम संपला. ठरवलं— लग्न करायचं. बायकोच्या निधनानंतर एकुलत्या एका मुलाला तळहातावरच्या फोडासारखं वाढवलं. आता तो शिकून, इंजिनीयर होऊन स्वावलंबी झाला आहे. सारं आयुष्य मी नोकरीच्या वेळानंतर मुलाची आई होऊन त्याचं सगळं केलं. आता माझं काम त्याच्या स्वावलंबनानं संपवलंय. घरात मी एकटा पडलोय. रवीचा सगळा वेळ मित्रांमध्ये, व्यवसायात, घरी संगणकाजवळ जातो. बाबांची विचारपूस करण्याइतकीही त्याला फुरसत नाही. माझी प्रकृती अजून ठणठणीत आहे. मुलाचं लग्न झालं की तो बहुधा वेगळा होईल. त्याचा तसाच स्वभाव आहे. मीही संघर्षात ऊर्जा घालवत नाही. पण आता सोबतीची गरज जाणवते. संसारात रंग भरतानाच डाव सोडून अनुपमा निघून गेली. तेव्हा जगायचं एकच कारण घरात बागडत होतं— रवी! आता जगायचं कशाला? हे विचार येतात. तुमच्या कथेतील व्यक्तिरेखेप्रमाणेच माझी मनःस्थिती आहे. आता लग्न ही माझी केवळ मानसिक... केवळ मानसिक गरज आहे. एखादी माझ्याच वयाची निराधार, पण माझ्या स्वभाव—प्रकृतीशी जुळणारी साथीदार मिळाली तर मी लग्न करणार आहे. मनातला डळमळीत विचार तुमच्या कथेमुळे पक्का झाला. आभार!'

कथेची बीजं नक्कीच उकळत्या वास्तवातून रटरटून आलेली असतात. पण वाचक लेखकाच्या शब्दांवर इतका आदिम विश्वास टाकतात! त्याला आपल्या काळजात एक कोपरा देतात! न भेटता एवढा दोस्त मानतात! डोळे भरून आले.

दुसरं पत्र त्यांच्या मुलाचं. भाषा त्याच्या वयाची. तापट, तिरसट. पण त्याचीही पंचाईत, घुसमट सांगणारी; म्हणूनच अवमानकारक न वाटणारी. रवीचं पत्र मला उजळून गेलं. 'सर, तुम्ही लेखक घरात बसून लिहिता, पण आमच्या घरात केवढा गोंधळ घालता! तुम्ही कथा लिहिली हो! पण त्या कथेमुळे आम्हा बाप—लेकांमध्ये लावून दिलीत भांडणं! आता साठीत बाबांना लग्न करावंसं वाटू लागलंय. त्यांना लाख वाटेल; पण हे काय लग्नाचं वय आहे? माझं लग्न ठरलेलं आहे; पण व्हायचंय अजून. तिच्या घरच्यांना काय वाटेल? मित्र, शेजारी काय म्हणतील? कृपया, पुन्हा अशा कथा लिहू नका. लोकांची बरी चाललेली घरं— बरी राहू द्या. अहो, बाबा सारखी 'ही कथा वाच' सांगताहेत. त्यांना जे सांगायला भीती वाटत होती, ते सगळंच तुम्ही क्लीअर केलंय. केवढा गोंधळ!'

पत्राकडे पाहून हसू आलं. स्वतःशीच! एकच कथा, एकच व्यक्तिरेखा... टेबलाच्या दोन बाजूंनी वेगळ्या डोळ्यांनी पाहिली की परिमाण बदलतं.

केवळ दोन—अडीच वर्षं संसार करून जन्मभर पत्नीविना आयुष्य व्यतित केलेला विधुर! कर्तव्यात कुठंही कसूर न करता भावभावनांची सांगड मुलाच्या विकासात घालणारं मन आता सोबत शोधतंय! त्या सोबत शोधण्यात विवेक आहे. संवाद आहे. मृत्यूची भीती नाही, पण मृत्यूची ओढही नाही. सगळ्यांनाच काही समाजकार्याचा छंद, पुस्तकं—नाटकांत रंगविल्याप्रमाणे आदर्शवादी एकटं जगणं जमणारं नसतं. संगतीचा विरंगुळा नसेल तर जगण्याचं बळ खचणारेच अधिक असतात. हे असं असणंही आपण मान्य करायला हवं. म्हणूनच पत्रातल्या साठीच्या विधुराचं मनोगत योग्य वाटतं.

त्यांच्या अठ्ठाविशीच्या मुलाचंही कुठं चूक आहे? त्याला अशा एकाकीपणाचा कल्पनेतही परिचय नाही. अधिक व्यापात गुंतल्याने जीवनात अशी काही पोकळी असते, हे सत्य त्याला पचूच शकत नाही. समाज, मित्र, नातेवाईक यांच्या प्रतिक्रियांच्या ओझ्याखाली दबलेल्या त्या मुलाला बाबांचं लग्न हा केवळ वेडेपणा वाटतोय. 'तुम्हाला एकटं वाटणारच नाही बाबा. माझं लग्न झालं तरी घर आपल्या तिघांचंच राहील. तुम्ही मला रक्ताचं पाणी करून कसं वाढवलंय. मनात आणलं असतं तर तुम्ही तेव्हाच लग्न करून मला दुसरी आई आणू शकला असतात. नातेवाईकांनी तेव्हा तुमच्यावर लग्नाचा केवढा दबाव आणला असेल! पण तुम्ही तो न मानता फक्त मला घडवलंत. मी पुढे कसा वागेन, तुम्हाला एकटं जगावं लागेल— ही भीती नका बाळगू,' असं वडिलांचे हात धरून, त्यांना मायेनं थोपटून दिलासा देण्याइतका खराखुरा समंजस भाव या मुलात नाही. त्यामुळेच वडिलांचा लग्नाचा विचार तो त्याच्या चष्म्यातून पाहतोय. कधीतरी दुसऱ्याकडे त्याच्या चष्म्यातून पाहायला शिकायला हवं. आपले प्रामाणिक वाटणारे आग्रह किती अन्यायकारक असतात, आपल्या दुराग्रही ममतेत केवढी हिंसा दडलेली असते, हे मग कळेल. आपल्या गतिमान व्यग्रतेत दुसऱ्याच्या पोकळीचा ठाव लागत नाही, हेच खरं.

३५—४० वर्षांच्या एकरूप सहजीवनानंतर कुणाचं तरी एकटं राहणं, हा त्या आयुष्याचाच दंश आहे. बोरकरांची ओळ आठवते. प्रिय पत्नीला ते म्हणतात, 'खरंच माझ्या आधी गेलीस, तर मग माझी कशी गती?' या सवालात केवढं आर्त आहे! नात्याचा केवढा एकजीव सुगंध आहे!

परवा डॉ. पूणपात्रेंबद्दलचं वृत्त वाचलं. चाळीसगावातलं त्यांचं सहजीवन माझ्या ह्रदयात घर करणारं ठरलं होतं. पत्नीच्या अस्थिविसर्जनाच्या वेळीच मनावरच्या ताणानं डॉ. पूर्णपात्रेंना विकल करणारा झटका आला. सिंहिणीचा सांभाळ करणारा हा शूर माणूस! पण प्रिय पत्नीच्या चिरविरहानं शिणला. सहजीवनातले सूरच आपल्याला नव्या नव्या स्वप्नांकडे नेतात. आपण एखाद्यावर केवढे विसंबून असतो, हे ती व्यक्ती हयात असताना कळत नाही. सोबत असली की पुष्कळदा सोबतीची गरज वाटत नाही. पण ती सुटली की वाटतं— एवढ्या गर्दीतही आपण केवढे एकटे आहोत!

अर्थात अशा एकाकीपणावर 'लग्न' हाच एकमेव उपाय नाही. त्यातही उतारवयात प्रगल्भ सूर नाही मिळाले, तर नसत्या गुंत्याचीच शक्यता अधिक! पैशाचं प्लॅनिंग जसं आपण जागरूकतेनं करतो, तसं कार्यव्यग्र असतानाही मोकळ्या वेळेचं प्लॅनिंग आपण करतो का? गर्दी हे तारुण्यातलं, यशातलं, वलयातलं सत्य असेल, तर उपेक्षा, एकाकीपण हे संध्याकालातलं सत्य असू शकतं. कौटुंबिक जीवनापलिकडेही एक जग आहे, हे माहीत करून घेण्याचीच कित्येकांना गरज वाटत नाही. नोकरी— घर— भाजीपाला— मासळीबाजार— घरगुती उखाळ्या—पाखाळ्या— पत्ते—रमी— क्वचित मद्य, नातेवाईकांकडे येणं—जाणं... यातच बरेचजण एवढे गुंतलेले असतात, की पत्नीनंतर हे सर्व हरवल्यासारखं वाटून नंतर वेळ घालवायला साधनच उरत नाही. एकटी स्त्री मुलाच्या संसारात समरस होऊन घरगुती कामात जीव रमवू शकते. पण एकटा, छंदशून्य पुरुष विकल होतो. दुबळा होतो.

हे दुबळेपण मनातून काढून टाकायला हवं. नियतीनं मांडलेलं सत्य स्वीकारून सामाजिक भावजीवनाशी तार जुळवायला हवी. 'ती असती तर...' चे उसासे दूर ठेवून आपल्या निरोगी, प्रगल्भ ज्येष्ठत्वाची सोबत अनेकांना द्यायला हवी. समाजात आज असंख्य ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्थांना आपलं योगदान देत आहेत.

'फ्रेश' मोरे हे एक मला भावलेलं व्यक्तिमत्त्व आहे. नुकतेच ते निवृत्त झाले तेव्हा कळलं— मोरे अठ्ठावन्न वर्षांचे आहेत! इतका आनंदी माणूस पत्नीमागे तीन मुलांना वाढवतो आहे, हे कळलं तेव्हा मी अस्वस्थ झालो. पण मोरे आनंदातच! मुलं आता तरुण झाली. निवृत्तीच्या समारंभात मोरे म्हणाले, 'मुलांना प्राणपणानं वाढवलं. पत्नीला दिलेला शब्द पूर्ण केला. मुलं मोठी झाली, पण मी एकटा नाही. जमीन घेतली आहे. तेथे चार आंब्या—काजूची, नारळाची झाडं लावली आहेत. तिथंच पर्णकुटी बांधलीय. पालेभाज्या लावणार आहे. आता सर्व ध्यान मी मळ्याकडे देणार! मुलं वाढवली, आता झाडं फुलवणार! एकटा कुठंय मी? आता हेच माझं सर्वस्व.'

प्रत्येकाचा मळा वेगळा! कुणाचा झाडापानांचा! कुणाचा वनवासी कल्याण आश्रमाचा! कुणाचा रामदासस्वामींच्या दासबोध—प्रसाराचा! कुणाचा वृद्धाश्रमातील एकाकी मनांशी मैत्री करण्याचा! कुणाचा अनाथालयातल्या चिमण्या जीवांना खेळवण्याचा! असंख्य मळे भोवती आहेत! माती वाट पाहते आहे— फुलवणाऱ्या स्पर्शाची! हेही एक सहजीवन असतं. अतूट! चिरंतन!

## २. संपत्ति दुपारची साऊली

जेवायला आम्ही दोघंच होतो. पण केलेला स्वयंपाक पाहून मी अभावितपणे विचारलं, 'अजून कुणी येणार आहेत का?'

'नाही. कुणी नाही.'

जवळजवळ बारा—पंधरा माणसांचा भात, मोठ्या पातेल्यात तेवढीच आमटी, वीस—बावीस पापड, कढईभर भाजी... हे सगळं निश्चितच उरणार होतं. दोन—तीन दिवस फ्रीजमध्ये ठेवून पुनः पुन्हा गरम करून खाण्याचा उपद्व्याप त्या घरच्या बाईला करावा लागणार होता. आणि यातच त्या 'गरीब' घराच्या 'गरिबी'चं रहस्य होतं.

निघताना रिक्षात आम्ही दोघंही वेगवेगळ्या कारणांनी गप्प होतो. माझ्या गप्प बसण्यातली अस्वस्थता हेरून तिनं म्हटलं, 'किती वर्षं राहताहेत ते या झोपडपट्टीत?'

'मी तरी पंचवीस वर्षं पाहतोय.'

'कंपनीत तर चांगल्या आहेत! पंधरा—वीस हजार पगार असणार—' 'जास्तच.'

'तरीही?'

'सगळे संपतात— पाहुण्यांच्या सरबराईत.'

वसंतरावांचं बोलणं आठवलं— 'आपल्याला पाहुणे आवडतात. मुंबईत कुणी आलं की आमच्याच घरात त्यांनी उतरावं हा आमचा हट्ट असतो. लोकांनी खूप खाल्लं, पोटभरून ढेकर दिला की आम्हाला बरं वाटतं. आमच्याकडे एक—दोन दिवसाआड सात—आठ पाहुणे असतातच.'

'अहो, पण मग तुमची नयन एसेस्सीला आहे. ती अभ्यास कुठं करते? तुमच्या आजारी वृद्ध आईची झोपण्याची व्यवस्था?'

वसंतरावांनी माझं म्हणणं निकालात काढलं. 'नयनच्या एसेस्सीचं कसलं टेन्शन? ती जाते मैत्रिणीकडे. आईचं काय एवढं? आईला ठेवतो आम्ही व्हरांड्यात.'

व्हरांडा? उंबरठा नामक आडव्या फळीला लागूनच एक किरकिरणारं गटार. त्या गटारावरच खाट टाकून गोधडीत दिसेनाशी झालेली विकल आजीबाई. लगेच समोरच्या झोपडीचा दरवाजा.

'वसंतराव, गेली अनेक वर्षं...'

'इथंच आवडतं आम्हाला. तुमच्या त्या ब्लॉक सिस्टिममध्ये काही मजा नाही.'

'मजा नसेल, पण वाढणारं कुटुंब... अपुरी जागा...'

'होत जाते हो जागा! शिवाय जागा घ्यायची तरी दहा—बारा लाख पाहिजेत. आणायचे कुठून? बँकेत एक खडकू नाही.'

वसंतरावांचा स्वभाव मला माहीत होता. बायकोही त्यांना अगदी अनुरूप मिळाली होती. एरव्ही वर्षानुवर्षं ज्या नातेवाईकांचा काडीचा संबंध नाही, त्यांच्यासाठी शेकडो रुपये खाण्या—पिण्यात उधळत राहायचं, न् जाताना वसंतरावांनीच मागवलेलं मसालापान चघळत, 'खरंच, केवढं करता तुम्ही आदरातिथ्य!' अशा वाक्यानं धन्य व्हायचं, ही दोघांची 'मजबुरी' झाली होती. त्यात खरंच कसली अपेक्षा नाही, स्वार्थ नाही. सर्वांसाठी भरपूर खर्च करावा... सगळे पैसे संपून उधारीवर सामान आणावं लागलं तरी त्यात त्या दोघांना काहीही वावगं वाटत नसे. अन्न उरलं तरी चालेल; पानात भरपूर टाकल्याशिवाय समोरचा माणूस पोटभर जेवलाच नाही, असा सणसणून आग्रह करणं ही त्यांची जुनी सवय होती.

म्हणूनच त्यांच्या झोपडीला फार तर चार दिवाळ्यांनंतर एकदा रंग चढे. मोठ्या हट्टानं गरिबी त्यांनी पकडून ठेवली होती. नयनचं बारसं तिथंच झालं. रवीची मुंज तिथंच झाली. आता दोघांची लग्नंही तिथंच होणार. आजीबाई फार तर आपली जागा मोकळी करून देतील. पण भरपूर पगार अन् प्रचंड बोनस मिळणारे वसंतराव निग्रहपूर्वक स्वीकारलेल्या त्या दारिद्र्यातच म्हातारे होणार! न् पुढे म्हणणार— 'सगळे पोटभर खाऊन—पिऊन ढेकर देऊन

गेले. आता कुणीही मदतीला येत नाही. चार पैसे नयनच्या लग्नासाठी मागितले तर म्हणतात— ‘सॉरी वसंतराव, आठ दिवसांपूर्वी आला असतात तर…‘

उधळपट्टीचं तत्त्वज्ञान करणारा एक ‘दिलदार‘ म्हणवणारा पांढरपेशा वर्ग आपल्या समाजात आहे. आहेर एकशे एक करणे योग्य असेल तरी ‘पाकीट उघडल्यावर काय म्हणतील ते ? वाईट दिसतं. टाका पाचशे एक.‘ पाहुणी म्हणून भाची वा पुतणी राहायला आलेय सुट्टीत. कौतुक म्हणून तिला वर्षभराच्या वह्या, ड्रॉईंगचं साहित्य, पाठ्यपुस्तकं, दप्तर घ्यायला हरकत नाही; पण घरी गेल्यावर बहीण किंवा वहिनी काय म्हणेल ? म्हणून घ्या तिला चांगला सोळाशेचा ड्रेस! प्रतिष्ठेच्या या भोंगळ हव्यासाची बेरीज कित्येक हजार होते. पुष्कळदा हा खर्च कुणीतरी आपल्याला ‘ग्रेट‘ म्हणावं, या ध्यासापायीच केलेला असतो.

कंजूषपणा आणि अतिथीला पाणीही न देता हुसकणं— हे लाजिरवाणेपणाचं एक टोक; तर बेसुमार आतिथ्यानं अतिथीला पार दमवून टाकणं— हेही दुसरं टोकच.

गणपतीच्या दिवसांत गौरी—पूजेला किंवा एखाद्या घरगुती मंगलकार्यात केलेला स्वयंपाक भरमसाठ फुकट जातो. अन्न अजिबात पुरेसं न होता पातेलं खडखड वाजणं, हा अंदाज जसा चुकीचा, तसंच पातेलंच्या पातेलं उकिरड्यावर टाकावं लागणं— हेही गृहिणीला अंदाज नसल्याचंच लक्षण!

कष्टानं मिळवलेला पैसा भविष्याच्या आधारासाठी सांभाळून ठेवण्यासाठी त्याहून अधिक कष्ट लागतात. नोटा गरजेहून अधिक झाल्या की खिशातल्या खिशात त्या थैमान घालतात. केव्हा एकदा या खिशातून समोरच्या दुकानात, हॉटेलात, मनोरंजनात, दागदागिन्यांत जाऊन पडतोय असं त्या नोटांना होऊन जातं. त्या नोटांना वठणीवर आणून, योग्य त्या वेळी, योग्य त्या कारणासाठीच त्या बाहेर याव्यात, यासाठी गृहस्थ—गृहिणींनी दक्षच राहावं लागतं. अचानक उद्‌भवणारी आजारपणं, मंगलकार्य, वार्धक्य यासाठी पैसाही उपयोगी असतो. पैसाच नसेल तर घटना आहेत त्याहून विकल होतात. लाख रुपये जवळ असतील तर लोक तुम्हाला दहा हजार उसने देतील. पण एकही पैसा नसेल, तर शंभर रुपयेही द्यायला कचरतील— ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

चुका होतात. तुमच्या—माझ्याकडून, सर्वांकडून होतात. बिनचूक कोण आहे ? पण त्याच त्या चुका पंचवीस वर्षं करणारे, ‘दिलदार‘ म्हणविणारे, पण उधळे वसंतराव हे भविष्यात महामूर्खच ठरतात. पंचवीस साड्या आहेत, तरीही पन्नास साड्या अजून हव्यात; दहा पँटी आहेत, तरीही अजून पंचवीसएक हव्यात; दोन सेंटच्या कुप्या आहेत, पण अजून आठ—दहा ‘फ्लेवर‘ हवेत; सारखे बदलते दागिने, बदलती फर्निचर्स, घराची ही भिंत फोड, तिथं जोड, पुन्हा वर्षभरानं ती तोड— पुन्हा नवीन ठिकाणी जोड, हा ओटा फोडला, वाढवला, आता पुन्हा तोडला… घरात दिवसाआड पार्ट्या चालू आहेत. ‘व्वा! व्वा! दिलदार दोस्त!‘ म्हणत कारपर्यंत ड्रायव्हरच्या मदतीनं बसत आहेत. हास्याची पोकळ रंगकारंजी उडत आहेत. ‘अगले संडे‘ म्हणत पुन्हा पार्टी ठरत आहे. दिवस असे निघून जातात. समर्थांनी म्हटलंय— ‘संपत्ति दुपारची साऊली.‘ पुढं म्हटलंय— ‘वयसा तरि निघोन गेली.‘ दुपारची सावली आपल्याहून लांब वाटते, पण लवकरच संध्याकाळ होताच ती निघून जाते. पुढं फक्त काळोख…

त्या काळोखाआधीच हे स्नेहनिरांजन!

# ३. प्रायव्हसी

कार्यक्रम जवळजवळ ठरत आलेला असतो. बोलणं अखेरच्या टप्प्यात असतं. मी म्हणतो, ‘उतरण्याची सोय कुणाच्याही घरी नको. स्वतंत्र लॉजमध्ये करा.‘

फोनवर पुढचे दोन क्षण विरामाचे. याक्षणी पलीकडलं मन काय विचार करीत असणार, ते मी अनुभवाने जाणतो. अपेक्षित संवाद सुरू होतो—‘अहो, पण आमचा प्रशस्त बंगला आहे. स्वतंत्र खोली आहे तुमच्यासाठी. तुम्ही आमच्या घरात उतरावं, थांबावं अशी आमची मनापासून इच्छा आहे.‘

‘कबूल. मी दुपारचा चहा तुमच्याबरोबर घेईन. पण स्वतंत्र खोलीच बुक् करा. कार्यक्रमाआधी प्रायव्हसी हवी असते.‘

विराम गूढ होत गेला.

कार्यक्रमाआधी प्रायव्हसी? आपला एवढा स्वतंत्र बंगला असताना या गृहस्थाला लॉजची ओढ का? एरव्ही लेखनातून साधा वाटणारा हा गृहस्थ प्रत्यक्षात वस्ताद दिसतोय! ‘प्रायव्हसी‘ हवी म्हणजे काय?... पलीकडल्याची अशी अनेक अप्रगट प्रश्नचिन्हं परिचित झाली आहेत. पण ती सर्व भेदून जमेल तितक्या स्पष्टपणे मी स्वतंत्र निवासाची अट सांगतोच. कार्यक्रम—भ्रमंतीत कार्यक्रमापूर्वी पुरेसा निवांतपणा देणारीही घरं मिळाली, हे खरं. त्यांचं आतिथ्य, आपुलकी, मनाला पुरेसा खासगीपणा देणारं प्रगल्भ अंतर मी अनुभवलेलंही आहे. पण नेहमीच असं घडत नाही. मग सारं बिघडत जातं. ज्यासाठी धडपडून जिवाच्या आकांतानं चार—पाचशे किलोमीटर प्रवास केला, ती धडपड वाया जाते. समोरच्या श्रोत्यांपेक्षा आपल्या आतला श्रोता आपल्याला ‘व्वा‘ म्हणत नाही, तोपर्यंत बाहेरच्या बडबडीला काही अर्थ उरत नाही.

अशीच एक सोसलेली घटना. कार्यक्रम संध्याकाळी पाचचा. रात्रभर प्रवास करून मी पहाटे सहाला कार्यक्रमाच्या गावी पोहोचलेला. स्वागत, चहामध्येच साडेसात—आठ वाजतात. बंगल्यातल्या वेगळ्या खोलीत माझी बॅग लगबगीनं नेणारा नोकर. ‘आता आराम करा,‘ असं सांगून गेलेल्या समजूतदार संयोजिकाबाई.

नव्या खोलीशी, तिथल्या वस्तूंशी जरा परिचय होऊन डोळा लागतो— न लागतो तोच कडी ठणठणते. आपण आतून कडी लावायलाच विसरलो हे कळतं. कारण दरवाजा अर्धवट उघडून मिसेस धुरी सस्मित डोकावतात.

‘डिस्टर्ब तर नाय नं केलं?‘ सांगणार कसं? डिस्टर्ब तर झालेलो असतोच. शिताफीने कपाटाच्या हँडलला अडकवलेला शर्ट दोन्ही हातांत अडकवतो. ‘याऽऽ‘ म्हणत बटणं आणि काजं यांचा संवाद जुळवण्याचा प्रयत्न करतो.

‘या मिसेस सोनार...‘ अरे बापरे! कुणीतरी एक मिसेस सोनार नामक पार्टटाईम ब्युटिपार्लर चालवीत असावी अशी भगिनी येते. ‘नमस्कार!‘

‘आणि— ये, गं ये. भारी संकोची. आशू कुठाय? ही अश्विनी. इथल्या स्थानिक पेपरात कॉलम चालवते. ‘संवादु चंद्रतारुल्यांचा.‘ त्यात तुमचा इंटरव्ह्यू घेणाराय्. म्हटलं— गोल्डन अपॉर्च्युनिटी आहे. आमच्याकडे आहेत, सांगितलं. केव्हा येऊ दे हिला?‘

समोर तर होती! मी तरीही सौजन्याची कळा थोपवीत विचारतो— ‘प्रश्न तयार आहेत का?‘

‘तुम्हीच द्यायचे. कालच करणार होते मी; पण रात्री पार्टी होती. म्हटलं— तुम्हीच प्रश्न सांगा. ते बरं पडतं. आय मिन् तुमच्या मनातली उत्तरं.‘

‘करा. आराम करा. दुपारी दोन ठीक राहील?‘

‘दोन?‘

बंगल्याच्या मालकीणबाई स्वतःच वेळ ठरवून निघतात. दार लावताना म्हणून जातात— ‘रात्रीचा प्रवास... ठाणे—अकोला. नॉट जोक! संध्याकाळी फ्रेश हवात तुम्ही. आमदारसाहेबही येतायत प्रोग्रॅमला.‘

बंगल्यातील सेपरेट गेस्टरूममध्ये मी सेपरेट आडवा व्हायचा प्रयत्न करतो. पुन्हा जड पापणी मिटताना बारा—तेरा पेपरवेट कपाळावर आदळावेत तसा फोन आदळतो. झोपेतल्या खर्जात मी फोन उचलतो—

'हॅलोऽऽ'
'हॅल्लो— मिसेस धुरी?'
'हं. बोल गं. अपर्णा नं? बोल— बोल. नाय गं. आता नको. दमलेत.'
'कुणी गं फोन घेतला? आवाज झोपेतला वाटला.'
'बोल. बोल गं. नीट ऐकू येत नाही. मध्ये दुसऱ्या कुणी—'
'ए, पंधराच मिनिटं त्यांची मिळवून दे ना! ए कसे आहेत गं... स्वभावानं गं?'
मी माझ्याबद्दल मिसेस धुरींचं मत ऐकण्यात निमग्न होतो.
एकच फोन. अनेक खोल्यांमध्ये कनेक्शन्स.
बाप रे! म्हणजे फोन घणघणत राहणार.
पुन्हा झोपण्याचा एक अर्धमिटला प्रयत्न. तेवढ्यात टक्‌टक्.
'अंकल, मे आय...?'
दरवाजा पुन्हा उघडाच ठेवला होता मी. तेरावी—चौदावीतला वाटावा असा मुलगा आत घुसलाच.
'सॉरी अंकल, नोटबुक इथंच राहिली काल. थँक्यू अंकल!'
माझा अनामिक पुतण्या खोलीत घुसतो काय्, जातो काय्! एव्हाना डोकं ठणकू लागलेलं असतं. जागरण. बाहेरचं रणरणतं ऊन. सकाळचा मोठ्ठ्या मगोबातला कडक चहा— अशी ॲसिडिटीची पूर्ण तयारी संयोजकांनी केलेली. पाचला वक्ता फ्रेश हवा. आमदारसाहेब यायचेत्! काय? एक वाजला? झोप नाहीच. क्षणभरही पाठ टेकत नाही. आंघोळ करावी. तेवढंच फ्रेश! बेल वाजते. दीडला मिसेस धुरी. 'साहेब फॅक्टरीतनं आलेत. पानं घेतलीत.' तीन जिने उतरून थेट डायनिंग टेबलवर उतरल्यासारखाच किचनमध्ये उतरतो. श्रीयुत धुरी म्हणजे मूर्तिमंत फॅक्टरी! त्या चेहऱ्याचा कुठल्या संगीत, नृत्य, शब्द, चित्र या कलांशी सात जन्मांत संबंध नसावा. पैशाची मग्रुरी. रासवट, घमेंडी चेहरा. मी उगीचच पापड मोडीत राहतो.
दोनला अश्विनीबेन हजर. साडेतीनपर्यंत माझ्याच प्रश्नांना माझीच उत्तरं. म्हटलं— आता कार्यक्रमाची तयारी करावी. मुद्दे काढावेत. टिपण चाळावं. डोळे मिटून मन एकाग्र करावं. पण हाय! पावणेचारला मिसेस धुरी अवजड बाड घेऊन.
'काय हे?'
'आल्बम. आमच्या नाटकांचे. पुन्हा कार्यक्रमानंतर तुमची धावपळ होणार म्हणून म्हटलं आताच दाखवावेत. हा— हा बघा— 'दिवा जळू दे', अन् हा 'लग्नाची बेडी'मधला. 'रश्मी' केली होती मी. बघा केवढी डिफरंट कॅरेक्टर्स— एकीत नऊवारी, अन् हा बेस्ट सपोर्टिंग ॲक्ट्रेससाठी—'
हुश्श! संपला एकदाचा! हृदयातला ठोका. घड्याळात— साडेचार! 'हा दुसरा. हा पटकन् बघा. अय्या. पाच वाजतच आले. हा आमच्या घरभरणीचा आल्बम. त्यात काही माझ्या मुलीच्या लग्नाचेही.' वाटलं— किंचाळावं मोठ्ठ्यानं. प्लीऽऽज. जा— जा. पाच मिनिटं तरी द्या रे फक्त एकट्याला. प्रायव्हसी हवी असते स्वतःशी बोलायला. स्वतःला वाचायला. तो तुकाराम रानात का पळून गेला ते कळतं आपल्याला. गावातच बसला असता तर एक अभंग तरी सुचू दिला असता की नाही, या गोंधळबाज आप्तस्वकीयांनी कुणास ठाऊक!
आपलीच जिवलग माणसं कित्येकदा आपल्याला नको असतात आणि आपणही त्यांना नको असतो. खासगीपणा ही अंतर्मनाचीच गरज आहे. छटा वेगळ्या. कितीतरी वेळ व्यवहारी डांबरी रस्त्यांवरून आपली भागदौड होत असते. थकतो आपण. मग वाटतं— विसावावं कुठंतरी. कुण्णी कुण्णी जवळ नको.
घरातले सगळे 'आपले'च असतात. ते आपुलकीने आपले राहण्यासाठी नात्यांनाही ऊर्जा द्यावी लागते. दुसऱ्याला आपण नकोसे होण्याइतके आदळत राहिलो की अकारणच तिडीक येते एकमेकांची. घरात, कचेरीत असं अनेकदा होतं. दुसऱ्याच्या खासगीपणात व्यर्थ ये—जा सुरू झाली की नातीही मांजरीच्या केकाटणाऱ्या पिल्लासारखी

रस्त्यावर सोडून द्यावीशी वाटतात. जवळ... खूप जवळ असूनही एकमेकांत अती न डोकावता चतुराईने कधी व्यवहाराची, कधी हृदयाची नाती जपता येतात.

'प्रायव्हसी' शब्दाभोवतीचं रोमॅन्टिक वलय हा एक भाग! पण सर्वांनाच 'प्रायव्हसी' हवी असते. आवडीच्या वाचनासाठी, आवडीचं गाणं मनाची तार जुळवून ऐकण्यासाठी वा कधी निव्वळ डोळे मिटून नुसतं पडून राहण्यासाठी. या चिंतनक्षणीच भविष्याची मिटली मूठ उघडते. सृजनगंधाने दरवळते. अशा क्षणीच कलावंतांना गावतात सशक्त बीजं. ज्यातून धुमारतात कलेतील महावृक्ष!

केवळ स्वतःत पूर्ण निःमग्न होण्याचा हा क्षण म्हणजे पुनर्जन्माचाच क्षण! पुन्हा नवे होण्याचा क्षण!

## ४. निकालानंतरच्या हळुवार क्षणी

'कमीत कमी नव्वद पर्सेंट मिळाले तरच घरात पाऊल टाक. अन्यथा फुटपाथ तुला मोकळा आहे...' रिझल्ट घ्यायला जाणाऱ्या विद्यार्थ्याला असा निरोप देणारे पालक वाढत आहेत. स्वप्न पाहणं आणि अपेक्षा बाळगणं हा मानवी स्वभाव आहे. त्यासाठीची पुरेशी तयारी करून घेण्यासाठी अवघं वर्ष असतं. पाठांतराची कसोटी घेणारी आजची तकलादू शिक्षणपद्धती आजच्या युवकाची जगण्याची कुवत परीक्षेतून आजमावते. इथंच सारा घोळ आहे. आणि तेवढे टक्के नाही मिळवले, तर त्याच्यावर ना-लायकीचा असा खोल शिक्का मारला जातो, की वेगळ्या व्यवसाय क्षेत्रात यशस्वी होणारा वृक्ष अंकुरातच खुडला जातो.

विद्यार्थी कुठल्याही वकुबाचा असो- निकालाच्या क्षणी त्याची मन:स्थिती नाजूक असते. अभ्यासच न केलेल्या- अगदी कोरा पेपर दिलेल्या मुलालाही असं वाटत राहतं की, काहीतरी चमत्कार होईल अन् आपण पास होऊ. उत्तरपत्रिका तपासताना अनेक शिक्षकांना उत्तराऐवजी अनेक प्रश्नांनाच सामोरे जावं लागतं. शिक्षणचिंतकांनी असे अनुभव शिक्षकांकडून मागविल्यास विद्यार्थ्यांची मानसिकता कळण्यास मदत होईल. एका उत्तरपत्रिकेवर परीक्षकाला फक्त एक विनंतीपत्र होतं- 'एकदा- फक्त एकदा संधी द्या. पासापुरते मार्कस् द्या. हात जोडतो. पाया पडतो.' अर्थशास्त्राच्या उत्तरपत्रिकेत बारावीचा वीर लिहून गेला होता- 'मला पास केलंत तर तुमच्या मुलाबाळांचं भलं होईल.' एकानं लिहिलं होतं- 'वडील तापट आहेत, पास झालो नाही तर घरच सोडायला सांगतील.'

अशा मुलांचीही निकालाच्या क्षणी मोठी हळवी अवस्था असते. सामान्य वकुबाची, परंतु रात्रंदिवस घोकंपट्टी केलेली मुलं- ४२ टक्क्यांचे यंदा ८२ टक्के होणार, हे स्वप्न पाहत असतात; तर ज्यांना पंच्याण्णवच्या खाली बघायची सवयच नसते, ते बोर्डात फक्त 'कितवा?' याची आतुरतेनं वाट पाहत असतात.

अपेक्षाभंग हेही एक आयुष्याचं रूप आहे, याची तीव्र जाणीव होणारं हे वळण असतं. 'शक्यच नाही. असं होणं शक्यच नाही. रीचेक करा,' इथपासून ते 'नुसता एरंड वाढलाय. सारखं क्रिकेट न् पिक्चर. म्हणून हे पंच्याऐंशी टक्के! आता घाला खेटे! मेडिकलबिडीकल विसरा- कंपाऊंडरचीही लायकी नाही...' या वाद-संवादांनी अपेक्षाभंगाचे तडे बोलू लागतात. ४० टक्के कुवतीच्या विद्यार्थ्याला ४२ मिळाले तरी सुटकेचा आनंद होतो. पण प्रश्नपत्रिकेवरच मार्कांच्या अपेक्षांची बेरीज ९७.८ वगैरे करणाऱ्या संवेदनक्षम मुलांना ९६.५ मिळाले तरी दरीत कोसळल्यासारखं वाटतं.

दहावी अन् बारावी या दोन इयत्तांच्या निकालाचं असं काही अवडंबर प्रसार माध्यमांनी माजवून ठेवलं आहे, की त्यामुळे निराशेचं विवर फारच खोल होतं. त्यात मुलांच्या भवितव्याची अखंड चिंता- हेच ज्यांचं वर्तमान अशा आई-बाबांनी वर्षभर आणि त्याही आधीच्या वर्षी काळजीचं जे काजळलेलं पर्यावरण घरात निर्माण केलेलं असतं, त्यामुळे मुलाला छापील गुणवत्तायादीला स्पर्श करण्याशिवाय पर्यायच नसतो. 'जिंकू किंवा मरू' अशा त्वेषानं मुलांना पाठवताना, 'जिंकून येता आलं नाही तर पुन्हा जिंकू, पुन्हा जिंकण्याचा ध्यास धरू,' असा दिलासा देण्याची गरज आहे. वर्षभर अभ्यासाची एकाग्रता इ. ठीक; पण नंतर येईल तो निकाल स्वीकारण्याची मानसिकता पालक आणि विद्यार्थ्यांची असली पाहिजे. 'गुणवत्तायादीत येणारच' या खात्रीने आधीच वातावरण निर्माण केलेल्या घरांमध्ये एखाद् दोन टक्क्यांनी गुणवत्तायादी हुकलेल्या मुलांची अवस्था दयनीय होते. काहींना इतकं 'डिप्रेशन' येतं की कित्येक दिवस ते घरातच कुढत बसतात. महाराष्ट्रात लाखो मुलं या परीक्षांना बसतात. त्यातली पहिली पन्नास 'गुणवान' आणि बाकीची...?

९४ टक्क्यांचा गुणवत्तायादीत समावेश, अन् ९३.९ चा यादीत अंतर्भाव नाही. अशा पाल्यांनी आणि त्यांच्या पालकांनी काही क्षण विकल होणं समजून घेतलं तरी तर्काला धरून नाही. पुढे कोणत्या गुणांनी तो चमकेल, नाव मिळवेल, ते ठरवण्याची हे टक्के म्हणजे अजिबात कसोटी नाही, हे समस्त पालकांनी ध्यानात घ्यायला हवं. जग स्पर्धेचं आहे. आपला पाल्य टक्क्यांच्या स्पर्धेत असावा, अन् त्यात जिंकला तरच त्याचं भवितव्य उत्तम असणार

आहे का? 'तुमचा मुलगा दहावी- बारावीला जाईल तेव्हा समजेल!' असं सांगणारे पालक आहेत. पण त्यामुळे प्रश्न सुटत नाही; निर्माण होतात.
हल्ली बरीच मुलं तशी सावधही असतात. इतके टक्के नाही मिळाले, तर कुठल्या कुठल्या कोर्सना प्रवेश मिळणार नाही, हे पालकांपेक्षा मुलांनाच जास्त माहीत असतं. पुष्कळदा रात्रंदिवस अभ्यास करून कधी अपेक्षित प्रश्नच येत नाहीत, कधी वेळ पुरत नाही, कधी अतिताणाने गोंधळ उडून ऐनवेळी उत्तराची मांडणी जमत नाही... अशा अनेक कारणांनी काही टक्क्यांनी खाली आलेल्या पाल्याशी निकालानंतर सौहार्दपूर्ण मैत्रीच करायला हवी. प्रयत्नपूर्वक जे पदरात पडलं आहे, त्याचा उत्सव करायला शिकायला हवं. कागदी उत्तरपत्रिकांवरील यशापयशाला किती महत्त्व द्यायचं, याचं तारतम्य आधी पालकांना- मग विद्यार्थ्यांना असायला हवं.
क्लासेसचा भडिमार, सततच्या पाठांतर-चक्रात, शेकडो प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या नादात अपुरं- अवेळी जेवण, व्यायामाचा अभाव, त्यामुळे आधीच गळ्याचे कंठमणी निघालेले दुबळे विद्यार्थी या अनपेक्षित अपयशानं नुसतेच खचत नाहीत, तर दुभंगतात. आणि पुढे प्रयत्नांची शक्यताच नाहीशी होते. मनोरुग्णालयांचे पत्ते शोधणं सुरू होतं. मेडिकल, इंजिनीअरिंग याव्यतिरिक्तही अभ्यासशाखा व्यवसाय मिळवून देऊ शकतात, याचं ज्ञान आणि भान असायला हवं. स्वप्न पाहणारे पालक असले, तरी ज्याचं आयुष्य त्यालाच जगायचं असतं. 'तुला कुठल्या क्षेत्रात करिअर करायला आवडेल?' हे आपुलकीनं विचारणारा संवाद व्हायला हवा. निकालानंतर पालकांची ही जागरुकता अनेक अनर्थ टाळू शकेल. राज कपूर, अमिताभ, गावस्कर, तेंडुलकर, लतादीदी, पं. हरिप्रसादजी, पं. शिवकुमार, बाबा आमटे, मेधा पाटकर ही श्रेष्ठ नावं शिक्षणातही बुद्धिमान असतील; पण गुणवत्तायादीत न आल्याने सर्वश्रेष्ठपदी जाण्यात त्यांना कुठलाही अडथळा आलेला नाही, हे सत्यही पालक व पाल्यांनी जाणून घ्यायला हवं.
त्याचबरोबर निकालानंतर आपल्या पालकांची मन:स्थिती मुलांनी समजून घ्यायला हवी. तन-मन-धनाची संपूर्ण ऊर्जा आपल्यामागे उभी करणारे आई-बाबा अनपेक्षित आघातानं रागवले तरी तेही स्वाभाविकच, हे समजण्याइतकं हे वय सुजाण असतं. अपेक्षित यशाचा आनंद साजरा करा; पण निकालानंतर नाही तेवढं यश मिळालं, तरी लगेच सर्वस्वाचा त्याग करण्याइतका हा भयानक गुन्हा नाही, हे हळव्या मुलांनी ध्यानात घ्यायला हवं. दहावीला साठ टक्के मिळालेला विद्यार्थी बारावीला पंच्याऐंशी मिळवतो- अशी अनेक उदाहरणं आहेत. बारावीनंतर कितीतरी विद्यार्थी स्वीकारलेल्या नव्या वाटेवर पूर्वीहून आत्मविश्वासानं चमकताना आपण पाहतो. काही क्षणांची ही उदासी झटकून ढगाळ आभाळ मोकळं करायला हवं. पुन्हा ध्यासाची मूठ घट्ट करायला हवी. आता तर कुठं जीवनाची कळी किंचित उमलू लागलेय. अजून खूप सुख-दुःखं झेलायची आहेत. परीक्षेतलं यश, अन् त्याहून अपयश साजरं करणं हा जगण्याचाच रियाज आहे.
आयुष्याच्या वाटचालीत निकाल पदोपदी लागत असतात. कधी इयत्तांच्या परीक्षांचे, कधी नोकरी-व्यवसायातल्या मुलाखतींचे, लग्नव्यवहारातल्या होकार-नकाराचे, अपत्यसंभवाचे, आजारपणातील वैद्यकीय अंदाजांचे, कलेच्या क्षेत्रातील नावलौकिकाचे, पारितोषिकाच्या जगातील न्याय-अन्यायाचे, पती-पत्नी, आई-वडील यांच्यातील नातेसंबंधांचे! सुख-दुःखाच्या असंख्य चढ-उतारांचे! हा एक रम्य खेळ आहे. तो खेळत आयुष्य जगायचं असतं. रडता रडताही हसायचं असतं!

# ५. स्वतःच्या हातानं पायावर धोंडा

मध्यमवर्गीय माणसाच्या सुखस्वप्नाची लांबी-रुंदी किती असते? या स्वप्नात असते बऱ्यापैकी साथसंगत... एक किंवा दोन मुलं. त्यातही एक मुलगा, एक मुलगी... आणि अर्थातच् दोन घास नियमानं देणारी नोकरी. बस्स! अगदी काहीही न करता सरळ जगलं तरी बारीकसारीक सुख-दुःखं झेलत व्यवस्थित आयुष्य संध्याछायेला भिडतं. पण हे सगळं मिळूनही ते स्वतःच्या पायानं लाथाडणारी काही कपाळकरंटी माणसं असतात. असा माणूस सारं घर पिचवून टाकतो. साध्या, गुणी बायकोची हाडं काढतो अन् मुलांच्या डोक्यावरचं छप्पर नाहीसं करतो. साऱ्या कुटुंबाची फरफट करतो. कुठून अशी अवदसा त्याला आठवते कुणास ठाऊक!

मोहननं असंच केलं. हेच कर्मदळीद्रीपण ओढवून घेतलं. सामान्य वकुबाचा, बिनव्यक्तिमत्त्वाचा हा माणूस! तो जन्माला येताना आकाशात कुठल्या ग्रहांचं संमेलन भरलं होतं कुणास ठाऊक! कल्पनासारखी कष्टाळू, आईविना वाढलेली, गुणी बायको त्याला मिळाली. त्याचे ग्रह जोरावरच असणार. रेमण्डमधील नोकरी त्याला होती. विशेष पात्रता नसताना सात-आठ हजारांची दर महिना आपोआप हाती येणारी आवक! चार वर्षांत झालेली दोन मुलं. एक मुलगा, एक मुलगी. आता या इसमानं धड वागून सरळ जगावं ना? काहीही आगळंवेगळं न करता चारचौघांसारखं सपाट वाटेवरनं आयुष्य गेलं असतं. शिफ्टप्रमाणे घरी यावं, जेवावं, झोपावं, कामावर जावं... इतकं जरी त्यानं केलं असतं तरी पुष्कळ झालं असतं. पण अपात्र माणसाच्या घरात शांती आणि लक्ष्मी फार वेळ रमत नाही. एके दिवशी मोहनला वाटलं-कामावरच जाऊ नये. भरीला एक पेग, अर्धा पेग करताना भिनणारी धुंदी. बरं, प्यायलेली उतरल्यावर तरी कामावर जावं! पण तेही नाही. त्यानं नोकरीवरच जाणं बंद केलं. साहेबांनी समजावलं. युनियन लीडर, कामगार मित्रांनीही. पण मोहनचा एकच निश्चय- कामावरच जायचं नाही. मग पगार कुठला? त्यात व्यसन पारंब्यांतून विस्तारतंच. अशी कंगाल मनं हे तर व्यसनांचं लाडकं घर. अजूनही बऱ्या घरातल्या सोशिक मुली अशा धटिंगण नवऱ्यांना सोसत राहतात. माहेरी क्लेश नकोत म्हणून नवऱ्याचा मारही गिळतात. बायकोची सभ्यता, सहनशीलता हीसुद्धा अशा उद्दाम नवरोबांना आणखी बोकाळायला मिळालेली संधीच ठरते. कल्पनानं तेच केलं. सहन- सहन- सहन केलं. एके दिवशी तुटलं अन् सारं घर विस्कटलं.

सर्वांनी पुन्हा घर सांधायचा प्रयत्न केला. कामावरून काढून टाकलेलं असूनही पुन्हा एकदा अखेरची संधी म्हणून मोहनला कामावर घेतलं गेलं. पण काहींना थडग्याचीच ओढ लागलेली असते. नष्ट होण्याची अन् बायका-मुलांनाही नष्ट करण्याचीच तहान लागलेली असते. पुन्हा पहिलेच पाढे!

मोहनची कंपनी म्हणजे रिकामटेकड्या भाकड गुरांना सांभाळणारा पांजरपोळ नव्हता. अनियमततेची हद्द झाली न् मग बसली पार्श्वभागावर लाथ! आता कुठं हिंडतोय कुणास ठाऊक! मुलांना शिकवून स्वाभिमानानं जगू शकली असती अशी गुणी, सोशिक कल्पना शाळेच्या समोर गाडीवर वडे तळतेय. मिरच्या वाटतेय. सरबतासाठी बर्फ किसतेय. हाताला चिरा पडून मिरच्यांनी हात झोंबताहेत. बर्फाने हात गोठतात. पण लहानग्यांकडे पाहून जीव तगवून धरतेय ती. दोन्ही मुलं बुद्धिमान आहेत. बाप हयात असूनही अनाथपण अनुभवताहेत.

असे अनेक मोहन समाजात वावरत आहेत. केव्हाही बघावं- दुपारी गादीवर लोळत पडलेत. आज काय-कंटाळा आला, उद्या काय- अंगं दुखतंय. परवा काय- जावंसंच वाटत नाही. आपल्या किती रजा शिल्लक आहेत, 'विदाऊट पे'चं प्रमाण फार वाढलं तर काय परिणाम होईल, नशिबानं मिळालेली नोकरी गाफीलपणानं गेली तर आपली काय अवस्था होईल, याचा विचार न करणारे हे मोहन सारं आयुष्यच ढेपाळून टाकतात.

कुणी एखादी धारदार युवती म्हणेल- कल्पनानं बंड करायचं. कशाला असा ढिसाळ नवरा सहन करायचा? सगळ्याच स्त्रियांवर काही असे आक्रमक संस्कार नसतात. दुबळे, सामान्य माहेर, नोकरी-व्यवसाय नसल्याने आलेली आर्थिक अपंगता अनेक स्त्रियांच्या ओठांना चिकटपट्टी लावते. चीत्कार घुसमटले जातात.

नोकरी असून बेफिकीरपणे ती गमावून बायका-मुलांना वाऱ्यावर सोडणाऱ्यांचा एक प्रकार, तर दुसरा प्रकार विलक्षण मग्रुरीनं नोकरी करणाऱ्यांचा! कुठली घमेंड अशांजवळ असते, अन् ती का असते, याचा पत्ता लागत नाही. शर्टाची

चार बटणं काढून उंडगेगिरी करणाऱ्यांप्रमाणेच नोकरी- व्यवसायात ते वावरतात. वेळ पाळणाऱ्या, टेबलावरचं काम एकाग्रपणे करणाऱ्या सहकाऱ्यांकडे ते अशा नजरेनं बघतात! 'काय मूर्ख आहेत! आम्ही बघा!' सतत थापा... खोटी मेडिकल सर्टिफिकेट्स हेच यांचे उद्योग. कामावर न येता खोट्या सह्या करणं- हाच यांचा पुरुषार्थ. अशानं इतरांचं नंतर, आधी आपण स्वतःचंच नुकसान करतो. दुसऱ्यांना फसवल्याचा किडलेला आनंद घेता घेता आपण ढिसाळ होतो.

अशीही अनेक माणसं आपण बघतो- जी असतील सामान्य, एकसुरी; पण स्वतःच्या मर्यादा ओळखून ती आपला छोटासा चौकोन सुरेख सजवतात. अगदी दहा ते सहा नोकरी, टीव्ही, जेवण, झोप... इतकं ढोबळ वेळापत्रक असेल त्यांचं; पण निदान ते तरी ते व्यवस्थित पाळतात. इतरांसाठी ते काही करू शकत नसतील, पण निदान त्यांच्यासाठी तरी नातेवाईकांना मदतफंड काढावा लागत नाही. त्यांना नसेल प्रवासाचा, नाटकाचा, वाचनाचा, संगीताचा आनंद घेण्याचा छंद. अगदी इतरजण त्यांना कोषातले किडे म्हणत असतील. म्हणू द्या. पण निदान आपल्या कोषात ते सुखी असतात. त्यांना संवेदनक्षम माणसांचं सुखही नसेल, दुःखही नसेल, पण नेमून दिलेलं सरळ जगणं हीसुद्धा एक जीवनशैली असू शकते. काय वाट्टेल ते होवो- त्यात ते बदल करत नाहीत. लोकलमध्ये बसून ठरलेल्या ठिकाणी उतरावं तसे ते निवृत्त होतात. मुलीचं लग्न वेळेवर करतात. मुलाला स्वतःच्या पायावर उभं राहण्याइतपत शिकवतात. नातवंडं झाली की त्यांना खेळवतात. फिरवतात. अशा मंडळींची हेटाळणी करण्याचा... 'हॅ! काय जगायत् किड्यांसारखे?' म्हणायचा आपल्याला अधिकार नाही. कारण ही माणसं आपल्याकडे दोन पैसे उसने मागत नाहीत. त्यांचं ते सरळ जगताहेत.

पण मोहनसारखी माणसं सगळं लाभूनही हा सरळपणा संपवतात. घर विस्कटतात. अनियमितपणाच्या व्यसनापायी एक दिवस नोकरी सुटतेच. कित्येक गरजू तरुण-तरुणींना नोकरी नाही. चार पैसे नियमानं मिळाले तर आयुष्य सावरू शकू, असं स्वप्न बघणारे अनेक असताना मोहन-छापाची माणसं असलेली नोकरी प्रामाणिकपणे न करण्याची चैन कशी काय करू शकतात, हे कोडंच आहे.

आपल्याभोवती अशा अनियमितपणाच्या सीमारेषेवर कित्येकजण असतील. त्यांनी क्षणभर विचार करावा. मोलाचं आयुष्य असं कवडीमोलानं संपवायचं? आता आपण एकटे नाहीत. स्वप्नं उराशी घेऊन घरात आलेली पत्नी आहे... पाळण्यात एक स्वप्न चिवचिवत आहे... त्यांना तुमचं प्रेम हवंय. सहवास हवा आहे. एक आंबा तिघांनी कापून खाल्ला तरी आख्खी आमराई हाती येते. कारण सुख आहे ते सगळे एकत्र असण्यात. त्यांना दुखावून चार लफंग्या मित्रांच्या सहवासात बायको-मुलांना दूर ढकलून अन् नोकरी घालवून काय होणार? आज पैसे खर्च करता आहात म्हणून बशीतले खारे काजू बीअरबरोबर खाणारे हे मित्र उद्या दिसणारही नाहीत. तेव्हा आठवेल- बायको. तेव्हा आठवेल- आता आपला मुलगा दहा वर्षांचा झाला असेल! बायकोनं पोळी-भाजी केंद्र काढलं. मुलगाही शिकतोय. त्याला स्कॉलरशिप मिळाली असं ऐकलंय. पुन्हा घेतील का ते जवळ? अरेरे! स्वतःच्याच हातानी हा धोंडा...

हे भविष्य खरं ठरू नये म्हणून तर वर्तमानात हे सांगणं! उद्याचा परिणाम आजच्या कृतीतच असतो. परिणाम कसा हवाय, ते निश्चित करा, कृती आपोआप घडेल.

# ६. न जुळलेले गुण

'मेड फॉर इच अदर' ही एखाद्या प्रणयपटाची कॅची कॅप्शन म्हणून ठीक आहे. बेतलेल्या कथानकात बेतलेलेच तो आणि ती फुलांच्या बागेत... चांदण्यांच्या पंखांनी अलगद एकत्र येतात. पण प्रत्यक्ष आयुष्य असं बेतता येत नाही. म्हणून तर कागदावर जुळलेली पत्रिका आणि काळजावर जुळलेली पत्रिका यात अंतर राहतं.

'हे जर आधी कळलं असतं ना, तर तेव्हाच नकार दिला असता!' असं प्रत्येक नवरा-बायकोनं मनातल्या मनात अनेकदा म्हटलेलं असतं. आणि असं म्हणत तिनं त्याला गरम चहा आणलेला असतो... आणि त्यानं तिला मोगऱ्याचा गजरा!

रेडिमेड कपड्याच्या दुकानांसारखी नात्यांची दुकानं नाहीत; म्हणून तर जोड-विजोड तुकड्यांनी आयुष्य रंगतदार होतं. लग्न- मग ते प्रेमलग्न असो की लग्नानंतरचा प्रेम-प्रयत्न असो; शंभर टक्के मताला मत, मनाला मन जुळलेलं जोडपं फक्त टीव्हीवरच्या एखाद्या कुटुंबस्पर्धेतच सापडेल. ही जोडपीही कार्यक्रमानंतर रिक्षात धुसफुसत असणार. अगदी एकमेकांसारखी असलेली दोन मनं योगायोगाने समोर ठाकणं जवळजवळ अशक्य आहे, हे मानूनच संसाराचा डाव मांडायचा असतो. स्वप्न पाहणं ठीक आहे, पण स्वप्नाळू असण्यात तोटे आहेत. लग्नानंतर 'उगीच नसत्या चक्रात अडकलो,' असं भुणभुणण्यात काहीच अर्थ नाही. वेगळ्या वातावरणात, संपूर्ण निराळे संस्कार लाभलेले दोन जीव एकमेकांसारखे असतीलच कसे? सुख-दु:ख, प्रेम-भांडणांचे काळे-पांढरे चौकोन ओलांडण्याचा खेळ खेळवणं ही तर नियतीची जुनीच हौस आहे. सरळ-सोपं आयुष्य नियतीनं देवालाही दिलेलं नाही. या न देण्याचंच 'देणं' स्वीकारून संसारात पाऊल टाकायचं असतं.

कुठल्या तरी समारंभात दिलखुलासपणे साहित्यापासून राजकारणापर्यंत गप्पांची सहज तान घेणाऱ्या स्त्रीचं आपल्या बायकोजवळ कौतुक केलं की ती म्हणते, 'ती तुम्हाला रसिक, संवेदनशील वाटणं स्वाभाविक आहे. कारण तिच्याबरोबरची भेट तासाभराचीच होती. तिला तुमच्याबरोबर संसार करायचा नाहीये.'

लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांच्या बायकांनी लिहिलेली आत्मचरित्रं वाचताना वाचक हबकले. पण तसं दचकण्याचं कारण नाही. कारण लेखन-टेबलाजवळील वा व्यासपीठावरील कलावंत आणि हरक्षणीच्या दिनक्रमातील पुरुष यांच्यातील अंतर फक्त पत्नीलाच कळत असतं. रसिक फक्त कलावंताला झेलतात; तर पत्नी अशा पतीला सोसत असते.

पूर्वी कथा-कादंबऱ्यांतून एकत्र कुटुंबातील संसार पाहून लग्नानंतरच्या आयुष्याची स्पष्ट कल्पना अविवाहित तरुण-तरुणींना येत असे. आताची संगणककेंद्री मुलं-मुली वाङ्मयातूनही जीवन वाचत नाहीत, आणि एकुलती एक, ओव्हर प्रोटेक्टेड असल्यानं या मुला-मुलींना इतरांचे संसारही बघायला मिळत नाहीत. खरं तर लग्नाआधीच धगधगत्या वास्तवाचं भान विवाहोत्सुकांना द्यायला हवं. 'निसर्गात एक पान दुसऱ्या पानासारखं नाही, तर जीवन-साथीदार 'अगदी तुला हवा तसा' असणार कसा? त्याचे-आपले काही गुण जुळणारे नसणारच. ते तू स्वीकारणार असशील, त्या वेगळ्या, तुला न पटणाऱ्या गुणांतच त्याचं माणूस म्हणून वेगळेपण आहे, हे मान्य करणार असशील, तरच संसारात पाऊल टाक,' अशा आशयाचं समुपदेशन ही काळाची गरज आहे. आजच्या तरुण-तरुणींना वाटतं- लग्न म्हणजे नाच-गाणं, मेंदी, लाजणं, अंताक्षरी, शालूची सळसळ, सुटाचा डौल, कुलू-मनाली-नैनिताल, बर्फाचा पाऊस... गुलाबांचा वर्षाव! निसर्ग-आवेगाचं धुकं वितळल्यानंतर एकमेकांचे खरे चेहरे त्यांना दिसू लागतात. दोघांनी एकमेकांवर प्रेम करताना एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव ठेवायला हवी. 'माझ्यासारखंच त्यानं किंवा तिनं वागलं म्हणजेच प्रेम' हे डोक्यातून काढायला हवं.

कागदावरच्या कुंडल्या कितीही बघा, बघण्याच्या समारंभात गच्चीवर गप्पा मारताना 'छंद, महत्त्वाकांक्षा, श्रद्धा, अंधश्रद्धा' असले प्रश्न विचारा... या प्रश्नांची उत्तरं ही सौंदर्यस्पर्धेतील सुंदर मुलींच्या भंपक उत्तरांसारखीच बहुधा असतात. लग्नानंतर एकमेकांना हे कळतं. तेव्हा म्हणाली होती, वाचनाचा छंद आहे. पण नंतर साधं वर्तमानपत्रही उघडलं नाही बयेनं! जाब विचारू शकतो का आपण? किंवा तो म्हणाला होता- प्रवासाची आवड आहे. पण प्रत्यक्षात

कळतं- कामावरनं आला की तो जो सोफ्यावर लोळतो- गव्हाचं पोतंच जसं! प्रवासाची आवड कसली? कामावर दादरला जाऊन घरी परत येतो, हेच नशीब! कसले बत्तीस गुण जुळले, देव जाणे! उरलेले न जुळलेले चार कुठले ते कळले असते तर...

न जुळलेल्या गुणांशीच खरं तर लग्न असतं. तिथं जमवून घेणं ज्या व्यक्तीला जमलं, तीच व्यक्ती टिकली. नाही जमलं, की संसार विस्कटलाच म्हणून समजा.

'नसेल पटत, तर आयुष्यभरचा काच सहन करण्यापेक्षा टाका संसार मोडून. नवा उभारा,' असं कोरड्या आवाजात बोलणारा स्त्री-पुरुषांचा एक बॉयकट-जीन्सवाला समाज अवतीभवती फोफावलाय. पण असं समजू नका- ही मोडतोड हेच या प्रश्नाचं उत्तर आहे. कदाचित घाईघाईने शोधलेल्या चुकीच्या उत्तरातच हजारो प्रश्नांचं गाठोडं असेल. असे एकाकी बुद्धिमान घटस्फोटित परिसंवाद संपल्यानंतर वेगळ्याच मानसिकतेत असतात. अन्याय, शोषण सहन न करणं- हा पहिला भाग झाला. पण न जुळलेल्या गुणांमध्ये एकमेकांच्या वेगळ्या क्षमतांचा शोध घेऊन नातं जुळतंय का, हे पाहण्याची सहनशीलता दोघांमध्येही हवी. आज हे स्त्री-पुरुषांना सांगितलंच जात नाहीये. नाही जुळलं? मोडा. व्हा विभक्त! आणि मग करा काय? पुन्हा विवाह. पुन्हा तोच खेळ.

नवरा लेखक, म्हणजे बायको लेखिकाच असेल; नवरा चित्रकार- म्हणजे बायको निदान 'फ्लॉवर डिझाइनर' तरी असेल, अशी माफक अपेक्षा समाज बाळगून असतो. प्रत्यक्षात एकमेकांच्या भिन्न गुणांचा एकमेकांना आदर असणं महत्त्वाचं. तेच कौशल्य दोघांमध्येही असेलच असं कसं शक्य आहे? एकमेकांना एकमेकांची क्षेत्रं अनभिज्ञ असतील; पण जीवनात दोन्ही महत्त्वाची आहेत, हे दोघांनीही जाणायला हवं.

आपल्याला 'हव्वी तशी' व्यक्ती मिळणं हे एक परीकथेतलं स्वप्न असेल; पण वेगळ्या रंगाच्या धाग्यानं टाके घालत आयुष्य जोडत ठेवावं लागतं- हेच एक सत्य आहे. लग्नानंतर पंधरा-वीस दिवसांतच दोघांनाही मनोमन कळलेलं असतं की, आपल्याला कुठल्या कुठल्या बाबींमध्ये तडजोड करावी लागणार आहे ते! अशावेळी एकमेकांच्या क्षेत्राबद्दल कुतूहल दाखवायला हवं. ज्ञान नको, पण अनभिज्ञता संपायला हवी. एकमेकांच्या वेगळ्या क्षेत्रात कुठपर्यंत सहकार्य करू शकतो, याचाही शोध घ्यायला हवा. माझं क्षेत्र, माझी प्रतिभा, माझी बुद्धिमत्ता, माझं करिअर... फक्त माझं तेवढंच श्रेष्ठ अन् समोरचा अगदीच फालतू- हा अनादरच ठिणगी टाकतो. धुमसत राहणाऱ्या राखेत कसली फुलं फुलणार?

एकमेकांचे काही गुण जुळणारच नाहीत. हे मी स्वीकारणार आहे का? या प्रश्नाचं प्रामाणिक उत्तर स्वत:शी देऊनच संसार मांडायला हवा. खरं तर प्रेमात काय, नियोजित लग्नात काय- हे 'न जुळणारे गुण' शोधता यायला हवेत. 'गाण्याची आवड नाहीये हिला, पण वाचनाची दिसते,' 'त्याला शेअर मार्केटची गोडी दिसते, आपल्याला ओ की ठो कळत नाही. पण त्याचा स्वभाव विनोदी आहे. आपलं पेंटिंग तो नक्कीच प्रेमानं पाहील,' असंही होऊ शकतं.

'लग्न म्हणजे जुगार' ही स्त्री-पुरुषांची मानसिकताच मुळी बदलायला हवी. मुळात जुगार खेळणं हाच गुन्हा आहे. जुगारात दुसरा पहिल्याला जिंकू देत नसतो. लग्नानंतर मात्र एकमेकाला प्रेमानं जिंकण्यात, प्रसंगी त्यासाठी हरण्यातही जिंकणं असतं. स्वभावाचे कंगोरे, आवडीतलीही नावड कळायला सात पावलं घुमायलाच लागतं. आपल्यापेक्षा वेगळ्या व्यक्तीचं वेगळेपण सहज स्वीकारणं हे या वाटेवरचं पहिलं पाऊल. ते पाऊल विश्वासानं पडलं की इतर सहा पावलं सहज पडत जातात...

# ७. मी - माझं - माझ्यापुरता...

अगदी सात-आठ वर्षांची मुलं झेपेल ते पातेलं हातात घेऊन वाढणी करीत होती. मोठी गंमत वाटली. कौतुकानं मी शेजारच्याला म्हटलं, 'कम्मालाय्! मोठ्यांबरोबर मुलंही हौसेनं वाढणी करतायत्. तो धिटुकला तर बघा ना...'
'अहो, तो माझाच मुलगा आहे. त्याच्या वयाचा होतो तेव्हापासून मीही कृष्णाबाई उत्सवात असाच भाग घेतोय. माझ्या वडिलांनीही त्यांच्या बालपणी...' पिढ्यान् पिढ्या सहकार्याचा, सौजन्याचा हा वारसा देत कृष्णाबाई झुळझुळते आहे. धर्मपुरी संस्थानच्या आठव्या घाटावरचा उत्सव मी पंचसंवेदनांची ओंजळ करून अनुभवत होतो.
संस्थानचे ज्येष्ठ पदाधिकारी सोहोनींना म्हटलं, 'एवढा मंडप, एवढी जेवणं, एवढे कार्यक्रम... कार्यकर्ते मिळतात तरी कुठून?' प्रसन्न हसत ते म्हणाले, 'याच नव्हे, सर्व घाटांवर हा उत्सव होतो. मुळातल्या वाईकरांचा प्रत्येकाचा हा उत्सव. आपापल्या श्रेष्ठ पदांचा, पैशाचा सगळा अहंकार बाजूला ठेवून इथला प्रत्येकजण बायको-मुलांसह राबतो. हे बघतच आमची मुलं मोठी होतात. मंडपापासून ते स्वयंपाक, वाढणी सगळी कामं हौसेने वाईकरच करतात. वर्षानुवर्षं हे चाललं आहे.'
चार भिंतींच्या घराबाहेरही केवढं मोठं बिनभिंतीचं घर असतं, याची शिकवण केवळ छापील पुस्तकांतून नाही मिळणार. त्यासाठी आपल्या मुलांना वेळीच समाजातल्या वेगवेगळ्या उत्सवांत, कधी सामाजिक आपत्तीच्या ठिकाणी आवर्जून पाठवायला हवं. एका कॅडबरीसाठी थयथयाट करणाऱ्या मुलाला त्याच्याही पेक्षा लहान मुलं कशी उन्हात अनवाणी चालतात, हे दाखवायला हवं. प्रसंगी, जरा या डांबरी रस्त्यावरून अनवाणी चालून बघ, हेही सांगायला हवं.
प्रत्येकाला आपलं मूल लाडकं असतं. आणि त्याला किंचितही दुःख होऊ नये म्हणून त्याच्या डोक्यावर पालकांनी सावली गच्च धरून ठेवणंही नैसर्गिकच. तरी जीवनाला ही कायम कृत्रिम सावली मंजूर नसते. अशा वेळी 'मी- माझा- माझ्यापुरता' या कोषातल्या आपल्या सोनुल्याची पुढे पंचाईत होते.
मला आठवतं- विद्यार्थीदशेतच माझ्या चाळीतल्या घरी साहित्यिक आणि प्राचार्य श्यामराव फडके आले होते. मी संकोचलो. फडके सर मला म्हणाले, 'तुम्ही भाग्यवान आहात. शून्याच्या मागे दहा लिहायला भरपूर संधी आहे तुम्हाला.' आज या वाक्याचा अर्थ कळतो. मुलांच्या अति काळजीनं पालक आपल्या मुलांच्या संपूर्ण आयुष्याला पुरेल एवढी इस्टेट जमा करतात. पिढ्यान् पिढ्यांना पुरेल एवढीही ती असते. यानं होतं काय, की आता जगायचं कशासाठी? अन् मिळवायचं काय? हे उद्दिष्टच उरत नाही. आरंभीच संवेदनांची उत्कट शक्ती बोथट होते. वडिलांनी धडपडून, राबून, श्रमून हाती दिलेली रेडिमेड इस्टेट दुबळ्या ओंजळीतून निसटून जाते. आजोबांचे, वडिलांचे संपत्तीचे बिलोरी महाल अपात्र, दुबळ्या नव्या पिढीकडून भुईसपाट होताना आपण बघतो. काहीजण म्हणतात- 'यांची नवी पिढी कमकुवत निघाली. वाटोळं केलं बापजाद्यांच्या इस्टेटीचं.' पण 'कुवत' भाड्यानं मिळत नसते. ती आतून बाहेर प्रगटते. सगळं बाहेरून सुख कोंबून आतली जिद्द, धडाडी व्यक्त होणार कशी? त्यासाठी सुखवस्तू पालकांनी वेळीच मुलांना सांगायला हवं- 'हे सगळं आहे ना, ते एका रात्रीत नाही जन्माला आलं. त्यासाठी तुझ्या बापानं खस्ता काढल्यात. कधी हमाली केलीय, कधी नातेवाईकांची धुणी-भांडी केलीयत. प्लॅटफॉर्मवर झोपलोय. ते सांभाळून वाढवण्याची तरी क्षमता निर्माण कर. आहे ते सांभाळायलाही मनगटात ताकद लागते.'
कॉलेजमध्ये बघतो- मुलांजवळ भरमसाट पॉकेटमनी असतो. जवळच्याच बीअर बारमध्ये मुलामुलींचे घोळके बसलेले दिसतात. गुटखा-सिगारेट तर आता आयकार्डइतके गरजेचे झाले आहेत. कार, स्कूटरसारखी वाहनं मुलाने एसएससीला एकेचाळीस टक्के मिळवले म्हणून अभिनंदनपूर्वक दिली जातात. टाळी वाजवल्याबरोबर या मुलांना वस्तू मिळतात. सांगण्याची खोटी, लग्गेच हजर! पण टाळी वाजवल्यावर जीवन तयार नसतं, हे यांना कोण सांगणार? आणि कधी?
पूर्वी राजपुत्रांनाही तपोवनात गुरुगृही राहून अध्ययन करावं लागत असे. तिथे राजपुत्र आणि दुसरा कुणीही शिष्य यांत भेद नसे. वनातून सरपण गोळा करणं, पाणी भरणं, अंगण सारवणं, गायीचं दूध काढणं अशी सगळी कामं

शिष्यच करीत. शिक्षण केवळ पोथीतलं नव्हतं. लाकूडतोड करताना होणाऱ्या जखमा, रणरणत्या उन्हात ओघळणारा घाम, सडकून लागलेली भूक, विलक्षण श्रमानं येणारी गाढ झोप आणि साखरझोपेतूनही उठून पुन्हा सुरू होणारी दिनचर्या यातूनच राजपुत्रातील 'राजा' तयार होत असे. घणाचे घाव पडून पैलूदार करण्याची क्षमता गुरुकुलात होती. आज ते शिक्षणही 'इतिहासजमा' झालं, आणि म्हणून ते 'भविष्य'ही!

काही अर्थसमृद्ध जागरूक घरं नव्या पिढीच्या पाऊलवाटांवर ठायी ठायी गुलाबाच्या पाकळ्या टाकत नाहीत. एखादा अणकुचीदार दगड हाही या वाटेतीलच भाग आहे, याची प्रचीतीही या पिढीला देतात. एखादं श्रमशिबीर, एखादं गिर्यारोहण शिबीर, एखादा वनवासींसाठी मेडिकल कॅम्प, भूकंपग्रस्त-वादळग्रस्तांसाठीचं मदतीचं पथक यांत आवर्जून पाठवतात. जगण्याच्या नाना रंग-बेरंगांचा परिचय या सहजीवनातच होतो. हे सहजीवनच काढून घेतलं, तर एका पंखानं पक्षी उडणार कसा?

सहजीवनाचा कप्पाच बंद करून कोषात वाढलेली अनेक मुलं पुढे 'थ्रिल' म्हणून गुन्ह्यांकडे वळतात. एकाकीपणाचा स्फोटच तो. तिथं हेतू पैशाचा नसतोच; फक्त लक्ष वेधण्याचा असतो! खूप व्यसन करावं, वृत्ती स्वैर कराव्यात, आयुष्याचा स्पीड असा बेभान करावा, की खडकावर फुटून फाडकन् संपण्यातही मौज, मजा, मस्ती आहे!

आपापल्या वस्तू खपाव्यात म्हणून प्रसार माध्यमं जाहिरातींतून बाह्य सुखाच्या मुसळधार पावसाचं प्रलोभन दाखवताहेत. दप्तरासाठी, शर्टच्या शुभ्रतेसाठी, साडीच्या चमकदारपणासाठी, मद्याच्या आकाशधुंदीसाठी, पेनच्या पारदर्शकपणासाठी स्त्री-पुरुषांचा कातडीबाजार मांडला आहे. अशा बाजारातून आपलं पिल्लू उद्या प्रवास करणार आहे. तो बाजार नाहीसा करण्याची या इवल्याशा लेखणीत कुवत नाही. सुखलंपट बुद्धिवाद्यांचे ललित युक्तिवादही भोगवादाचं समर्थन करणारे आहेत. ते आपल्याला खोडताही येणार नाहीत. म्हणूनच स्वामी विवेकानंद तरुणांना म्हणतात, 'उत्तिष्ठत्! जागृत!!' यात सगळं आलं. घसरण्यासाठी सराव लागत नाही; शिखराकडे जाण्यासाठी मात्र लागतो!

'मी- माझा- माझ्यापुरता' हे संकुचित ब्रीद विशाल आनंद हरवून टाकेल.

एकेकाळी घर हेच एक सहजीवनाचं संस्कार शिबीर होतं. एकीनं वाल निवडायचे, दुसरीनं फोडणीला टाकायचे. सर्व काकांनी मिळून घराला रंग द्यायचा. गोष्ट छोटी, पण सारे आनंद एकत्र लुटायचे. हाच कायमचा स्वभाव झाला. आपले सदा मिटलेले दरवाजे, कुढणारी मनं उघडून जरा बाहेर तर या, जरा मोकळा श्वास तर घ्या. सुख वस्तूत नसतं, अर्थ नाण्यात नसतो. हे सर्व असतं- साऱ्यांनी मिळून, गुंफून जगण्यात.

मनाचे दरवाजे उघडूया-

आकाश आत यायला उत्सुक आहे!

# ८. रात्रशाळेतील प्रकाशयात्री

'सर, त्या विद्यार्थ्याला पाहून ठेवा. नंतर सांगतो त्याच्याबद्दल,' गोरेगावच्या रात्र महाविद्यालयातील एक शिक्षक मला सांगत होते. वयापेक्षा थोराड वाटणारा तो चेहरा. इतर मुलं पंख पसरून विहरत असण्याच्या वयात त्याच्या डोळ्यांत मात्र एक सोसलेपण. हसू जसं काही कायमचं उठून गेलेलं. कार्यक्रम संपल्यावर अस्वस्थ करणारे अनेक चेहरे ठसठसत राहिले. मी न राहवून विचारलं, 'सर, त्या मुलाचं काय?'

'आपण आपले शिकवत असतो, पण समोर कुठल्या कुठल्या जखमा घेऊन ही नाईट स्कूलची मुलं शिकत असतात, कळत नाही. याच वर्षीची गोष्ट. हा मुलगा अकरावीची परीक्षा देत होता. आमच्या नेहमीच्या रात्रीच्या वेळेतच होणारी. मुलगा बऱ्यापैकी हुशार. मीच सुपरव्हिजन करीत होतो. क्षणभर चमकलोच. कारण अर्ध्या-पाऊण तासातच तो उत्तरपत्रिका देऊ लागला. मी म्हटलं, 'अरे, अजून दोन-सव्वादोन तास आहेत. एवढ्यातच?' 'हो सर, जाऊ द्या. याहून अधिक थांबणं शक्य नाही. पासापुरतं लिहिलंय.' तरीही मी आग्रह करू लागलो- 'तुझी कुवत आहे. हुशार आहेस. तू बस अजून. लिही.' तरारलेल्या डोळ्यानं तो म्हणाला, 'खिशातली शंभराची नोट बसू देत नाहीये सर.' 'खिशातली शंभराची नोट?' या मुलाला काही वेगळे नाद लागलेत की काय? वर्गाच्या बाहेर त्याला नेऊन हळूच विचारलं, 'शंभराची नोट अस्वस्थ करतेय?' 'होय सर, दोन दिवस आई-बहीण नीट जेवलेल्या नाहीत. घरात अन्नाचा कण नाही. आजच माझा पगार झालाय. शंभर रुपये. या पैशानं मी तांदूळ, डाळ घेऊन घरी जाईन तेव्हा सगळे जेवतील. सर, त्यांना अजून किती उपाशी ठेवू? भुकेली भावंडं आठवत असताना पेपर कसा लिहू? हे शंभर रुपये अस्वस्थ करताहेत. निघू सर?'

जीवाचं रान करून नाईट स्कूल, नाईट कॉलेजात अशा अनेक कर्मकहाण्या शिकत असतात. भोवऱ्यानं वेढलेल्या तुफानात हाताचं वल्हं करीत किनारा गाठता गाठता! काही किनारा गाठतात. घर उभं करतात. पुण्याच्या आबासाहेब अत्रे रात्र-प्रशालेत अशी अनेक मुलं उरात निखारा घेऊन रात्रीच्या मातीतून प्रकाशाचं झाड रुजवीत आहेत. एक संवेदनशील ग्रंथपाल, कार्यकर्ता वृत्तीचे स्नेही प्रसाद भडसावळे या अत्रे प्रशालेत काम करतात. त्यांनी अशा अनेक झुंजारांची ओळख करून दिली.

ज्ञातीसरांचं पाकीट मारताना हाती आलेला अरविंद बागवान याला नुसतेच दोन लाफे देऊन पोलिसात दिला असता तर तो नामचीन गुन्हेगार झाला असता. पण ज्ञातीसरांनी त्याला जाणून घेतलं. 'या वयात पाकीट मारतोस? पुढे काय?' तेव्हा परिस्थितीची अगतिकता त्याला गुन्ह्याकडे वळवते, हे त्यांना कळलं. मग सरांच्या मदतीनं त्यानं एकीकडे नाईट स्कूल, तर दुसरीकडे टॅक्सी चालवण्याचं शिक्षण घेतलं. पुस्तकी पानाला पोट भरणाऱ्या जीवन-शिक्षणाचं पान बिलगलं. आज तो तेव्हाचा पाकीटमार पुसला गेलाय. अरविंद बागवान झोकात टॅक्सी ड्रायव्हर म्हणून काम करतोय. नववी पास झालाय. रात्रशाळेबरोबरच परीसवृत्तीचा एक शिक्षक काय करू शकतो, ते दिसत होतं. अशा वेळी रात्रशाळेची होते प्रकाशशाळा !

याच शाळेत शिकणारा रवींद्र. पोटासाठी उद्योग काय? दिवसभर टुरिस्ट गाड्यांवर लक्ष ठेवायचं. गाड्या पुसायच्या. टिप्चे पैसे आईच्या हातात ज्वारीचं पीठ द्यायचे. भावंडांच्या पोटाला भाकरी. पावलात दम आणि डोळ्यांत निश्चय असला की वाटा चालत येतात. आपटे मोटर स्कूलचे मालक त्याला योगायोगाने भेटले अन् त्यांनी रवींद्रवर विश्वास दाखवला. विनामूल्य कार-प्रशिक्षण दिलं. आता त्याचं योग्य वय झालं की शिक्षणाबरोबरच त्याच्या उपजीविकेचा प्रश्न सुटेल.

सायकलवर कुरिअरने पत्रं टाकणारा, भरउन्हात घामानं निथळूनही हसऱ्या चेहऱ्याने पुन्हा रात्री शाळेत येणारा बबन आंकम् हा मुलगा स्वतः शिकतोच, पण दरवर्षी दुसऱ्या गरीब मुलाला पाठ्यपुस्तकांसाठी शंभर रुपये देतो. या मुलांना फावला वेळच नाही. जीवनाने त्यांना तशी उसंतच दिलेली नाही. नियतीनं दिलेल्या कोऱ्या कागदावर यांना त्यांची अक्षरं स्वतःच लिहायची आहेत.

सुट्टी आली की इतर मुलांना आनंद होतो. रात्रशाळेतल्या मुलांच्या मनात मात्र काहूर माजतं. दिवस तर राबण्यात संपला, आता संध्याकाळ? आपल्या झोपडपट्टीतली संध्याकाळ त्यांना सैरभैर करते. बाप जुगाराच्या अड्ड्यात, हातभट्टीच्या वासात सिगारेटचा धूर मिसळत असतो. तोच सांगतो, 'अजून पावशेर आण.' इतर मवाली टपोरी पोरं बिडीचा, दारू प्यायचा आग्रह करतात. मग शक्यता असते- अजून रूप न मिळालेल्या पाऊलवाटेला घसरण लागते. यातून मग उद्याचे गुन्हेगार वळवळू लागतात. जे केवळ एकाच ठिकाणी श्रीमंती गोठवणाऱ्या समाजाचं एक विकृत अपत्य असतं.
माझ्या आयुष्यातले ते वेगळे दिवस. मी सकाळी कॉलेजात शिकायचो न् रात्री भांडुपच्या कस्तुरी नाइट कॉलेजात शिकवायचो. सकाळी पुस्तक, तर रात्री आयुष्य- असं दोन्ही वाचत होतो. वेड्यासारखं प्रेम करणारे तरल विद्यार्थी याच कॉलेजात मला मिळाले. कुणी भाजीवाले, हातगाडीवाले, हमाल, पेपरची 'लाइन' टाकणारे, हॉटेलात वेटर. सतराव्या वर्षात चाळिशीची समज असणारी गुणी मुलं तिथं मला मिळाली. सगळं काही सहज मिळाल्यानं त्या मिळण्याचा अर्थ न समजणाऱ्या मुलांनी या मुलांना भेटायला हवं. मग त्यांना खूप काही समजून जाईल.
आज प्राध्यापक झालेला सुभाष कांबळी आठवतोय. टेंबीपाड्याच्या त्याच्या घरी मी अनेकदा गेलोय. जेवलोय. 'जीवनसंघर्ष' हा शब्द आपण गुळगुळीतपणे वापरतो. पण त्या ठिणग्या कशा असतात, ते सुभाषच्या आयुष्यात मी अनुभवलं. आजही त्याच्यात आणि माझ्यात संपर्क आहे. सुभाष कांबळी प्राध्यापक झाल्यानं एक वर्तुळ पूर्ण झालं. तो आता त्याच्यासारखंच जिद्दीनं जगणाऱ्या विद्यार्थ्यांना जाणून घेईल.
आज निकालांवर अनुदान देण्याचा काळ आलाय. या शाळेतली मुलं मुळातच इतकं शिक्षणबाह्य आयुष्य जगतात! त्यांनी शिकण्यास प्रवृत्त व्हावं असं वातावरण निर्माण व्हायला हवं. रात्रशाळा- महाविद्यालयं ही शासनाची सर्वात आवडती खाती व्हायला हवीत. त्यांना प्रतिष्ठा मिळायला हवी. या शाळांना उत्तम ग्रंथालये हवीत. धडपडून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पडझड होऊ नये म्हणून इथले शिक्षक, प्राचार्य 'केवळ अजून एक पार्टटाइम नोकरी- दोन हजार सुटले,' या वृत्तीचे नकोत. रक्त आटवून त्याचा दिवा करण्याच्या प्रेरणेचे हवेत. उत्तम कुवतीचे कित्येक शिक्षक निवृत्त होऊन, घरीच क्लास घेऊन वेळ घालवतात. पंधरा दिवसांतला एक तास जरी विनामूल्य शिकविण्यासाठी त्यांनी जवळच्या नाइट स्कूलला सहकार्य केलं तर त्यातून कित्येक प्रकाशयात्री निर्माण होतील. पूर्वजांच्या श्राद्धामध्ये हजारो रुपये खर्च करून त्यांच्या आत्म्यांना मुक्त करण्यासाठी धडपडणाऱ्यांनी अशा एका विद्यार्थ्याचा वर्षभराचा खर्च दिला तरी अनेक आत्मे मुक्त होतील आणि जिवंत देह 'जगू' लागतील! शासनाची काही कर्तव्यं असतात, पण काही आपलीही असतात. त्यात दुसऱ्याच्या समाधानापेक्षा आपला आनंद मोठा असतो. शं. ना. नवरे यांच्या 'सूर राहू दे' नाटकातलं एक वाक्य आठवलं. वाक्य कसलं? जीवनचिंतनच ते! 'हजार दिव्यांमध्ये एक दिवा लावण्यापेक्षा काळोखात एक दिवा लावला तर काळोखाला बरं वाटेल. त्याहून दिव्याला अधिक बरं वाटेल.' अशा एकट्याच्या कार्याला प्रसिद्धी नसते. शाबासकी नसते. पण समाधान असतं.
अशा दिव्यांची ती रात्र वाट पाहतेय...

# ९. जावयाची सासू

चार दिवस झाले, अजून सासूबाईंचं पेणला हलण्याचं चिन्ह दिसत नाहीये. नाही, तसा त्रास नाही त्यांचा; पण झाली ना आता लेकीची भेट. शिवाय एप्रिलमध्ये आम्हीही गेलोच होतो. ही पण सारखी 'राहा गं चार दिवस, घरी गेल्यावर आहेच वहिनीची नोकरी, अमित-रूपलची शाळा' हिचा आग्रह न् सासूबाई आहेतच कपड्यांची भरलेली पिशवी रिकामी करायला.'

'अरे, पण गेल्या वर्षी तर तू स्वत: जाऊन घेऊन आलास पेणहून, दोन महिन्यांनी निघत होत्या, तर म्हणालास अजून बाळ लहान आहे. निदान ते तीन महिन्यांचं होऊ द्या. म्हणजे बायकोच्या बाळंतपणात तिचं सगळं करायला, शिवाय तुझा ऑफिसचा डबा, सुदीपच्या शाळेची तयारी यासाठी सासूबाई हव्या होत्या तुला. आता फक्त मुलीच्या घरी म्हणून चार दिवस आल्यात तर त्या तुला नको झाल्यात. हेमंत, हे जरा...'

पटलं तरी मान्य न करणारा झटका मानेला देऊन हेमंतनं सिगारेटवरची राख झटकली. न् मला जावई-सासू या गंभीर आणि गमतीदार नात्यांच्या आठवणींची जत्राच जागी झाली.

सुनेच्या सासूबद्दल जळी-स्थळी बोललं जातं; पण जावयाचीही एक सासू असते, याचा सोयीस्कर विसर पडलेला असतो. कारण तिथं तो जगप्रसिद्ध सासुरवास नसून, असलाच तर जावईवास असतो.

अजूनही लग्नाचं पहिलं वर्ष म्हणजे रीतिरिवाजांची रांग असते. आणि त्यातले बहुतेक रिवाज जावईबापूंना खूश करण्यासाठीच असतात. पूर्वी त्या रिवाजांना स्थळांचं अंतर, भेटीची अनिश्चितता आणि सासुरवास बोथट व्हावा यासाठी केलेली चतुराई, असा काही अर्थ असेलही. पण आजही पहिला पाडवा, पहिला दसरा, पहिला दिवाळसण- अशा समारंभाला जावईबापूंचं सासुरवाडीला कोण कौतुक असतं! नशिबानं 'स्थळ' गुणी असेल तर ते मनापासूनही असतं. पण घेऊपासरी असेल तर रीत पाळण्याचा नाइलाजच असतो. चांदीच्या दुकानातही 'पेला दिसायला मोठा, पण वजनानं जरा हलका चालेल' ही युक्ती करावी लागते. सासूबाई जावईबापूंच्या आवडी-निवडीचा अंदाज घेतात. कधी कौतुकानं लेकीलाच म्हणतात, 'बघ बाई, तूच विचार- त्यांना केशरी भात आवडतो तर तो करू. पुरणपोळीचं उद्या बघू-' वाढतानाही जावईबापूंनी 'वा! छान चव आहे हं आई तुमच्या हाताला,' असं म्हटलं की सासूबाई धन्य होतात. तुपाची धार जरा जास्त टाकतात. मग हळूच जावईबापू म्हणतात, 'थोडे लेकीलाही शिकवलं असतंत तर...'

संदर्भ बदलले, रिवाजांची टोकं बोथट झाली. मानपानांचे आग्रह-दुराग्रह कमी झाले. पण जावई आणि सासू यांच्या नात्यातील जवळ-दूर अंतर तेच राहिलं. पुष्कळदा 'कामापुरता मामा' हाच सूर राहिला- हे मुलींनाही थोड्याच दिवसांत कळतं. घरगुती अडचणींना मदतनीस, कुणी नसेल तेव्हा सोबत, पाळणाघरात काही अडचण निर्माण झाली की मुलं ठेवण्याची हक्काची जागा म्हणून जावयांना सासू आठवू लागते. पण हे काहीही नसेल तेव्हा 'आज तुझ्या आई-बाबांना बोलाव. छान आईस्क्रीम पार्टी करू. आधी झकास नाटक पाहू. आजचा रविवार दोघांचे आई-बाबा आणि आपण धमाल करू,' असं सांगणारे जावईबापू संख्येनं तुरळक असतील. त्यांच्याबद्दल अनादर नक्कीच नसतो; पण आपल्या बायकोची आई एवढंच नातं! आपल्या बायकोनं आपल्या आईशी वागताना अगदी पोटातल्या नात्याप्रमाणे वागावं, अशी अपेक्षा असणारा हा जावई बायकोच्या आईशी मात्र जावयासारखंच वागतो. अपेक्षांची आंबट-तुरट लज्जत असणारं हे मोठं विलोभनीय नातं आहे.

मुलीच्या सासरी तिच्या आईने येण्याची जी अनेकरंगी कारणं असतात, त्या संदर्भावरही जावई-सासू या नात्याचे रंग अवलंबून असतात. सुनेचं आणि स्वतःच्या मुलाचं मनापासून प्रेम मिळणारी आई जेव्हा सासू म्हणून जावयाकडे जाते, तेव्हा तिचा आदरसत्कार मनमोकळा असतो. आपल्या सासूबाई मिंध्या नाहीत, त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणारा त्यांचा मुलगा-सून-नातवंडं त्यांची घरी वाट पाहताहेत, हे जावईबापू जाणून असतो. परिस्थिती पूर्ण विरोधी असताना 'आमच्याकडे या महिना-दीड महिना. इथंही तुमची हक्काची मुलगी आहे. जावई असलो, तरी

मुलासारखाच आहे. खुशाल राहा.' असं सांगणारे, सासूबाईंचे डोळे मायेनं भिजवणारे जावई असतीलच; पण तुरळक!

उलट, मुलगा आणि सूनवास यांच्या अडकित्त्यातून चार दिवस तरी सुटकेचे काढू, मग आहेच पुन्हा नेहमीचा कारावास- या अगतिकतेने आलेल्या सासूबाई, मुलीच्या मायेत- म्हणून आपल्या घरात अधिक अडकताहेत असं दिसलं की धूर्त जावई खडबडून जागे होतात. सहानुभूतीच्या वाटेनं 'ही धोंड कायमची अडकायची' या भीतीने शेपटी उगारतात. काही दिवसांतच त्यांचं वागणं, बघणं बदलतं. डोळ्यांचं गुरगुरणं मुलीला ऐकू येतं. आता याहून आणखी आई राहिली तर 'ह्यांचं टॉर्चर सुरू'. ही ती चतुरा हेरते. आईदेखत भांडण नको, मूठ झाकलीच राहू दे- म्हणून आईची बॅग हलकेच भरू लागते.

'अगं, मला नाही का राहावंस वाटत पुष्पीकडे? तुझ्याही आईला वाटू शकतं. हेमंताला काय कळणार आईचं काळीज? मीही एक आई आहे. ते काही नाही- एवढ्यात पाठवायचं नाही त्यांना,' असं जवळीकेनं सांगणारी सासू ज्या घरात आहे, त्या घरात सासू-सून नात्यालाही गगन ठेंगणं होतं.

जनात मान्य करणं अवघड असे काही उलटे टाकेही या नात्यात असतात. या वयाला सत्य सांगणं अवघडच. मान्य करणं तर जवळजवळ अशक्यच.

-काही कारणांनी जावयाची मुलं सांभाळावी लागली तर कर्तव्यभावनेनं पुढं सरसावणारी सासू- प्रत्यक्ष मुलाची-सुनेची मुलं सांभाळताना 'फार गुंतणार नाही आपण या नव्या संसारात' याची काळजी घेते. दोन्हीकडची नातवंडं सारखीच लाडकी असतात. एकीकडे मुलाची, तर दुसरीकडे मुलीची. ही रक्ताचीच नाती असतात. पण वागण्याचा सूर जरा बदलत असतो. कारण एकीकडे असतो जावई. त्याच्याकडे असते आपली मुलगी. दुसरीकडे मुलगा. तो तर आपलाच. माऊलीची होते तारांबळ. पण एकीकडे सांगण्याची सोय नाही. जावई पडला! दुसरीकडे स्पष्टच सांगूया. मुलगाच आहे! मोठी गंमत आहे या सगळ्यात.

घरातल्या साऱ्या अडीअडचणींची एकमेव तारणहार म्हणून ज्या सासूकडे जावईमहाराज पाहतात, त्यांना तुमच्या सुखी क्षणीही वाटेकरी करा ना. तुमच्या आई-वडिलांबरोबर दोन तिकिटं त्यांचीही काढली नैनितालची. खर्च तर वाढेल निश्चित; पण आपल्या नवऱ्याला आपल्या आई-बाबांच्या कष्टाची जाणीव आहे... जिव्हाळ्याच्या या स्पर्शानं पती-पत्नी नात्याला एक निरपेक्ष अंकुर फुटेल. जिवंत माणूस कुठंही श्वास घेतोच; नात्यांसाठी हवी असते एक उबदार दखल!

एकच मुलगा किंवा एकच मुलगी अशा कुटुंबव्यवस्थेला आरंभ झाला आहेच. अशा काळात मुलीलाही मुलाचंच कर्तव्य पूर्ण करावं लागेल. त्या कर्तव्याला पतीची समजूतदार साथ असेल, तर दोन्ही कुटुंबं एका देठावरील पर्णासारखी फुलून येतील. नोकरी करणाऱ्या मुलीला, आईला 'टेबलाखालून' पाकीट द्यावं लागणार नाही. 'या वयात त्यांचा मीच आधार आहे, आणि तुम्हीही,' व्यवसाय करून हक्काचे पैसे मिळवणारी मुलगी असं सांगू शकेल. पण त्यात कायद्याच्या हातोड्यापेक्षा साथीदाराचा जिव्हाळा मिसळला तर कर्तव्यं सहज पूर्ण होतील.

लग्नानंतर मुलगा त्याच्या आई-वडिलांबरोबरच असतो. पण मुलगी मात्र २२-२५ वर्षांचे जिव्हाळ्याचे संदर्भ दूर ठेवून एका अनोळखी घरात पाऊल टाकते. मनासारखं रुजलेलं आपलं नाव-गाव बदलते. असं असलं तरी प्रत्येक मुलगी मनाच्या एकांतात 'माहेरी जा सुवासाची कर बरसात' हीच ओळ गुणगुणत असते. समजूतदार पती हे गाणं मनोमन जाणून, त्या भावनांसह नव्या वाटेशी तिला एकरूप करतात.

जावईसाहेबांनी थोडा हा विचार करायला हवा. दोन-चार दिवसांचा पाहुणचार संपल्यावर केव्हा एकदा आपल्या घरी जातो असं आपल्याला होऊन जातं. पुन्हा एकदा नेहमीच्या जागी आपले आई-बाबा दिसले की रुटिन सुरू होतं. दोन-चार दिवसांत आपली ही बेचैनी; तर पत्करलेल्या घरात नव्याने रुजताना तिच्या मनात कुठली कालवाकालव होत असेल! 'सहजीवन' हा केवळ परिसंवादातला पोकळ शब्द नाही, ती पती-पत्नीची आचारसंहिता आहे. हे जाणून मन जरा स्वागतशील झालं, तर आनंदाचं चांदणं शिंपणारी ही चंद्रिका दोन्ही घरांची अंगणं उजळू शकेल! जावई आणि सासू यांच्या नात्याला माय-लेकराचं परिमाण मिळू शकेल!

## १०. अश्रूंचं मोल

गोडबोलेसर खरं तर गणिताचे. म्हणूनच ऑफ तासाला ते वर्गात आल्यावर जरा चेहरा टाकलाच होता आम्ही. पण अनपेक्षितपणे सर म्हणाले, 'आज मी तुम्हाला महादेवशास्त्री जोशी यांची 'मानिनी' ही कथा वाचून दाखवणार आहे.' गोडबोलेसर कथा वाचत होते. वाचता वाचता त्यांचे डोळे भरत होते. नकळत आमचेही डोळे तरारले होते. शास्त्रीजींच्या वाक्या-वाक्यांत व्यक्तिरेखांची स्पंदनं होती. घरात येऊ पाहणाऱ्या दारिद्र्याला प्रयत्नांचं कुंपण उभारून प्रवेश नाकारणारी 'मानिनी', श्रीमंत भावानं गरीब बहिणीला भर पंगतीतून हाकलल्यानंतर निमूटपणे जाणारी मानिनी आणि तिच्या परिस्थितीने कायापालट केल्यावर मग भावानं दिलेल्या निमंत्रणानंतर दागिन्यांनाच जेवू घालणारी मानिनी, 'हे काय गं ताई?' असं भावानं विचारल्यावर 'यांनाच तर तू बोलावलंस. तेव्हा तर मी आले होते,' असं सांगताना सात्त्विक स्वाभिमानानं सुंदर दिसणारी मानिनी... ऐकताना आमचा सातवीचा वर्ग जसा पाझरत होता.
... मध्ये २५-३० वर्षं निघून गेलीत, पण मनातली ती 'मानिनी' तशीच अभंग आहे. आज वर्गात हीच कथा मुलांना मी वाचून दाखवली. पण तो मजकूर ऐकताना मुलांच्या डोळ्यांत पाणी तर दूरच, पण 'हा काय बहिणीचा आचरटपणा?' हा भाव होता. कथा संपली. जणू ती सुरू झालीच नाही. उत्कटतेनंही डोळे भरणारी ती श्रीमंती कुठं गेली?

'श्यामची आई' चित्रपट शाळेतर्फेच मुलांना दाखवला गेला होता. नाशिकच्या 'सर्कल' टॉकीजमध्ये. 'भरजरी गं पितांबर दिला फाडून, द्रौपदीशी बंधू शोभे नारायण' हे गाणं श्यामची आई गाताना नकळत डोळे भरले होते. श्यामची आई मरण पावते, तेव्हा श्यामला होणाऱ्या स्वप्नातल्या भासानंतर डोळे पाझरणं स्वाभाविकच; पण या गाण्यातल्या शब्दांनीही पापण्या भिजल्या होत्या. त्या भिजलेल्या पापण्या हे कलाकृतीनं दिलेलं नक्षत्रांचं देणं होतं. कॉलेजच्या वेळात आज जे चित्रपट मुलं पाहतात, ते बघता हा आतल्या समृद्धीचा अनुभव मुलं घेत असतील का? असा प्रश्न पडतो.

डोळ्यांतलं एक पाणी श्रद्धेचंही असतं. ते काय समजावून येणार आहे? एखाद्या शोकाकुल घटनेनंतर, शारीरिक वेदनेनंतर येणारे अश्रू आणि उत्कटतेनं, संवेदनेनं थरारून भरणारे डोळे यातली तफावत सांगणार कशी? आज मुलांच्या आतल्या सतारीच्या तारा पार गंजून वाजेनाशा झाल्यात का? 'पैसाच मिळव' हे सांगणाऱ्या तंत्रज्ञानामुळे आयुष्य श्रीमंत करणारे हे पाणी... काळजातले हे झरे आपण आटवून तर टाकत नाही ना?

नर्गिस-राजच्या प्रणयदृश्यानंही असे उत्कटतेचे अश्रू आपण अनुभवले आहेत. कृष्ण-धवल रंगातल्या त्या चित्रपटातही ती मंडळी हृदयातले केवढे रंग मिसळत होती! त्या वयातही- आणि आताही ती दृश्यं बघताना वाटतं- कुठंही उघडेवाघडेपणा नाही, बघताना संकोच वाटावा अशी सलगी नाही; पण नुसत्या डोळ्यांतल्या एखाद्या लाघवी छटेनं मधुबाला, नर्गिस, वहिदा, राज, दिलीप, देव काय कमाल करायचे! आज तोकड्या वस्त्रांतल्या कवायतीतील सामूहिक प्रणयदृश्यं पाहताना आजच्या मुलांना तो राज-नर्गिसचा थरार येत असेल का? केवळ 'आपलं वय झालं' म्हणून ही तक्रार आहे, की ही मुलं ती शृंगाराची सूचक उत्कटता न जाणताच प्रौढ होणार, याची कासाविशी आहे, समजत नाही!

विश्राम बेडेकरांची 'रणांगण' आधी चक्रधर-हॅर्टाच्या झपाटलेपणानं बेधुंद होऊन वाचली. मग त्याच आवेगात दोन-चार वर्षं शिकवली. त्या-त्या वेळी 'रणांगण' ही कादंबरी कसली? कविताच वाटली! मनातल्या मनात हॅर्टाचीच वाट बघत समुद्राकडे पाहात डेकवर उभ्या असलेल्या चक्रधराला 'मी आले आहे' हे सांगणारी हॅर्टा पुस्तकातून थेट हृदयात शिरली; तेव्हा डोळ्यांत आलेल्या अश्रूंना काय नाव द्यायचं? 'इजाजत'मधलं गुलजारचं गाणं! गाणं कसलं? जिणंच ते! 'मेरा कुछ सामान आपके यहाँ पडा है; हो सके तो लौटा दो!' म्हणताना जगलेल्या, विरघळून अनुभवलेल्या आठवणी ती परत मागते. ते परमोच्च क्षण पुन्हा परत देता येतील? ही कविता ऐकताना असं वाटत नाही का, की आपण आपला भूतकाळ ऐकतोय? ते ऐकताना व्याकुळणारे, कुणालाच दिसणार नाही अशी काळजी घेणारे डोळे- आपण आपल्या पुढील पिढीला देतोय?

चाळीस सेकंदांत तीन खून पाहणारी आणि राजकारणातली टोळीयुद्धं, मना-मनांच्या खरेदी-विक्रीचे लाचार क्लब थेट पडद्यावरून घरात पाहणाऱ्या नव्या मुलांचा तरी काय दोष? ती मनाने भक्कम होत आहेत असं कुणी म्हणेलही. पण ती मुर्दाड होत आहेत, हे खरं दुःख आहे.

'तुझ्या जिवाच्या आकाशावर
अशी सुरंगा राहते रेलून'

ही इंदिरा संतांची ओळ वाचून, बोट पुस्तकात तसंच धरून त्यांनी आभाळाकडे पाहत हरवून जायची श्रीमंती कधी बरं अनुभवायची?

हरीप्रसादजींची बासरी प्रत्यक्ष ऐकताना स्वरांचं जे गोकुळ अंतर्यामी जागं होतं, तेव्हाची अनुभूती… एकुलता एक मुलगा धारातीर्थी पडल्यावरही 'अजूनही एखादा मुलगा असता तर देशासाठी रणांगणावर पाठवायची तयारी होती,' असं सांगणाऱ्या वीरमातेचं मनोगत ऐकताना ऊर भरल्यानंतरचे अश्रू… अब्दुल कलाम जेव्हा म्हणतात, 'मी नेहमीच भारतीय आहे-' तेव्हा दाटणारा आदर… भूकंपग्रस्तांसाठी खाऊचे पैसे देणारी बालके… शिखर सर करणारा युवकांचा चैतन्यमय समूह… एक ना अनेक क्षण अश्रूंचे नाना तरंग घेऊन काळजात उठतात. हे क्षण आपल्या मुलांना वेळात वेळ काढून जगू द्यायला हवेत. कळो-न कळो, एखादी अभिजात गाण्याची कॅसेट मुलाला भेट द्यायलाच हवी. शास्त्रोक्त संगीताची, वादनाची मैफल ऐकवायलाच हवी. हजारो पुस्तकांची कपाटं असलेली वाचनालयं, ग्रंथ-प्रदर्शनं, चांगल्या दर्जाची नाटकं, अलीकडचा 'भेट'सारखा उत्कृष्ट मराठी चित्रपट दाखवणं- हे जगणं तरल करण्यासाठी आवश्यकच आहे. वेळ नाही म्हणून या गोष्टी आपल्या मुलांच्या आयुष्यात आल्याच नाहीत, तर अश्रूंचं सामर्थ्य त्यांना कधी कळणारच नाही. संवेदनांनी समृद्ध होणारं 'माणूसपण' न गाठताच ती फक्त श्वासोच्छवास घेणारी यंत्रं होतील.

बुजुर्ग भावगीत-गायक गजाननराव वाटवे यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं- 'भावनाप्रधान मन हेलावतं. गहिवरून येतं. जीवनात ज्या कलावंताने दुःखच भोगलेलं नाही, तो कलावंत कधी गहिवरूनच येऊ शकत नाही. असा माणूस मुळात भावुकच होऊ शकत नाही.' माणसाचं भावुकपण हरवलं तर उरलंच काय त्याच्याकडे? हे भावुकपण म्हणजे दुबळेपण नव्हे. जगताना अनेक महोत्सव पदोपदी प्रकटत असतात. ते त्यालाच कळताच- ज्याच्याकडे हुरहुरणारं मन आहे. त्यालाच कळते सावळी पावसाळी झुळुक… आषाढी बरसात… श्रावणी सप्तरंगी तान… नाही तर बोरकरांनीच म्हटल्याप्रमाणे-

मनुजाचे परि चित्त कोडगे
वर्षेतही उपडेच गाडगे!

मग हे उपडं गाडगंच कोरडेपणानं वाढू लागतं. वयाचे वाढदिवस साजरे करतं. हा कोरडेपणाच जगू लागतो. वृद्धाश्रमात ठेवलेल्या विकल आईच्या वाढदिवसाला केवळ कुरिअरने पुष्पगुच्छ पाठविण्याइतपत तो यंत्र होतो. किंवा एका वृद्धाश्रमाच्या संचालकांनीच सांगितल्याप्रमाणे वडिलांच्या निधनाचे वृत्त कळताच 'बॉडी पाठवू नका. फ्यूनरलसाठी पैसे पाठवून देत आहे. उरकून घ्या…' इतपत तो हृदयशून्य होतो.

असे तरुण पुढील काळात वाढणार आहेत. दिशा चुकलेली प्रसारमाध्यमं त्यांना हिंसेचं, पशूतेचं बालामृत देत आहेत. त्यांना वेळीच कळू द्यायला हवं- अश्रूंचं मोल! तरलतेची श्रीमंती!

# ११. दिल्या घरी...

चित्रपटात असती तर प्रेक्षकांना ‘इमोशनल ब्लॅकमेलिंग‘ करण्यासाठी, गल्ला भरण्यासाठी दाखवतात तशातली घटना म्हणून ती सोडून देता आली असती. पण समोरच्या या धगधगीत पत्राचं काय करू? लेखिका असलेल्या सुविद्य आईचं हे पत्र. उच्च पदवीधर मुलीची लग्नानंतरची फरफट मांडणारं. एक इंजिनीअर तरुण आपल्या बायकोशी असं वागू शकतो? पहिल्याच रात्री त्यानं सुरू केलेला हा वनवास जवळजवळ वर्षभर ती मिटल्या ओठांनी गिळू शकते? रोज रात्रभर भिंतीला टेकून उभं राहायचं. आणि पलंगावर लोळत तिचं ते अश्रूपूर्ण उभं राहणं तो ‘एन्जॉय‘ करणार. पुन्हा- ‘याद राख, बोललीस तर कुठे!‘ नंतरचा कळस- भिंतीवर डोकं आपटायला सुरुवात. हे सगळं केव्हातरी बदलेल, या आशेनं ती सहन करते. का? तर आई-बाबांवर आणखी मोठी जबाबदारी आहे. एकच भाऊ; तोही ‘स्लो लर्नर.‘ त्याचं आयुष्य त्या दोघांना उभं करायचंय. विलक्षण हळुवार असलेल्या त्या दोघांच्या आयुष्यात आता हा आणखी निखारा नको... सहन करू. मग केव्हातरी असा क्षण येतो. देहाला सोसणं अशक्य होतं. तो देहच प्राणापासून खुडला जातो. देठातच गुदमरलेल्या अशा कितीतरी कळ्या... परंपरेनं मुलीच्या रक्तात उगाळलेली उपदेशवाणी- ‘दिल्या घरी तू...‘ सुखी कसं राहायचं? उंबरठा ओलांडताना पूर्वसंचिततातला भाग्याचा गृहीत संदर्भ बदलत जातो.

समोरच्याच इमारतीतील अपर्णा. पूर्वीची माझी विद्यार्थिनी. गुणी मुलगी. अशीच सहा महिन्यांत परत आलेली. आयुष्य उमजल्याचा पोक्तपणा घेऊन परतलेली. परीकथेतल्या राजकुमाराचं गाणं गुणगुणणारी. पण त्या परीकथेत राजकुमाराच्या पोशाखात दुसरंच कुणी आलं. या सत्यकथेनं भाजून निघालेली.

एका संध्याकाळी ती घरी आली. आधी अश्रूंनी मोकळी झाली. मग शब्दांनी वाहती झाली. ‘जरा भाजी ह्यांच्या मनासारखी नाही झाली की शिक्षा! ती सगळी कढईभर भाजी समोर बसून खाऊन दाखवायची. जरा भाकरी एखाद्या कडेला नीट भाजलेली नाही असं दिसलं, की तोच तवा पुन्हा तापवायचा आणि तापलेल्या तव्यावर तळहात ठेवायचा.‘

अपर्णानं तिचे भाजलेले तळहात दाखवले. ‘हे सगळं कसं...?‘ ‘सर, माझा भाऊ भयानक तापट. त्याला कळलं असतं तर त्यानं माझ्या नवऱ्याचा कोथळाच बाहेर काढला असता. दोनच महिन्यांत तो दुबईला जाणार होता. त्याला जाऊ दिलं आणि मगच आई-बाबांना सांगितलं. असलेली नोकरी वेड्यासारखी सोडली. जाऊ दे संपलं ते. आता कायदेशीर होईल सगळं. पण पुन्हा नव्यानं उभी राहणार आहे मी. अशावेळी पूर्वी वाचलेलं, वर्गात शिकवलेलं मदतीला येतं. अर्ज टाकायला सुरुवातही केलीय.‘ तिच्या चेहऱ्यावर निर्धाराचं हसू होतं. जणू तिनंच आमचं सांत्वन केलं.

वाट पाहण्याची हद्द असते. तितकी वाट पाहून वेगळ्या वाटा शोधणाऱ्या या मुलींबद्दल अभिमान वाटतो. पुरुषी अहंकाराच्या घशात आपलं सर्व आयुष्य आंधळेपणानं लोटून देणं म्हणजे समर्पण नव्हे. अशा समर्पणाचं परंपरा कितीही कौतुक करो; आपलं जगणं विव्हल करण्याचा कुणालाही अधिकार नाही, एवढं शहाणपण ‘दिल्या घरी‘ गेल्यावरही मुलींकडे हवंच!

बोलक्या मुलींची ही झाली मुकी व्यथा. पण खऱ्या मुक्या मुलीची बोलकी कथा कळली आणि धक्काच बसला. दिघेबाईंच्या त्या अत्यंत गुणी मुलीला मी अगदी बालपणापासून पाहत होतो. शब्दांचा मुकेपणा सोडला तर डोळ्यांनी, हावभावांनी इतकी बोलकी, की शब्दांशिवाय केवढ्या गप्पा होतात, हे कळावं. आजारी, खंगलेल्या नवऱ्याचं आजारपण काढून, वर मुक्या मुलीचं करतानाही दिघेबाईंची प्रसन्नता कधी ढळली नाही. घरी गेलं की त्या आणि पिंकी असं स्वागत करायच्या, की मन खुलून जावं. आपल्याला जाणवणाऱ्या या काळोखाचं प्रकाशात रूपांतर करण्याची आगळी जिद्द दिघेबाईंमध्ये आम्ही अनुभवत होतो. चांगलं स्थळ चालून आलं. दिघेबाईंनी विदर्भात दूर कुठेतरी पिंकीची पाठवणी केली. जवळच्यांनी म्हटलंही- ‘मुलगी अशी! त्यामुळे समोरच हवी होती. कुठे ठाणे! कुठे...!‘ दिघेबाई प्रसन्न हसत सांगायच्या- ‘मुलगा चांगला आहे. थोडं व्यंग आहे बोलण्यात; पण बाकी बरा आहे.‘

सात्त्विक, सज्जन माणसांचेही काही फासे उलटे पडतात. मुलीच्याही जबाबदारीतून मोकळे झालो, ही त्यांची जाणीव भ्रमच ठरणार होती. इकडे देवाचे आभार मानणाऱ्या दिघेबाईंची मुलगी तिकडे कुठल्या दिव्यातून जात होती! त्या फोन करायच्या अधनंमधनं. मुलगी फोनवर काय बोलणार? पत्र कशी लिहिणार? प्रत्यक्ष दिसल्याशिवाय लेक आईला काय सांगणार?

तीन-चार महिन्यांनी दिघेबाई सहज म्हणून लेकीकडे गेल्या आणि लेकीच्या तुरुंगाच्या सळया सैल झाल्या. हंबरडा फोडत पिंकी कुशीत आली. 'आधी घरी ने, मग सांगेन-' सुचवू लागली. हुशार आईनं सगळं स्पष्ट विचारल्यावर कळलेलं रहस्य असह्य होतं. मुलात केवळ बोलण्याचंच व्यंग नव्हतं, निसर्गाने त्याला केवळ दिसण्यातच पुरुष केलं होतं. मुकी मुलगी केली तर ती सांगणार कोणाला? या भ्रमानं अशा मुलाचं लग्न करण्याचा अधमपणा सासरच्यांनी केला होता. संकट इथवरच नव्हतं. सुस्वरूप, तरुण पिंकी. मुलगा असा. तिच्यावर लुब्ध होणारा माणूस- वडिलांच्या जागेवर शोभेल असा?

तळहातावरच्या दवबिंदूसारखं जपलेल्या मुलीला दुसऱ्याच्या घरात अलगद सोडताना प्रत्येक आई-बाबा किमान विश्वासाची अपेक्षा करतात. सुखाच्या शिखरावर नको, पण निदान सरळ पाऊलवाटेनं संसार चारचौघांसारखा झाला तरी पुरे, एवढी अपेक्षा करतात. मुलगी कितीही शिकली, स्वतःच्या पायावर उभी राहिली, तरी चार-दोन घटनांमुळे ती सर्वच विस्कटत नाही. किमान नवऱ्याची बरी साथ असेल तर ती उरलेला काळ सहन करायला सज्ज होते. पण ज्याच्याशी प्रत्येक क्षणी संबंध येणार, ती साथच किडलेली, कुरतडणारी असेल, तर तिनं समाजानं 'सुखी राहा' सांगितलंय म्हणून सुखी कसं राहावं? विटलेली साडी, भेसळीचा दागिना, गळणारं घर, पोचा पडलेलं पातेलं पत्करता येईल. पण बायकोचं आयुष्य दुःखमय करीत तिला रोज रडवणं हेच आपलं पौरुष मानणाऱ्या रानदांडगोबाला कसं पत्करायचं? ज्याच्या सोबतीनं आगीचे सर्व डोंगर पार करायचे, तोच जर आगीत ढकलू लागला... कधी प्रत्यक्ष, कधी मानसिक- तर हे सगळं एकविसाव्या शतकातल्या युवतीनं कशासाठी सहन करायचं? परंपरा म्हणून? आई-बाबांना आता नवा त्रास नको म्हणून? समाज, नातेवाईक काय म्हणतील म्हणून?

आपलं जगणं फक्त आपणच जगत असतो. त्या जगण्यावर आपला पूर्ण हक्क आहे. वेळीच उठाव नाही केला, तर सहनशीलतेचे रूपांतर गुलामीत होतं. त्याआधीच उभं राहायला हवं. स्वत्वाच्या शोधाची किंमत द्यावीच लागते. ती चुकवताना कधी श्वास गुदमरतोही. खूप पुढे गेल्यावर मागे येणं अवघड असतं, पण वेळीच योग्य वळणावर निर्णय घेणं- यातच पुस्तकी शिक्षणापलीकडचं शहाणपण असतं!

## १२. जखमी मनांच्या बेटावर

जगाच्या नकाशावर धुंडाळूनही सापडणार नाही अशा बेटावर आपण नकळत उतरतो. एखाद्या अलवार क्षणी. ते असतं जखमी हृदयाचं बेट. कधी आपण असतो त्या बेटावरचे प्रवासी, तर कधी असतो रहिवासी! इथं येण्यासाठी नको कुठलीही कागदी औपचारिकता. हवी असते फक्त केव्हातरी, कुठेतरी एखाद्या अनाम क्षणी झालेली खोल पाझरती जखम. नातं त्या जखमेशीच जडतं. रात्रीच्या कुशीत आसपासचे डोळे मिटू मिटू झाले की जखमा डोळे किलकिले करतात... वाहू लागतात.

चिपळूणचा रोहित असाच आठवत राहतो. कार्यक्रमानंतर अनेकजण भेटतात, त्यातलाच तोही. पण डोळ्यांतली भावदर्शी चमक अन् हस्तांदोलनातील मैत्रभाव सांगून जातो- 'अजून बोलायचंय. भेटायचंय. पण कसं बोलू? कुठं भेटू? तुम्ही तर आता निघून जाणार.' गर्दी ओसरल्यानंतरचं त्याचं रेंगाळणं आपण मनानं जे जाणलं, ते जाणणं अधोरेखित करतं. चटकन् मी बोलून जातो- 'भेटू या आपण आजच. जरा थांब.' तो चपापतो. सुखावतो. उद्या परतीसाठी निघायचं असतं. संयोजकांना कुशल झुकांडी देऊन मी त्याला म्हणतो- 'निघू या.' तो विचारतो- 'स्कूटर आहे. चालेल?' आपण 'हो' म्हणतो. 'कुठं जायचं?' त्याचा आदरभाव जपत प्रश्न. मी अनपेक्षितपणे म्हणतो, 'तुझ्या जिवलग व्यक्तीबरोबर तू कुठं जातोस, तिथं.' तो प्रेमळ हसतो. अगदी किंचित, पण सूचक. चांदण्यात ओलसर वाटणाऱ्या चकाकत्या रस्त्यावरून वारा भेदीत स्कूटर एखाद्या लयदार तानेसारखी झुळझुळते. निःशब्द. अजून ओळख व्हायचीय त्याच्याशी. पण जणू झालेय अशी घट्ट समजूत. उतारावरील अनेक वळणं ओलांडीत खाडीच्या चांदीच्या लवलवत्या लाटांच्या अलीकडे स्कूटर थांबते. आभाळ तारका न पेलून ओझावलेलं असतं. दोन-चार काजवे काळोखाला सजवत निघून जातात. खडक असूनही मुलायम वाटणाऱ्या एका खडकावर तो नेतो आणि जरा कापऱ्या वाटणाऱ्या स्वरात म्हणतो, 'इथंच यायचो आम्ही!'

'यायचो!' तेवढाच शब्द भिरभिरत राहतो. दोन तासांपूर्वी माहितीही नसलेल्या एखाद्यावर एवढं विश्वासून माणसं आपलं मन मोकळं करतात? नक्कीच करतात. बघतो तेव्हाच ओळख होते का? तेव्हा तर भेट होते! संवाद तर अनेक माध्यमांतून सुरूच असतो. लेखक, कवी, कलावंतांशी रसिक केवढं खोलवर नातं जोडतो- आपलं माणूस समजून! आपल्या सर्व व्यथा-वेदनांचा सहयात्रिक मानून मनं कशी वाहू लागतात, त्याचा त्या बेटावर मी अनुभव घेतो. तो सांगू लागतो- 'अनेकांच्या बाबतीत घडतं तेच आमच्याही बाबतीत घडलं. पदवीधर आहे मी. नोकरीही आहे. पण लग्नासाठी लागणारी आवश्यक आर्थिक स्थिरता नाहीय. मी स्थिर होईपर्यंत ती बावीसची पंचवीस होणार. रूढीग्रस्त घराला मुलीचं अविवाहितपण अजून तीन वर्षं पेलणार नाही. मित्र खूप म्हणाले, 'पुढचं पुढे- लग्न करून टाक. पळून जाऊन. पण धैर्य नाही झालं. दोन मोठ्या बहिणी लग्नाच्या आहेत. वडील निवृत्त आहेत.'

कितीतरी वेळ कुणीच कुणाशी बोललं नाही. न बोलणंही किती बोलकं असतं! अशा दुभंगलेल्या परीकथा अनेक आहेत. या कथेचे नायक-नायिका म्हटलं तर सामान्य असतात. पण या वेदनेच्या काहिलीतून सृजनाची अनेक रूपं अंकुरतात. कधी हे रूप कवितेचं... कधी चित्राचं... कधी गाण्याचं... 'ये शामकी तनहाईयाँ... ऐसे में तेरा गम.' मुळातल्या कर्तृत्ववान व्यक्तीला आयुष्यात योग्य वेळी झालेला डंख नवे पंख देतो. सर्व बळ एकवटून आयुष्याला नवी गती देण्याचं दुर्मिळ कसब अशा माणसांकडे असतं. पेशव्यांच्या भिकबाळीकडे बघताना पायावरची पाण्याची धार चुकलेल्या रामवर जेव्हा पेशवे कडाडले, 'अरे, पात्रता आहे का तुझी या भिकबाळीकडे बघण्याची? तू एक अतिसामान्य पाणक्या. निमूट पाणी ओत.' तेव्हा दंश झाला. पण त्यातूनच रामचा रामशास्त्री प्रभुणे झाला. 'नारायणरावाच्या हत्येसाठी देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नाही,' हे ठणकावून सांगणारे निःस्पृह रामशास्त्री! आपल्यामध्येही असे अनेक असतील... पूर्वीच्या अवमानातूनच ऊर्जेवरील बंद मोहोर उघडून ऊर्जावंत झालेले! जिथं घाव खोल, तिथंच गती, प्रगती! जखमशून्य आयुष्य मऊ... गुळगुळीत!

क्रौंचपक्ष्याच्या आनंदमग्न युगुलाच्या चिरविरहातून रामायणाचा पहिला उद्‌गार उगवला. केव्हा महाकाव्यं शब्दांची असतात, केव्हा प्रत्यक्ष जगण्याची. योग्य वेळी घाव होणं यासारखं भाग्य नाही. पण त्यातला गतीसंकेत

ओळखण्याची कुवत हवी. पुढे वाटा सापडत जातात. पण आधी काटा रुतायलाच हवा. जखमांच्या तऱ्हा वेगळ्या. कुणाला विरह, कुणाला दारिद्र्य, कुणाला व्यंग, कुणाला निव्वळ उपेक्षा! परीक्षेतून अगदी प्रत्येकाला जावंच लागतं. फरक एवढाच की, काही पेपर अवघड, काही फार अवघड.

एक झब्बा-लेंगा न् पाच रुपये घेऊन बेचाळीस वर्षांपूर्वी कोकणातून मुंबईत आलेले आपले वडील फूटपाथवर झोपून, हमाली करून पोर्ट ट्रस्टमध्ये लागले. जिन्याखालच्या एका खोलीची नंतरची सुरुवात आताच्या फ्लॅटमध्ये रूपांतरित झाली. त्यांच्या काकांनी म्हटलं, 'फुक्कट खातोस. बैलही काम करतो, पण तू एरंड; काय उपयोग? तोंड का नाही काळं करीत?' या वाक्यासरशी तो तरुण घराबाहेर पडला. हरला नाही, झुंजला- जिंकला. जखम झाली म्हणून गतिमान झाला. नाहीतर बसला असता तिथंच विड्या ओढीत. ते आपले वडील, आपला भाऊ; त्यांच्या जगण्यातून आज सगळं सहज 'रेडीमेड' मिळालेली मुलं काहीच का शिकणार नाहीत? पूर्ण 'दंशप्रूफ' आयुष्य असल्यानंच आज गतीत आवेग नाही. जोश नाही. काही मिळवायचंय, ही हिंमत नाही. मनोरंजनाच्या पाकात जसे गुलाबजाम लोळत पडलेत!

पंधराव्या वर्षीच दुर्दैवानं वैधव्य आलेली एखादी स्त्री पदरातल्या तान्ह्या बाळाला शिवण-टिपण करून वाढवते. एकेका टाक्यानं आयुष्य जोडते. माहेरी संवाद ठेवते, पण आधारासाठी हात पसरत नाही. सासरचं छत्र नाकारत नाही, पण लाचारीचा आडोसा घेत नाही. अशा असंख्य स्त्रिया आपण बघतो. दैवानं घाव घातला, पण त्या मोडल्या नाहीत. बळ एकवटून उभ्या राहिल्या. आपल्या भेगाळलेल्या तळहातांनी मुलापर्यंत येणारं वादळ अडवीत राहिल्या. त्याच माऊलीला पुढे हे चिरंजीव विचारतात, 'आई, काय केलंस गं तू माझ्यासाठी? सगळं तर माझं मीच केलं.' भूतकाळ ट्रंकेतून काढून दाखवता येत नाही. कृतघ्नपणातून उगारलेल्या प्रश्नांना उत्तरं ऐकायचीही इच्छा नसतेच. अशा वेळी होणारी जखम असह्य असते. एकाकीही!

जगातली कोणतीही- अगदी यशाच्या सर्वोच्च शिखरावरची कोणतीही व्यक्ती आठवा. त्या शिखराचा उगम एखाद्या दंशातूनच असतो. केव्हातरी चरित्रातून, केव्हातरी प्रत्यक्षातून अशा बेटावरचे आपणही प्रवासी व्हावे. आपल्या स्वयंकेंद्रित, गुळगुळीत, तुपट सुखीपणावर चरे ओढावेत. बाणाच्या टोकाने काळजावर मूळाक्षरे लिहिण्याचा प्रयत्न करावा. अशा वेळी ओघळणाऱ्या जखमेतून आपल्या हातून काहीतरी वेगळं निर्माण होईल. ते किती उत्तुंग होईल हे नंतर; पण ती जखम आपल्याला चेहरा देईल. केव्हातरी उतरावेच सुखाच्या आकाशातून... या जखमी मनांच्या बेटावर!

## १३. चौकशी सम्राट

'प्रवीण अनंत दवणे.'
'दवणे? दवणे म्हणजे कोण हो?'
'प्रवीण अनंत दवणे.'
'नाही, तसं नाही.'
'मग?'
'कोकणस्थ का देशस्थ?'
'पांथस्थ.'
हवं ते उत्तर हाती लागत नाही म्हटल्यावर चौकशीसम्राट दुसरीकडे गळ टाकतात.
'सासुरवाडी कुठची?'
'पुण्याची.'
'ते माहीतेय हो. म्हणजे तिथलं आडनाव काय?'
'देशमुख!'
पुन्हा संभ्रमाचा भोवरा.
'देशमुख? म्हणजे मराठा की...?'
जरासं स्नेहानं बोललं की चौकशीसम्राट उगीचच नस्त्या चौकशा करीत राहतात.
याच जातकुळीतला एखादा घरी येतो. मिळालेली मानचिन्हं, पारितोषिकं पाहून किल्ली सुरू-
'हे काय?'
'गोल्ड डिस्क... सुवर्ण ध्वनिमुद्रिका.'
'काय सांगता?'
'शप्पथ!'
'नुसतं सोनं, की पाणी लावलंय वर?'
'दहा-बारा वर्षं झाली, अजून पाणी उतरलेलं नाही, म्हणजे बहुधा...'
'पण काय हो, अंदाजे किती तोळं सोनं असेल या प्लेटीत?'
'वितळवल्यावर कळवीन.'
एक खजिल हसू. कुतूहल भलतंच!
कुठल्या गाण्यासाठी हा सन्मान झाला? कुणाच्या हातून मिळाला? गाणं सुचतं कसं? चित्रपटासाठी लिहिताना काय अडचणी येतात? ध्वनिफितीसाठी भावगीत लिहिताना आणि इतर माध्यमांसाठी लिहिताना काय फरक आहे? असं काहीतरी विचारलं तर ते कुतूहल पूर्ण करण्यात कलावंतालाही आनंद होतो.
चौकशीसम्राटांच्या चौकशी-विषयाच्या अनेक छटा आपण नेहमी अनुभवतो. शेजारच्याच दशपुत्र्यांना दुसऱ्याची खरेदी कशी महागात पडली, हे दाखविण्याची अनावर आकांक्षा!
रविवारच्या वाचनीय सकाळी ते घरात येतात. येतात ते रणशिंग फुंकतच- 'आहेत का साहेब? की दौऱ्यावर? व्वा! पेपर वाचताय? व्वा!'
'या. या.'
'व्वा, फॅन नवा का? क्या बात है! अभिनंदन!' अभिनंदन स्वीकारताना त्यांना मी पाण्याचं तांब्या-भांडं देतो.
'केवढ्याला पडला?'
'कालच लावलाय हो.'
'कळलं ते! पडला म्हणजे किती?' बोटांनी नोटा मोजतानाची खूण.

'हजार.'
'हज्जार?'
'का हो? स्वस्त म्हणून की महाग म्हणून? दचकलात का?'
'स्वस्त? खरंच दवणे, तुम्ही कविताच कराव्यात. व्यवहार म्हणून तुम्हा मंडळींना-'
माझ्या हातून झालेल्या अव्यवहारांची यादीच डोळ्यांपुढून सरसरू लागली. 'तरी कितीला मिळायला हवा होता?'
'मला भेटायचंत ना त्याआधी.'
'आता मला काय माहिती, पंख्याची एजन्सी-बिजन्सी आहे तुमची ते! आणखी एक आणायचा आहे.'
'नंतरचं नंतर. पण यात तर फसलात ना? मी दोनच वर्षांपूर्वी घेतला. फक्त आठशेला!'
दोनशे रुपयांचं नुकसान झाल्याचं कळल्यानं पंखा फुल्ल करूनही मला घामाच्या धारा लागल्या.
'हजार म्हणजे टू मच-'
आलेल्या चहाच्या पहिल्या घोटानं हे 'मच्' जरा अधिकच 'टू मच' झालं. नंतर जरा खाजगी स्वर काढून त्यांना म्हणालो,
'खरं सांगू का?'
'सांगा ना-'
'हा फॅन मला फुकट मिळालाय.'
'काय सांगता?'
'खरंच! सांभाळा. चहाचा कप.'
'फुकट? शक्यच नाही. फिरकी घेताय. फुकट कोण देणाराय?'
'विद्यार्थ्यांनी सप्रेम भेट दिलाय- निरोप समारंभाला.'
'अस्सं? मग आधी नाही बोललात ते?'
'मग हल्लीच्या बाजारभावापेक्षा आणखी स्वस्त कुठे मिळतो, हे मला कसं कळलं असतं? आणखी एक घ्यायचा आहे. शिवाय साबण, टूथपेस्ट, अमृतांजन- बरंच घ्यायचंय आज. सांगा- बाजारभावापेक्षा स्वस्त कुठे मिळेल हे सगळं?'
प्रकरण हसत-खेळत अंगाशी येतंय म्हटल्यावर दशपुत्रे विषय बदलतात.
एखादा फोन येतो. पहिल्या 'हॅलो'लाच आवाज ओळखून कट करावासा वाटतो. पण बोलून 'चुकलेलो' असतो.
'बोला.'
'काल पाहिलं तुम्हाला-'
'त्यात काय, आपण भेटतोच की चार-पाच दिवसांत एकदा-'
'तसं नाही. काल बसस्टॉपवर-'
'हो. हो. होतो खरा.'
माणूस काय बसस्टॉपवर, थिएटरमध्ये, फूटपाथवर, रेल्वेस्थानकात कुठेही दिसू शकतो. त्यांच्या दोन शब्दांतील रिकाम्या जागा काही वेगळंच बोलत होत्या.
'तसं नाही. ती बरोबर कोण होती? तुमची बायको नक्कीच नव्हती.'
'चुलत बहीण होती.'
'चुलत बहीण? शक्यच नाही. बस आल्यावर अगदी हात धरून...'
'डॉक्टरांकडे घेऊन चाललो होतो. मलेरियाचा अॅटॅक येऊन अशक्त झालेय. पण काय हो, तुम्हाला एवढ्या का चौकशा?'
'तसं नाही. तुम्ही मंडळी- नेम नाही. छोडो. नवं काय?'

स्त्री-पुरुष एकत्र दिसले की ही 'भानगड'च असणार, या घट्ट समजुतीने अस्वस्थ होणारे हे असे चौकशीबाज. स्त्री ही कधी बहीण, कधी मैत्रिण, कधी विद्यार्थिनी, कधी सहकारी असते. पण ही नाती अनेकांना माहीत नसतात. आजच्या सहजीवनाच्या समाजरचनेतही एवढे भोवरे; तर चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी स्त्री-पुरुषांना कुठल्या संशयकल्लोळाला सामोरं जावं लागलं असेल?

चौकशीचीही एक उबदार पाकळी असते. त्यात माया, ओलावा, स्नेह यांचं शब्दातीत रसायन असतं. एकाकी मनाला सहकार्याची, आजारी व्यक्तीच्या प्रकृतीची, मित्राला त्याच्या प्रगतीचा- अशी नात्याला सोबत देणारी, साद आणि दाद देणारी विचारपूस... यात आपण 'एकटे' नाही, हा ऋजू भाव असतो. पण कुत्सितपणा, दुसऱ्याला खालीच लेखायचं- ही उर्मट मिजास, असुयेचा न लपणारा भाव, माहिती उकरून ती दुसऱ्याला पोहोचवून आग लावणारी, संबंधांत पोकळी निर्माण करणारी काटेरी खलनायकी वृत्ती चौकशीत असली की त्या संवादानं मनात नकारात्मक लहरी वाहू लागतात. काही चौकशीसम्राट आणि सम्राज्ञींना चौकशी कुठे झट्‌कन वळवायची याचं भान नसतं. एखाद्याच्या न्यूनावर बोट ठेवणारी, आयुष्यातल्या अनेक भळभळत्या जखमा आणखी प्रवाही करणारी अनेक माणसं असतात. तो खिळा कशाला काढायचा? अशा वेळी दिवसाचा जुळलेला सूर डळमळीत होतो.

अनेक सज्जन माणसं सभ्यपणापोटी समोरच्याचा अपमान करीत नाहीत. त्यांच्याजवळ पोलादी हातोड्यासारखी उत्तरं नसतात असं नाही; पण संस्कार आणि सौजन्य आड येतं. पण केव्हातरी आचरट चौकशीसम्राटांना सरळ करणारा भेटतोच. पण तोवर कशाला थांबायचं? चौकशीपूर्वी अंतर्मनाला विचारावं, 'हे मना, माझा चौकशी-संवाद योग्य वाटेने चालला आहे ना?' आणि मन कधीही खोटी उत्तरं देत नाही, हे त्रिवार सत्य!

## १४. बळ-एकमेकांच्या पंखांचं!

समाधानाचा स्पर्श नसलेल्या श्रीमंत घरांच्या नगरीतून फिरताना एखादं घर असं सापडतं- अरेच्चा! मनाला आधार आणि उभारी देणारं. हेच घर आपण शोधत होतो. अबान पार्कमधील 'दर्शन' इमारतीत असंच एक घर मला सापडलं. आणि जीव तिथंच गुंतून राहिला. प्रेमाचा अभिनय करीत संसाराची वर्षं वृद्धत्वाच्या किनारी नेणारी असंख्य जोडपी असताना उल्हास आणि अनुराधा आगासकर यांच्या परस्परांवरील प्रगाढ विश्वासाचा आपल्याला आधार वाटतो. पैशापासून शरीरापर्यंत सर्व गोष्टींची साथ असूनही टवके उडालेली आयुष्यं आपण पाहतो. मात्र, उल्हास आणि अनुराधा आगासकरांच्या चेहऱ्यावर नेहमीच 'भरून पावल्याचा' हसरा भाव दिसतो. तेव्हा पुनः पुन्हा आपण खात्री करून घेतो- खरंच दोघेही पूर्ण अपंग आहेत?

कमरेखालून पूर्ण अपंगत्व असूनही त्यांची कशाहीबद्दल कुठलीच तक्रार नाही. कारण आनंदी जगण्याचं सर्वात मोठं रहस्य त्या दोघांना गवसलंय- 'जे आहे ते आहे. स्वीकार करून टाका. परमेश्वरानं दोन्ही पाय काढून घेतले, पण सबळ मन तर दिलंय! आपण मनाच्या पायावर उभे राहून संसार करू,' हे उल्हास आगासकरांचं तत्त्व आहे.

गंमत म्हणजे प्रारंभी अनुराधाताई लग्नच करायला तयार नव्हत्या. पूर्ण अपंगत्व असताना संसाराची जबाबदारी कशी पेलेल? नस्ते गुंते नकोत. पण उल्हासरावांनी एक प्रेमपत्र अनुराधाताईंना लिहिलं. त्या पत्रानंच नात्याला पंख मिळाले. उल्हासरावांनी लिहिलं- 'गरूडाच्या पिल्लाला माहीत नसतं आपल्या पंखांचं बळ. एकदा का भरारी मारली, की सर्व जग पाहत राहील!' आणि खरंच, साथीदाराच्या सहवासाचं बळ मिळालं आणि आता आकाश अगदी कुशीत आलं. आपण दोन्ही पायांनी निकामी आहोत, हेच मानायला दोघंही तयार नाहीत. कारण खास तयार करून घेतलेल्या कारपासून स्कूटरपर्यंत सर्व वाहनं उल्हासराव चालवतात. जिद्दीच्या जोरावर परदेशप्रवासही करून झाला आहे.

इतर आयांप्रमाणे आपण आपल्या मुलीला तिच्या लहानपणी कडेवर घेऊ शकलो नाही, अशी एखादी खास आईची म्हणून असलेली खंत चमकून जाते; पण तेवढीच. अनुराधाताई सांगतात- 'फूटपाथच्या उंचीपासून सार्वजनिक प्रसाधनगृहामध्ये जाण्यासाठी पकडून चढण्यासाठी आवश्यक असलेल्या लोखंडी आधारापर्यंत कसलाही विचार आपल्या समाजव्यवस्थेत नाही. रेल्वेच्या पुलाजवळ अपंगांसाठी एक लिफ्ट हवी. ब्रिजेसच्या खाली सर्व जागा फुकट जाते. तेथे अपंग पुनर्वसन केंद्रं स्थापन करायला हवीत.' उल्हासराव म्हणतात- 'ज्यांना अपंग मुलं आहेत अशा पालकांनी आपल्या मुलांना सारखं 'ओव्हरप्रोटेक्ट' करू नका. इतर मुलांप्रमाणेच त्यांना वागणूक द्या. त्यांचे जादा लाडही करू नका. त्यांची उरलेली पूर्ण शक्ती त्यांना वापरू द्या. 'चुक्चुक्' आणि 'अरेरे' करत राहाल, तर त्यांना तुम्ही आणखी दुर्बळ कराल.'

दु:खी असायला सर्व कारणं असलेलं हे जोडपं अक्षरशः पाहाल तर म्हणाल- हा एवढा आनंद कुठून येतो? आम्हालाही द्या की थोडासा!

सायन हॉस्पिटलच्या अपघात विभागात असंच एक अगदी तरुण जोडपं पाहिलं. राजस्थानचं. राजकुमार नाव त्या मुलाचं. राजकुमारासारखाच राजबिंडा. लग्नानंतर फक्त पंधरा दिवसांत ट्रेनच्या अपघातात राजकुमारचे दोन्ही पाय गेले. शुद्धीवर आल्यावर पायावरची चादर दूर केल्यावर 'पायच नाहीत' हे भेदक सत्य राजकुमारनं पचवलं. विशेष न शिकलेली त्याची बायको म्हणाली, 'जान भी जा सकती थी। भगवानने शौहरकी जान तो बचाई।'

नियती असा एखादा आघात करते, पण या आघाताखालून मनोधैर्याचा असा झराही देते, याचं दर्शन होत होतं. शेवटी नात्यामध्ये काय हवं असतं? अव्यंगपण? सुखवस्तूपण? चंगळवाद? एकमेकांवरील प्रगाढ विश्वास हेच तर सहजीवनाच्या वाटचालीचं सूत्र आहे. आज हा विश्वासच आपण गमावत चाललो आहोत. नवरा-बायको घरात पैसे खर्च करतानाही 'हे तुझे, हे माझे' करताना आपण पाहतो. वाटचाल करताना विभक्त व्हायची वेळ आली तर आपण आर्थिकदृष्ट्या समर्थ हवं, याची इतकी काळजी स्त्री-पुरुष घेतात, की त्यांची नाती कधीच एकमेकांशी एकरूप होत नाहीत. संबंधाच्या उत्कट क्षणीही परस्परांवरील अविश्वासाची एक रेघ शिल्लक राहतेच.

काही वेळा वाटतं- परमेश्वरानं इतकंही अती देऊ नये की, एकमेकाला एकमेकाची गरजच वाटू नये. ‘माझी मी समर्थ आहे, तू गेलास उडत!‘ अशा उर्मटपणाने एखादी स्त्री घराचं लॉजिंग-बोर्डिंग फार तर चालवेल, पण सर्वांना गुंफून घेऊन संसार नाही करू शकणार. या आत्मविघातक भावनेला खतपाणी घालणाऱ्या पालकांचं प्रमाणही वाढत आहे. त्याचमुळे बघा- हल्ली पंचवीसापैकी पाच घरं आतून मोडण्याच्या बेतात आहेत.

एकमेकांच्या सोबतीनं रस्ता पार करणारी, हसत-खेळत चाललेली कित्येक अंध जोडपी आपल्याला दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावरचं निर्मळ हसू येतं तरी कुठून? एकमेकांच्या स्पर्शाचे डोळे करूनच आपल्याला चालायला हवं, या खोल जाणिवेनं एकमेकाला अगदी बिलगून असतात ती. गिरणी-संपात सर्वस्व गमावलेल्या नवऱ्याला एखादी सामान्य स्त्री खंबीर आधार देत म्हणते- ‘काळजी करू नका. दोघांनी मिळून जमेल तेवढे आकाश शिवून टाकू.‘ संकटात द्यायची असते तीच तर साथ! सुखात काय, कुणीही बरोबर राहील!

सामान्यातली सामान्य जोडपी आणि निसर्गानं व्यंगाचा आघात केलेली जोडपी मजेत आयुष्य जगत असताना, ज्यांना सगळं मिळालंय ती कुटुंबं अशी तहानलेली का? बारीकशीही तडजोड करायला तयार नसलेल्या, लगेच संसार मोडायला तयार असलेल्या स्त्री-पुरुषांना ‘का जगायचं?‘ आणि ‘जगण्याच्या सगळ्या धडपडीची बेरीज कोणती?‘ याचा ठावच लागत नाही. त्यांच्या पदवीनं आणि वातानुकूलित केबिनमधल्या लठ्ठ पगाराच्या आर्थिक सुरक्षिततेनं त्यांना, नात्यांच्या या फाडाफाडीत आपण काय गमावतो आहोत, हे शिकवलेलंच नाही. मेंदू, बुद्धिमत्ता, तर्कज्ञान हे सगळं ठीक आहे, पण आयुष्याची अनेक सुखं हृदयाच्या ओलाव्यातच दडलेली असतात. हा ओलावा नसलेली मनं स्वतः धड जगत नाहीत आणि दुसऱ्यालाही सुखानं जगू देत नाहीत.

सर्वस्व हरवूनही अपंगत्वावर मात करून समाधानाच्या सर्वोच्च शिखरावर असलेली उल्हास आणि अनुराधा आगासकर यांची वाटचाल पाहिली की वाटतं- कुणाच्या तरी साक्षीनं घातलेल्या सप्तपदीतच संसाराचं मर्म नसतं. आयुष्याच्या प्रत्येक पावलाला विश्वासाची सोबत हवी असते. मग प्रत्यक्ष पाय नसले तरी वाट चालता येते, आणि हा विश्वासच नसेल तर सर्वार्थानं खंबीर पायांचेही संसार अपंग होतात. एकमेकांशी मनं जुळवून निखळ आनंदाचा सूर शोधणं, प्रगतीची नवी दिशा काबीज करणं, एकमेकांच्या व्यवसायात पूरक साथ देणं, कधी आंबट-तुरट भांडणांचंही चांदणं झेलणं, पण तरीही अंतरी एकरूपच असणं- हेच तर पती-पत्नी नात्याचं ध्येय असतं! तेच तर पंखांचं बळ असतं!

## १५. चाहूलवाटा - उद्ध्वस्त भविष्याच्या!

जवळजवळ तास-सव्वा तास वरच्या कडीला धरून मी उभा होतो. उतारू उतरत होते, नवे शिरत होते; पण मला काही बसमध्ये जागा मिळत नव्हती. त्याचवेळी मला बघून दुर्ल-क्ष करणाऱ्या, खिडकीजवळ जागा मिळालेल्या विद्यार्थ्याची मला गंमत वाटत होती. माझ्याकडे लक्ष जाऊ नये यासाठीची त्याची धडपड मोठी विलोभनीय होती. चुकून नजरानजर झालीच तर नाइलाजानं आपल्याला उठावं लागेल, सरांना 'बसा' म्हणावं लागेल- हे सगळं टाळण्याची त्याची जिद्द कौतुकास्पदच होती. पुढे कहरच झाला. त्याचा स्टॉप आला. त्याने एकदम दचकल्यासारखे केले. 'अरेच्चा! सर तुम्ही? बसा. बसा.'

मी म्हटलं, 'आता तू उतरणारच आहेस, तर ही नकली विनम्रता कशाला? मी बसमध्ये शिरलो तेव्हाच तू मला पाहिलं होतंस.' तो बहुधा खजिल झाला असावा. निश्चित माहीत नाही; कारण तेवढ्यात तो उतरून गेलाही.

एका तिळगूळ समारंभाच्या आठवणीनं तोंड कडू झालं. संक्रांतीला अनेकांनी तिळाचे लाडू, काटेरी हलवा दिला. हलव्याचे दाणे सहज तोंडात टाकल्यावर कळलं- एका विद्यार्थीमित्राने तिळगूळ म्हणून खडूचे तुकडे त्यात भरले होते. ते संयमाने गिळून टाकीत मी म्हटलं, 'आज एका प्रिय विद्यार्थ्याने खडूचाही प्रसाद दिला. तोही मी गोड मानत आहे.' तिसऱ्या दिवशी एक निनावी पत्र आलं- 'सर, मित्राच्या नादानं चूक केली. खडूचे तुकडे तिळगुळात टाकले. तुम्ही बोललात त्यानं त्या रात्री झोप आली नाही. क्षमा करा.'

जे या व्यवसायाच्या साक्षीनं गिळलं, त्याला एक तरी फळ आलं होतं!

पिढी बदलताना आम्हा शिक्षकांना अशी स्पष्ट दिसते. नदीचं बदललेलं पाणी पायाशी यावं, तशा समाजसरितेच्या लाटा आम्हा शिक्षकांच्या अगदी पायाशी येतात. प्रसारमाध्यमांचे उष्ण, हिंसक तरंग घेऊन बदललेला गढूळ समाज नव्या चेहऱ्यांतून आमच्यासमोर येतो.

कार्ला गडावर गेलेल्या सहलीच्या वेळी जेवणाचे डबे उघडल्यावर एक विद्यार्थिनी सहज म्हणाली होती, 'सर, 'थोडी' हवी होती नै?' ऐकून धक्काच बसला. तिची कानउघाडणी करताच सहजपणे ती जे म्हणाली ते ऐकून तर कार्ला गडावरून मी गडगडलो कसा नाही, याचंच नवल वाटतं. ती म्हणाली, 'सर, रागावता का? मी आणि माझे डॅड नेहमी घेतो!' तिच्या निरागसतेतही उद्ध्वस्त भविष्याच्या चाहूलवाटा दिसल्या. त्यानं अधिकच व्याकूळ झालो. सामाजिक मूल्यव्यवस्था बदलते आहे, की ती पार रसातळाला जाते आहे?

लेखकांचे पत्ते मिळवून त्यांची आलेली उत्तरे नजराण्यासारखी मिरवणारी लोभस पिढीही आम्ही अनुभवली. आपल्या विद्यार्थ्यांच्या लेखक-पत्रांचं प्रदर्शनही प्रेमानं भरवलं. तो आनंदही येथेच मिळाला. वसुंधरा पटवर्धनांच्या 'पराभूत' कथेचं उत्तर गीता राणे या मुलीनं इतकं अप्रतिम लिहिलं होतं, की मी ते उत्तर झेरॉक्स करून लेखिकेलाच पाठविलं. वसुंधराबाईंचं उत्तर आलं- 'दवणे, माझी कथा या नव्या विद्यार्थिनींना इतकी भावते, हे उत्तरातून कळल्यानं माझं आयुष्य दोन वर्षांनी वाढलं.' डोळ्यांत आनंदाश्रू आले. हे कृतार्थ अश्रूही येथेच आले आणि एका जिवलग विद्यार्थ्याचं हे पत्रही समोरच आहे- 'सर, तुमच्यामुळे वेळेचं महत्त्व कळलं. आता तो वेळ तुमच्याबरोबर फुकट घालवायचा नाही, हे मी ठरवून टाकलंय.' पहिल्या चाचणीत कॉपी केल्यानंतर- 'एकदा याला क्षमा करा. पुढे घडेल तो. नाही तर विस्कटेल कायमचा,' अशी गळ कधी नव्हे ते ज्याच्यासाठी घातली, त्याचंच हे पत्र मला पुनर्जन्माइतकं अंतर्मुख करून गेलं.

वर्गशिक्षिकेच्या हातचा वह्यांचा गठ्ठा टीचर-रूमपर्यंत घेऊन जाण्याचा माझ्या बालपणीचा आनंद आता मागासलेपणातच जमा झाला होता. अंगणात गुलाबाचं फूल आलं तर 'आई, बाईंसाठी दे ना ते!' म्हणून घेऊन जाण्यातली श्रद्धा आता इतिहासजमा झाली होती. दोन दिवस सर किंवा मॅडम वर्गात आल्या नाही तर, त्या आजारी तर नसतील? या काळजीनं त्यांच्या घरी जाणारे आम्ही- आजच्या चुणचुणीत, स्मार्ट मुलांसमोर केवढे बावळट वाटतो!

आचार्य अत्र्यांच्या साने गुरुजींसंबंधीच्या लेखावरील संपूर्ण व्याख्यान नकळत ध्वनिमुद्रित करून घेणारा निनाद नातू याच वाटेवर भेटतो. 'अरे, का हा उद्योग?' 'सर, आईला ऐकवायचंय तुमचं लेक्चर.' ही उत्कटताही येथेच लाभली. अन् आज मराठीच्या तासाला निवाऱ्याला म्हणून पाऊसपाणी चुकवून आलेली माहिती-तंत्रज्ञानाची मुलं एकीकडे ज्ञानेश्वरी सुरू असताना आयटीच्या नोट्स उतरवतात, तेव्हा १५-१७ वर्षांत समाजाचा चेहरा कसा बदलला, याचा प्रत्यय येतो. पुस्तकांची दिलेली यादी दीड-दोन महिन्यांत फस्त करून 'सर, नवीन पुस्तकं सांगा,' असा उत्साह काही वर्षांपूर्वी जेथे अनुभवला, तेथेच दोन वर्षांत त्याच यादीतल्या एकाही पुस्तकाचं मुखपृष्ठही बघावंसं न वाटणारी भयानक उदासीनता बघून वाटतं- समाज प्रगतिपथावर आहे, हे आम्ही १५ ऑगस्टच्या भाषणात ऐकतो. तो कुठला पथ? ती कुठली प्रगती? डोळ्यांत एक मुजोर रंगेलपण मिरवीत वावरणारी ही मुलं पुढे त्यांच्या घरादाराचा आधार होतील? समाजाचं सोडा हो, सख्ख्या आई-बाबांना तरी विचारतील? मुक्त सहजीवनाच्या नावाखाली बंडखोर पोषाख घालणाऱ्या या मुली उद्याच्या आदर्श जाऊ द्या, पण संसार बऱ्यापैकी सुरळीत करणाऱ्या गृहिणी तरी होतील का? आपल्या मुलांच्या आया म्हणून या कशा शोभतील? स्त्री-पुरुषांमध्ये निष्ठेचा, विश्वासाचा सूर असावा लागतो. तो या समोरच्या- आता १६-१७ वर्षांच्या असणाऱ्या मुलांमध्ये दिसतोय का? कसे असणार यांचे गृहस्थपण? प्रश्न केवळ पोटापाण्याचा, गरिबीचा, बेकारीचाच आहे, की नव्या पिढीचं माणूसपणच दुभंगलं जातंय? एक माथेफिरू पशू त्यांतून वावरतोय, हे स्पष्ट दिसतंय. आण्विक ज्ञानाच्या अवकाशव्यापी झेपेला हे हरवलेल्या संवेदनांचं उत्कटपण शोधता येणार आहे का?

'पदव्यांचे भटारखाने' असं लो. टिळकांनी ज्या विद्यापीठांना म्हटलं, तेथेच माहितीच्या तयार मालाचे वाढपी विद्यार्थ्यांना नेमकं काय वाढत आहेत? पदवीचा ढेकर देऊन, 'आपण शिकलो' या भ्रमात काळोखात उडी मारणारी पिढी जेव्हा सत्य जाणेल, तेव्हा आमच्याबद्दल नेमके कोणते उद्‌गार काढेल?

परवा वर्गातल्या उपक्रमात एक विद्यार्थी स्पष्टपणे म्हणाला, 'मी मोठा होणार आणि शक्य तेवढा भ्रष्टाचार करणार.' सारा वर्ग- माझ्यासकट दचकला.

तो म्हणाला, 'सर, शाळेत ज्युनियर केजीपासून सर्व पायऱ्यांवर डोनेशनच्या नावाखाली बिनपावतीचा भ्रष्टाचार मी अनुभवला. आज बघतोय- कुठलीही नोकरभरती असो, 'पेट्या' ठरलेल्या आहेत. लालूप्रसाद, जयललिता यांच्यासारखी मंडळी करोडो रुपयांचे घोटाळे पचवून मजेत आहेत. मी एकटा प्रामाणिक राहून काय करू?'

... उत्तर दिलं असतं. अशा प्रश्नांना बोलघेवडी उत्तरं देणारे शब्द आम्हा प्राध्यापकांकडे नक्कीच असतात. पण या अगदी नव्या विद्यार्थ्यानं भारताच्या नियतीवर रेखलेलं जळजळीत, लालभडक प्रश्नचिन्ह त्यामुळे सुटणारं नव्हतं. बसमध्ये समोर बसलेल्या विद्यार्थ्याला मला जागा द्यावीशी वाटत नाही, याचं आता दु:ख होत नाही. कदाचित तो विचार करीत असेल- पुढे कुठे जागा मिळेल, न् मिळेल- निवांत सुखाचा आपल्या आयुष्यातला हा क्षण खोट्या आदराच्या भयानं कशाला घालवा?

- त्याच्या पिढीची हीसुद्धा मानसिकता असू शकेल!

# १६.    धग-कोवळ्या कुतूहलातील!

एका पावसाळी दुपारची निवांतता. माझाही मूड आदित्यशी गप्पा मारण्याचा. खूप दिवसांनी बाबा अगदी कुशीत घेऊन लाड करताहेत, या घटनेचं सुखावलेपण त्याच्या चेहऱ्यावर. आणि आपण आपल्या मुलाशी कित्येक दिवसांत नीट बोललोही नाही, ही बाब मनात त्या क्षणी अधिकच अधोरेखित झालेली. या सगळ्या मानसिकतेचीही एक गंमतच. पण या सुखावलेपणाला एकाएकी अपार छेद देणारा प्रश्न आदित्यकडून आलेला- 'बाबा, मी आईच्या पोटातून बाहेर आलो, हे मला माहितेय; पण मी एकाच गोष्टीचा विचार करतोय-'

वयाच्या एवढ्या कोवळ्या देठावर माझं पोरगं एवढं विचारबिचार करत असेल, याचा मला पत्ताच नव्हता. आता हा काय विचारणार, या भोवऱ्यात गरगरत असतानाच त्यानं विलक्षण निरागसपणे विचारलं- 'पण बाबा, मी पोटातून बाहेर येण्यासाठी आधी आत गेलो असेल ना? मी आईच्या पोटात गेलोच कसा?'

अवाक् होऊन त्याच्याकडे पाहतच राहिलो. आणि तो तर दोन्ही खांदे हलवीत विचारीत राहिला- 'सांगा ना बाबा, मी आईच्या पोटात गेलोच कसा?'

त्याच्या गालाचा एक पापा घेत विषय बदलत मी म्हटलं- 'थोडा मोठा हो, मग सांगेन.' आता भोवऱ्यात फिरण्याची पाळी त्याची होती. मी काही कोणी बालमानसशास्त्रज्ञ नाही. पण शास्त्रज्ञ म्हणतील, 'खरंखुरं स्पष्ट सांगून टाकावं मुलांना.' ते योग्यही असेल; पण त्या खऱ्याची मांडणी त्या क्षणी काही मला शब्दांत करता आली नाही.

ही इटुकली-पिटुकली वाटणारी मुलं म्हणजे उत्सुकतेचे बंद खजिने. वरवर ती खेळत असतील, नाचत, गात, रडत असतील. पण त्यांच्या मनात कधी काय प्रगटत असेल आणि पुन्हा ते न प्रगटता तसंच विरूनही जात असेल. आपण वयानं मोठी माणसं क्षणोक्षणी किती कमी पडतो, याची अशा वेळी प्रचीती येते. प्राचार्य श्याम फडके यांचं वाक्य मनात ठसठसत राहतं- 'आई-बाप होता येणं सोपं आहे, पालक होता येणं अवघड आहे. ते एक व्रत आहे.'

आईच्या पोटात असतानाच चक्रव्यूह भेदण्याचं रहस्य ऐकणाऱ्या अभिमन्यूच्या अतर्क्य कुतूहलाची, विलक्षण तरलतेची ही कोवळी मुलं! आणि आम्ही पालक- जी चूक अर्जुनानं केली, त्याच जातीचे! योग्य भाषेत, योग्य त्या तऱ्हेने जीवनातील नेमके प्रश्न आम्ही आमच्या मुलांना समजावून सांगत नाही. 'तुला पेलेल तेच विचार. आगाऊपणा नको,' असं दरडावून आपण त्यांचा कुतूहलाचा हळवा देठच प्राणातून खुडून टाकतो आणि भविष्यातील नेमकी कोणती विराट शक्यता कायमची हरवून टाकतो, ते आम्हालाही कळत नाही. आम्ही खरंच एक नापास पालक आहोत. जीवनाच्या, समस्यांच्या चक्रव्यूहात तर आपण त्यांना लोटून देतो, पण पुढच्या वाटांबद्दल चकार बोलत नाही.

वयाच्या पुष्कळ पुढं असणारी या निरागस मुलांची बुद्धी अनुभवली की वाटतं-आईच्या पोटात असल्यापास्नं ही बाळं आईच्या डोळ्यांतूनच संगणक, वैज्ञानिक माहिती, विश्वाची असंख्य रहस्यं बघत आहेत. आई-बाबा काय बघतात, कसे जगतात, काय वाचतात, की वाचतच नाहीत- इथून त्यांचं गर्भातच प्रशिक्षण सुरू होत असावं.

म्हणूनच कवितानं- माझ्या बहिणीनं तिच्या तीन वर्षांच्या मुलाचं- ऋत्विकचं उत्तर सांगितलं तेव्हा त्या उत्तरानं हसता हसताही मी अंतर्मुख झालो. इसापनीतीतली ती प्रसिद्ध गोष्ट कविता तिच्या मुलाला सांगत होती. 'काऊला खूप तहान लागली. उडता उडता, शोधता शोधता त्याला दिसलं एक रांजण. रांजण- म्हणजे आपल्याकडे तो माठ आहे ना तसा- त्यात एवढुस्सं पाणी. पण प्यायचं कसं? काऊची चोच लहान. मग त्यानं एक खडा घेतला न् रांजणात...'

तेवढ्यात ऋत्विकनं आईच्या तोंडावर हात ठेवला. 'आई, काऊला आता खडा टाकायलाच नको. पाण्याची एवढी तहान त्याला लागणारच नाही.'

कविताला आश्चर्य वाटलं. 'का रे? काऊला तहान लागू शकते-'

'हो, पण त्याची आई त्याला वॉटरबॅग नाही का घेऊन देणार?'

ऋत्विकच्या प्रश्नातलं उत्तर ऐकून आधी हसलो. नंतर गडगडलो. एकविसाव्या शतकात काऊ असा रांजणात खडे टाकण्याचा मूर्खपणा करील, यावर आम्ही पालक विश्वास ठेवू; पण हल्लीची मुलं म्हणतील- त्यापेक्षा काऊने एक स्ट्रॉ आणायचा आणि रांजणात टाकायचा.
या उत्तरात गंमत तर आहेच; पण मुलं एवढा बारकाईनं विचार करतात!
मुलांच्या चित्रकलेतून तर त्या वयाचे असंख्य प्रश्न व्यक्त होत असतात. एक चित्र म्हणून आपण ते कागदावरच सोडून देतो. पण जे शब्दांतून मुलं सांगू शकत नाहीत, ते ती रेषांतून, रंगांतून त्यांच्या परीनं सांगतात. लहान मुलांच्या एका चित्रकला प्रदर्शनात चित्रांचा विषय होता- 'आमचं घर.' एका चित्राजवळ मी थबकलो. फक्त मोठ्ठा टीव्ही काढून ठेवलेला कागदभर आणि पुढे रिकामा सोफा. काही कळेना. चित्राजवळच तो आठ-नऊ वर्षांचा बालचित्रकार उभा होता. मी विचारलं, 'ए, अरे, कळलं नाही तुझं चित्र मला. नुसता मोठ्ठा टीव्ही. समोर कुणीच नाही. तुझ्या घरात कुणी माणसे नाहीयेत का टीव्ही बघणारी?' तो म्हणाला, 'आहेत ना! आई-बाबा आहेत. पण टीव्ही बघण्यात ते इतकं दंग झाले आहेत की स्वतः हरवूनच गेलेत. टीव्हीपुढे त्यांना मीही दिसत नाही. म्हणून फक्त टीव्ही आणि हा रिकामा सोफा-'
हे फक्त त्या छोकऱ्याचंच घर होतं का? मला वाटतं- आज हे बहुतेकांचं घर आहे.
मला तर वाटतं- मोठ्या माणसांनी लहान मुलांसाठी निर्माण केलेल्या पाठ्यपुस्तकांपेक्षा लहान मुलांकडूनच प्रयत्न करून एखादं पाठ्यपुस्तक निर्माण केलं तर त्यात केवढी आशयघनता असेल! आपण आपल्या बालपणी कसे होतो, हे आठवून आजच्या मुलांना मोजतो. पण खरं तर आजच्या मुलांचं बालपण त्याहून खूप पुढं गेलंय, हे आम्हाला कळतच नाही. म्हणूनच शांत, गप्प वाटणारी मुलं म्हणजे 'अगदी शहाणा झाला बरं का आमचा मिनू,' असं समजू नका. कदाचित ती स्फोटापूर्वीची शांतता असेल. दडपून टाकून कदाचित् आत होणाऱ्या चिंध्या अधिक खतरनाक असतील.
परवा असाच थंडगार, पण भेदक प्रश्न माझ्या नऊ वर्षांच्या मुलाने केला, 'बाबा, रेणूचं गुलाबाचं फूल होईल नं आता?'
'अं?'
'बाई म्हणाल्या- जी गुणी माणसं देवाला आवडती होतात, त्यांचं पुढल्या जन्मी गुलाबाचं फूल होतं. रेणूही गुणी मुलगी होती. तिचंही...?'
'आदित्य, रेणू गेली, हे तुला माहितेय?'
'केव्हाच माहितेय. तुम्ही मला सांगितलं नाहीत. तिला शेवटचं दाखवलंही नाहीत.'
'तुला केव्हा कळलं?'
'रात्री- मध्यरात्री एक फोन आला तेव्हा तुम्ही, आई रेणूबद्दल दचकून बोलत होतात. लगेच निघालात पुण्याला- मला आजी-आजोबांजवळ ठेवून. तेव्हाच कळलं. सांगा ना बाबा, तिचं पुढं काय होईल?'
जिन्यावरून पडून अपघाती मरण पावलेल्या माझ्या साडूंच्या मुलीचा मृत्यू आम्ही आदित्यपासून लपवून ठेवला होता. कारण ती त्याची जिवलग मैत्रीण होती! पण हे आपल्याला कळलंय, हे त्यानंच आमच्यापास्नं लपवून ठेवून आम्हाला जपलं होतं. वपूंच्या 'ऐक सखे' संग्रहातल्या पहिल्या कथेचा शेवट असाच आहे. कथेतली ती लहान मुलगी म्हणते, 'मला माहितेय आई गेलेय ते-' वपू लिहितात, 'आम्हाला वाटलं- आम्ही तिला जपलं. पण तिनंच आम्हाला जपलं होतं.' खरंच! काही वेळा आपली मुलंच आपली पालक असतात आणि आपण त्यांची मुलं!

भूतकाळाचं भूत
त्या कल्पकतेचीच मला कमाल वाटली. जेथे निराश्रित वृद्धांचा आश्रम, तिथंच अनिकेत मुलांचं वसतिगृह. वृद्धांना छान लोभस नातवंडं मिळावीत आणि मुलांना मायाळू आजोबा! आयुष्याची दोन टोकं जोडून आनंद निर्माण करण्याचा त्या संस्थेचा ध्यास वंदनीय होता. या कल्पकतेला मी दिलखुलास दाद देत असतानाच संचालक म्हणाले, ‘तुम्ही म्हणताय तेच सर्वांच्या मनात होतं. म्हणून तर वृद्धाश्रम आणि अनाथ मुलांची निवासव्यवस्था एकत्र केली. पण आमचा हा प्रयोग सपशेल फसला हो!‘
‘कसा काय?‘
‘अहो, यातील बऱ्याच वृद्धांना मुळी या मुलांचा सहवास नकोच आहे. दरवाजा लावून ते जे आत बसतात, ते बाहेर येतात दुपारच्या जेवणासाठीच. या छत्र नसलेल्या मुलांना काही शिकवावं, त्यांना गोष्टी, गाणी सांगावीत, स्वतःचा जीव रमवावा आणि त्यातून या बालकांना आजी-आजोबांची माया द्यावी, असं कुणाला वाटतच नाही. काय यांची मानसिकता आहे कळत नाही. अहो, दोन निराधार वृद्ध स्त्रिया एका खोलीत ठेवल्या तर त्या परस्परांच्या मैत्रिणी होण्याचं सोडून एकमेकींशी भांडत राहतात. याला काय म्हणावं?‘
घर असूनही घरानं दरवाजा बाहेर जाण्यासाठी उघडलेला आणि पुन्हा दार लावून घेतलेलं. एरव्ही समाजाच्या दयेचा विषय झाली असती अशी ही माणसं घरानं का नाकारली, याचं उत्तर त्यांच्या स्वभावातच होतं. आयुष्यात असं एकाकीपण येऊनही त्यांच्यातला पीळ गेलेला नव्हता. जणू वृद्धाश्रम चालण्यासाठी इथं राहून आपण या संस्थेवरच उपकार करतो आहोत, हीच भावना अनेकांमध्ये होती. अशा स्वभावानं जिथं जाऊ, तिथं गुंतेच निर्माण करू, असं व्रतच घेतल्यासारखी ही आयुष्यं! अशा दुराग्रही, ‘पीळ‘दार स्वभावासकट तरुण घरानं यांना स्वीकारणं, हा जुन्या भावुक मराठी चित्रपटातील आदर्शवाद प्रत्यक्षात अशक्य. ‘ही नाही का होणार आहेत उद्या म्हातारी? भोगतील फळं!‘ या शापवाणीची पर्वा करण्याइतकं तारुण्य भानावर नसतं. ‘उद्याचं उद्या पाहू. येऊ फार तर रस्त्यावर. पण रोजचा त्यांचा हा काच सहन तरी किती करायचा?‘ या वैतागाच्या स्फोटानेच घरानं दरवाजा मिटण्यासाठी उघडलेला.
दूरच्या एका प्रवासात एका वाचनप्रिय सहप्रवाशानं मांडलेलं मत ओघानं आठवलं. मला ते पटलं असं नाही; पण असाही दृष्टिकोन असू शकतो, हेही अशा गप्पांमध्ये कळतं. विषय निघाला ‘नटसम्राट‘ नाटकाचा. आधी भरभरून कौतुक करून तो म्हणाला, ‘नटसम्राट‘ ही मराठीतील एक सर्वोत्कृष्ट कलाकृती आहे, यात वादच नाही. पण असा वृद्ध माझ्या घरात असेल तर मी कसं वागेन कळत नाही. रंगभूमीवरचे एकेकाळी बालगंधर्वांनीही शाब्बासकी दिलेले हे नटसम्राट समजा माझे वडील असते तर... तर इतका थोर कलावंत माझे वडील आहेत, ही तर अभिमानास्पदच बाब; पण म्हणून रोज तिन्हीत्रिकाळ घरात नाटकाची स्वगतं मोठमोठ्यानं मी किती वर्षं ऐकू? मुलं शिकताहेत, अभ्यासाला बसलीत. मुलगा आयआयटीच्या परीक्षेला बसलाय. आणि एकदम ‘त्रस्त समंधा शांत रहा‘ सुरू झालं, तर त्या क्षणी डोकं फिरणार की नाही माझं सांगा?‘
त्यानं संतापानं माझ्या मांडीवर अशी काही चापट मारली, की त्यालाच म्हणावंसं वाटलं, ‘त्रस्त समंधा...‘ पण समंध शांत न होता उसळून म्हणाला, ‘अहो, नाटक व्यवसायात दौऱ्याच्या निमित्तानं लागली बाहेर खायची सवय; मान्य आहे. पण माझ्या ऑफिसमधले बॉस घरी आलेत, त्यांना कागदाच्या पुरचुंडीतील भजी बाहेरून खात खात येत द्यायची का? मी सांगणारच ना- बाबा, प्लीज! सांगा- हीसुद्धा एक बाजू आहेच ना त्या शोकात्मिकेची!‘
प्रवासी मित्र होता जरासा आततायी. वृद्धत्व, आर्थिक लाचारी, एकेकाळी भोगलेल्या वैभवाच्या आठवणींनी आलेली वर्तमानातील विकलता हासुद्धा आप्पासाहेब बेलवलकरांच्या व्यक्तिरेखेतील गाभा होताच. शिरवाडकरांनी या स्वभावासकटच ते नाट्य उभं केलंय. हा ‘साहित्य‘ म्हणून ‘नटसम्राट‘चा विचार झाला. पण आपल्या घरात अशा नटसम्राटाला आपण कसं वागवू? या त्याच्या प्रश्नाला त्याक्षणी उत्तर नव्हतं.
उच्च पदांवरून निवृत्त झालेल्या स्त्रिया/ पुरुष यांची ऊर्जा अद्यापि सळसळती असते. निवृत्तीनंतरही शरीर आणि अर्थ यांची क्षमता घेऊन स्वाभिमानानं जगणारे अनेक सुदैवी ज्येष्ठ नागरिक भोवती दिसतात. नाटक, चित्रपट,

संगीत, सहली, परिसंवाद, वाचन, गप्पा, खेळ, प्रवचनं अशा उपक्रमांमध्ये स्वतःला गुंतवून, स्वप्नातलं जगणारी अशी डोळस ज्येष्ठ माणसं घरात दुर्मिळ राहतात. म्हणून ती सतत हवीशी वाटतात. अशा रसिक ज्येष्ठांची प्रेमळ सावली सर्वांनाच ओढ लावते.

पण काहींचं समजुतीचं गणित चुकतं. कर्तबगार भूतकाळाचं भूत काही मानगुटीवरून उतरत नाही. एकोणीसशे साठ आणि दोन हजार दोनमध्ये बरंच पाणी पुलाखालून वाहून गेलंय, ही वस्तुस्थिती जे जाणून घेत नाहीत, ते सुंदर होऊ शकणाऱ्या वर्तमानाच्या चिंध्या करून घेतात. केव्हातरी त्यांच्या कर्तबगारीची आठवण घरातल्या तरुणांना बळ देईलही; पण या वृत्तीचा हातोडा झाला की मग आदराची जागा तुसडेपणा घेईल. शिक्षण संपवून नुकतंच स्वतःच्या पायावर जरा कुठं उभं राहणाऱ्या मंडळींना स्वतःची वाट स्वतः चालता येते की नाही, याची वाट तर पाहा! दिव्यानं घर उजळायचंच असतं, पण ज्योत नको तितकी जवळ आली किंवा प्रखर झाली तर त्या तेजाचा दाहच होतो. काही वेळा आगही लागते. डोळ्यांना सुखवस्तू वाटणारी कितीतरी बेचिराख घरं दिसतील. त्याचं एक हेही कारण- ‘मी म्हणतोय तेच खरं‘ ही ज्येष्ठतेतून आलेली वृत्ती. आज या वृत्तीसकट ज्येष्ठांना सन्मान देणारी तरुण पिढी नाहीच. तसे संस्कार ना झाले शिक्षणातून, ना बाह्य वाचनातून. सतत ओसंडणाऱ्या टीव्ही मालिकांचंच बालामृत पिणाऱ्या पिढीकडून फारशा कृतज्ञतेची अपेक्षा यापुढे करूच नये. पण याचबरोबर ‘आपलंही जरा अतीच होतंय्‘ हे आरशात बघून विचार करायला काय हरकत आहे?

त्या निराधार ज्येष्ठांनी जरा विचार केला असता तर संस्थाचालकांना आपला प्रयोग फसला, असं म्हणायला वाव नव्हता. नवे आजी-आजोबा आणि नवीन नातवंडं याची एक नवीच फुलबाग निर्माण झाली असती. कल्पना गोड होती; पण सत्य कडवट होतं.

घरातल्या नव्या पिढीलाही कित्येक गोष्टी प्रत्यक्ष चुकांचे परिणाम सोसल्याशिवाय कळणार नसतात. चार तासांचा शाब्दिक उपदेश त्यांना ‘बोअर‘ वाटेल. पण एक आघात अंतर्मुख करेल. वात्सल्याच्या भरात त्यांचे सर्व धोके टाळलेत तर जीवनाचं रौद्र रूप नव्या पिढीला कळणारच नाही. अनुभव ही जगण्याचीच गोष्ट आहे. ग्रंथपाल हरीभाऊ परांजपे सरांचं वाक्य आठवलं- ‘सूचनेच्या पाटीसारखं असावं. कुणी ऐकलं तर ठीक; नाही तर पाटी काही डोक्यात आदळत नाही.‘

ज्येष्ठ पिढी समाजाला कल्पवृक्षासारखी आहे. त्यांनी दुर्मिळच असायला हवं. कल्पवृक्षाचा रानोमाळ मिळणारा झेंडू व्हायला नको.

# १७.	नास्तिकतेचं कर्मकांड

तिन्हीसांजेला दिवा लावला, प्रतिक्षिप्त क्रियेसारखा माझ्याकडून नमस्कार झाला. अगदी सहज घडतं असं. नेमके 'ते' गृहस्थ घरात. एकदम त्यांनी मला खेकसूनच विचारलं, 'हा काय प्रकार? नमस्कार कशाला केलात?' मी म्हटलं, 'दिव्याला.'

'दिव्याला? आणि नमस्कार?'

'हो. का बरं?'

'बटण दाबलं की दिवा लागतो. त्यात नमस्कारासारखं काय आहे? ही अंधश्रद्धा आहे. तुम्ही असे, तर तुमच्या विद्यार्थ्यांना तुम्ही काय घडवत असणार? हा शुद्ध वेडेपणा, मूर्खपणा आहे तुमचा.' त्यांनी गोळीबारच सुरू केला. वयाचं मोठेपण आणि त्यांच्याशी हुज्जत घालायला नसलेला वेळ यामुळे विषय तिथंच थांबवला. पण पुढे पुढे त्या गृहस्थांची मजल वाढतच गेली.

एकदा दुपारी बेल खणखणवतच ते घरात घुसले.

'येताय का जेवायला?'

'छे. झालं जेवण.'

'मटण आहे. चला-'

'मटण? गुरुवार- संकष्टी-'

'हाच तो मूर्खपणा. हीच देवभोळी वृत्ती. मी म्हणतो- संकष्टीला खाल्लं मटण, तर काय बिघडतं?'

'अहो, पण माझं काऽऽही म्हणणंच नाही. तुम्ही आज संध्याकाळीही खा. पण माझ्यावर जबरदस्ती का?'

'आधी मला लॉजिकली समजावून सांगा. सांगा बरं.' सत्तरीच्या त्या गृहस्थानं कोचावर मांडीच ठोकली. 'हे बघा- मला समजावून सांगता नाही येणार. एवढंच सांगतो- संकष्टीला मांसाहार आमच्या मनाला पटत नाही. मूर्खपणा असेल, अंधश्रद्धा असेल, पण त्या अंधश्रद्धेचा आम्हाला अजून काहीही त्रास झालेला नाही. शिवाय तुम्ही संकष्टीला मटण आणू नका, असं सांगायला मी तुमच्याकडे आलेलो नाही.'

हेका न सोडता ते म्हणाले, 'शुक्रवारी चालतं न् गुरुवारी नाही. सगळी बकवास! पोटात उरतंच ना, सोमवारीही?'

मनातल्या मनात त्या असह्य उग्र माणसाला मी त्रिवार हात जोडले. जेत्याच्या आविर्भावात गृहस्थ त्यांच्या घरी गेले.

समोरच्या इमारतीत सत्यनारायणाची पूजा होती. पूजेचं निमंत्रण होतं. त्या घरात मी शिरलो तर तिथे सोफ्यावर नास्तिकतेचा तो महामेरू बसलेला! दचकलोच. हा माणूस देवदर्शनाला? विचारलंच मी- 'इथे कसे?'

'आलो, शिरा खायला!'

'प्रसादाचा?'

'प्रसाद तुम्ही म्हणा. शेवटी शिराच तो. देव मला वर्ज्य आहे, पण हा शिरा नाही काही. हाः हाः हाः'

आपल्या विनोदानं अनेकांच्या चेहऱ्यावर झळकलेली नापसंती पाहून गृहस्थ खुलले.

'अहो, कसला सत्यनारायण! कसली ती कथा! बोट बुडाली काय, वर आली काय! सगळा पोरखेळ! पैशाचा चुराडा. असो. बेटा, चार-पाच द्रोण घरी पण दे.' प्रसाद द्यायला बसलेल्या शाळकरी मुलाकडून 'शिरा' न्यायला ते विसरले नाहीत.

देव-देवत्व कुणी कशात मानावं, 'देवपण' कशात शोधावं, ही बाब वैयक्तिक आहे. पण आपली उग्र नास्तिकता समोरच्यावर आक्रमकपणे लादायची, हेही जरा अतीच झालं. अतिदेवचळ असलेल्या माणसांइतकीच क्षणोक्षणी 'देव नाही, देव नाही' म्हणत लोकांच्या मनातील देव झाडूनं झाडण्याचा वसा घेतलेली कोरडीठाक नास्तिकता त्यांना कुठला आनंद देते, कळत नाही! एखाद्या श्रद्धेनं समाजाचं, व्यक्तीचं शोषण होत असेल, त्या श्रद्धाकर्मातून अडाणीपणा पसरून समाज पतित होत असेल, त्याचं माणूसपणच पशूपणाकडे जात असेल, तर ती 'अंधश्रद्धा.' पण काही श्रद्धांमुळे मांगल्य निर्माण होतं. माणसं प्रेमानं एकत्र येऊन उत्सवी वातावरण होतं. घरात दिवेलागणीला उदबत्ती

लागली, मुलांनी 'शुभम् करोति' म्हटलं, गृहिणीनं- गृहस्थानं पसायदान म्हटलं, तर या श्रद्धेत पोटशूळ उठण्यासारखं काय आहे, हेच समजत नाही. काही श्रद्धांमुळे माणसं सात्त्विक आहार सेवन करीत असतील, निर्व्यसनी राहत असतील, आचरणात नैतिकता बाणत असतील, तर ती श्रद्धा केवळ 'लॉजिकल' नाही, म्हणून विस्कटून टाकण्यात कुठला आलाय बुद्धिवाद?

कित्येक प्रश्नांना, श्रद्धांनाही उत्तरं नसतात. पण म्हणून नास्तिकतेच्या खराट्याने त्या खरवडून काढायच्या का?

माझ्या आजोळी कोलाडला संध्याकाळी आरत्या व्हायच्या. आजोबा असतानाची आरत्यांची ती संध्याकाळ माझ्या निरागस मनावर तेजाची पावलं उमटवीत यायची. पुन्हा सुस्नात होऊन शुभ्र वस्त्र ल्यायलेले तेजस्वी आजोबा हातात लख्ख ताम्हण घेऊन, त्यातल्या तुपाच्या दिव्यानं कालिकामातेला आरती गायचे. सगळे मामा, आजी, पाहुणा आलेला मी आणि आई टाळ्यांच्या तालावर त्यांच्या सुरात सूर मिसळून त्या आरत्या गात असू. खरेच सांगतो- वय असेल नऊ-दहा, पण डोळ्यांत अश्रू वाहायचे. शेवटी कालिकेची आरती!

जय जय जय अंबे- जगदंबे, कुलदैवत तू अंबे
तुझी वस्ती गे कडापी,
तेथून रक्षण करिसी- जय जय जय अंबे-

आताही हे शब्द त्या चालीसह, त्या दिव्याच्या तेजासह माझ्या आजोळच्या चेहऱ्यासह, जवळून वाहणाऱ्या कुंडलिकेच्या पाण्यासह आठवताहेत. या श्रद्धेनं आम्ही तरल झालो. सश्रद्ध झालो. इथं शोषण नव्हतं. दुराग्रह नव्हता. सर्वांनी एकत्र येऊन ध्यान करण्याचं ते सुरेल निमित्त होतं. कुणी म्हणेल- हे संमोहन! असू दे. पण त्यानं मनं उमलली, नाती अतूट राहिली.

गुरुपौर्णिमेला शिक्षकांना फुलं देणं, दिवाळीला शुभेच्छापत्र देणं, संक्रांतीला तीळगूळ देणं- या सगळ्या श्रद्धेला उत्तरं नसतात. ठार अज्ञानातून निर्माण झालेल्या, दिशा चुकलेल्या श्रद्धेतून निर्माण होते बुवाबाजी! प्रयत्नशून्य देवभोळेपणातून हाती येतं ते दारिद्र्य! हातचलाखीतून निर्माण झालेली विभूतिपूजा विज्ञानाप्रमाणेच संतांनाही मान्य नाही. नमस्कार करण्यासाठी येणाऱ्यांना 'आधी खराटा घे न् रस्ता झाड लेका,' असं सांगणाऱ्या गाडगेमहाराजांनी समाजाला अंतर्यामी जागं केलं. डोळस केलं. पण सश्रद्ध मन खुडलं नाही. कलानिर्मितीचे कल्पवृक्ष आणि सौंदर्यास्वादाचं इंद्रधनु मनाच्या ओलाव्यातूनच प्रकटतं. दिशा हरवलेल्या श्रद्धांना दिशा देताना आपण समाजाला 'कोरडं' तर करीत नाही ना, याचीही काळजी घ्यायला हवी.

चराचरात भरून उरलेला परमेश्वर जाणवण्याइतकी सर्व समाजाची क्षमता कधीच नसते. त्यामुळेच घिसाडघाईने तण उपटण्याच्या भरात पीक तर आपण खुडत नाही ना, याचाही शोध घ्यायला हवा.

कर्मकांड कुठलंही हास्यास्पदच! मग ते आस्तिकतेचं असो की नास्तिकतेचं!

# १८.     मनाचं व्यवस्थापन

पहाटे जाग आली. म्हटलं- लिहायला बसावं. छान सूर लागेल. कागद- लेखणी- बैठक जमवली. काय लिहायचं, हे डोक्यात होतंच. आता फक्त लेखणीच्या जिन्यानं उतरवून घ्यायचं. तेवढ्यात- 'कडीला दुधाच्या पिशव्या असतील, तेवढ्या...' दोन बोटांतलं सुसज्ज पेन नाराजीनंच बाजूला ठेवलं. दरवाजा उघडला. पिशव्या गायब! जरा पुढे जाऊन पाहिलं- दूध सांडलेलं. मनीमाऊ दुधाचा पुरावा जिभेनं नष्ट करण्यात मग्न. सुंदरच ध्यान लागलं होतं. चिडचिडण्यातही गंमत वाटून गेली.

या गंमतीला घरातून दाद न मिळता उलट, 'लगेच उठून दुधाच्या पिशव्या काढायला हव्या होत्या तुम्ही-' असा त्रासिक सूर उमटला.

आता मात्र गुरुत्वमध्य सरकला. 'एक कापडी पिशवी अडकवायला काय होतं तुला? मांजरच आहे... दूध दिसल्यावर ते पिणारच. ते काय तुला दुधाची पिशवी तोंडात धरून आणून देणार आहे का?- चहा करून द्या वैनी, म्हणत!'

'दोन लिटर दूध गेलं ना! आता मुलं शाळेसाठी उठतील. त्यांना काय देऊ? घेऊन या.' सावर रे... आवर रे... करीत सरळ स्लीपर्स घातल्या आणि दूध आणून दिलं.

तोवर लिहायचा मूड साफच गेला होता. मनातले मुद्दे विस्कटत चालले होते. तरीही बळ एकवटून एकाग्र झालो. पुन्हा पेनचं टोपण काढलं. लिहिणार, तेवढ्यात बेल! 'पेपर आला!' मनात उद्‌गार. पेपर आल्यावर सगळी कामं अर्थातच दुय्यम ठरतात. दरवाजा उघडून कडीला अडकवलेला पेपर घेतला तर काय- नेहमीचे वर्तमानपत्र दूरच; चक्क गुजराती वर्तमानपत्र टाकून पेपरवाला गेला होता. दारावरची पाटी पाहिली. रात्री तर 'प्रवीण दवणे' अशी होती. पहाटेपर्यंत 'प्रवीण ठक्कर' तर झाली नाही ना? पण तसं काही झालेलं नव्हतं.

वैतागाचं चक्र फिरत राहिलं. पेपरवाला कुठं दिसतोय का, बघायला पुन्हा बाहेर आलो, तर कचरेवाल्यानं फक्त आम्हाला वगळून समोरच्यांची चाकरी केली होती. 'कम्मालाय्!' घरात पुटपुटलो, तर फणफणणारा स्वर- 'होळीला दहा रुपये मागितले त्यानं, तर देताना घासाघीस. आता असंच होणार!' पुन्हा मीच धारेवर!

लेखनाचा सारा उत्साह या क्षुद्र प्रसंगानं खाऊन टाकला. शिवाय सकाळी सकाळी घरातल्या तारा बिनसल्या त्या वेगळ्याच.

या सगळ्या तारांबळीत महत्त्वाच्या मीटिंगला पोहोचण्यासाठी पाच-सात मिनिटं उरली. कसंबसं आवरून रिक्षाचालकाला म्हटलं, (अर्थातच हिंदीत!) 'भय्या, हो सके उतना जल्दी. टाइम पें पहुँचना है.' जिवाच्या आकांतानं जणू रिक्षा मीच ढकलतोय अशा आवेशानं माझं चाललं होतं- 'जल्दीऽ जल्दीऽ' तर एकदम रिक्षा उलट्या वळणावर वळली. चिडूनच म्हणालो, 'भय्या, इधर किधर?'

'पेट्रोल भरना है!'

'बाद में भरो.'

'बाद में? बीच में रुकू क्या? कलही रिझर्व पे पडी थी. पेट्रोल तो चाहिए नं!' तो मलाच शिकवू लागला- 'अरे भई, आधा घंटा जल्दी निकला करो-' रिक्षातल्या रिक्षात मी पाय आपटून घेतले. अर्थात ते भय्याच्या गावीही नव्हते. सुरू झालेल्या मीटिंगमध्ये अपराधी चेहऱ्यानं जाऊन बसताना त्या दिवशी वेळेवर आलेल्या नजरा झेलत बसलो.

सकाळी दोन घास पोटात ढकलायला वेळ मिळाला नव्हता. म्हटलं- कारभारणीनं एवढी प्रेमानं गर्रम चपाती-भाजी डब्यात दिलेय. भूकही लागली होती. मीटिंग संपल्यावर बॅग उघडली डब्यासाठी- तर काय, डबा न घेताच मी आलो होतो. आता काय म्हणावं या कर्माला? तेवढ्यात मोबाईल केकाटला- 'डबा टेबलावर विसरलायत्. उपयोग काय- एवढं केलं त्याचा? घेऊन येते पट्कन.'

‘प्लीज, तेवढं करू नकोस. माझा वेंधळेपणा जाहीर करण्याची एवढी संधी तू सोडून दे. माँटेसरीतल्या मुलाला आणून द्यावा तसा तू जेवणाचा डबा घेऊन कॉलेजात आलीस तर लोक काय म्हणतील? प्लीज-‘ मी फोन ऑफ केला.

कॅन्टीनला ऑर्डर दिली- ‘वडा गरम!‘ रिक्षावाल्या भय्याचा पुतण्या असावा तो कॅन्टीनवाला. वड्यापेक्षा थंड स्वरात म्हणाला, ‘कल का वडा है. गरम करके दूँ?‘ आता मात्र समोरचा उत्तरपत्रिकांचा वजनदार गठ्ठा वेगळ्या कारणासाठी वापरावासा वाटला.

तेवढ्यात, ‘सर, तुमचं लेक्चर आहे.‘

‘मला तर आता लेक्चर नाहीय!‘

‘ॲडजेस्ट केलंय. जोशीसर आलेले नाहीत म्हणून-‘ ऑर्डर झाली. जोशीसरांनीही अगदी आजच न यायचं अडलं नव्हतं. पण ‘दूधवाला ते जोशीसर‘ असं जणू एक मोठ्ठं कटकारस्थान माझ्याविरुद्ध सुरू असावं, असा संशय बळावला.

चडफडत वर्गात गेलो, तर पोरं किंचाळली, ‘सर तुमचं नाही, तुमचं नाही- जोशीसरांचं...‘

‘या तासाला मीच जोशीसर आहे!‘

मुलांना कळेचना- मी डस्टर आपटल्याच्या स्वरात का बोललो ते!

किती छोट्या छोट्या घटना! पण सिक्वेन्स चुकला की दिवसाचा डाव जसा विस्कटूनच जातो. कधी रिक्षाचं भाडं फाजील वेगात बारा रुपये होतं, तिथं अठरा झालं म्हणून ऑफिसमध्ये चिडून प्रवेश! तर केव्हा नेहमीची लोकल उशिरा येऊन प्लॅटफॉर्मचा क्रमांकही बदलते. त्या धावाधावीमुळे सहकाऱ्यांशी बाचाबाची! कधी कामाच्या ताणात, पाहुण्यांच्या वर्दळीत मोलकरीण दांडी मारते. मुलांवर कातावणं सुरू. नवऱ्याशी झालेल्या भांडणात मध्येच येणाऱ्या चार रॉंग नंबरचा जळफळाट पाचव्या योग्य नंबरच्या व्यक्तीवर! आपल्याच कामाची प्रगती कळवण्यासाठी केलेला फोन हरवून जातो. काल बायकोसाठी आणलेला गजरा हिरव्यागार पानात खिशात तसाच पडून राहतो. पँट धुताना तिला सापडल्यावर संशयकल्लोळाची कोरांटी धमाल करते.

एका अगदी साध्या घटनेतली तगमग आपली सर्जनशीलताच संपवून टाकते. त्यामध्ये छान जमला असता असा लेख गर्भातच गुदमरतो. कविता निसटते. मीटिंगमधील महत्त्वाचे निर्णय होऊ शकत नाहीत. ऑफिसमधल्या इन्स्पेक्शनमध्ये आपली उत्तरं चुकतात. इंटरव्ह्यूमधील आपला ‘परफॉर्मन्स‘ वाईट होतो. निर्णायक यशाच्या परीक्षेत येत असूनही उत्तरं ‘प्रश्न‘ निर्माण करतात.

क्षुद्र घटनेच्या तरंगांपायी केवढं नुकसान! आपल्या हाती नसलेलं घटनांचं अवखळपण त्याच ‘क्षणात‘ ठेवून पुढच्या क्षणात नव्यानं जाता आलं तर...? मनाचं व्यवस्थापन हे वेगळंच कौशल्य असावं. ते ज्यांच्याकडे असतं, ते आपल्या क्षेत्रात भरारी घेतात. तुमची-माझी सगळी पळापळ- त्यांचीही असतेच. वरील उदाहरणांमधील सर्व घटना थोड्याफार फरकाने अगदी सर्वांच्याच बाबतीत कधी ना कधीतरी घडत असतातच. पण ‘रॉंग नंबर‘ घटनांची पुरचुंडी क्षणात दूर ठेवून गाडी पुन्हा ट्रॅकवर आणण्याची कला महत्त्वाची. त्याचे वेगळे कोर्स हल्लीच्या ‘सर्वत्र उपलब्ध‘च्या काळात असतीलही; पण मला वाटतं- चित्ताची शांत बैठक, मेडिटेशन (ध्यान), दिवसात केव्हातरी सकारात्मक विचारांच्या मजकुराचे मनन, अभिजात संगीताचा दहा मिनिटं का होईना, ठरवून घेतलेला आस्वाद... व्यवहारी धावपळीपलीकडे जाऊन थोडं अलिप्त करणारी ही साधना महत्त्वाची! अर्थात ती ज्याची-त्याची कुवत! फायदे-तोटेही ज्याचे त्यालाच! सामान्य घटनांपायी मनाच्या तुटलेल्या तारा पुन्हा जुळवणं आणि जीवनसंगीताची मैफल जमवणं- हा अर्थात रियाजच. ती जुळणं नंतर. पण रियाजाला सुरुवात तर करावी

# १९. रवींद्रनाथांच्या मनातील शाळा

शाळा सुटतानाची बेल होणं, हा विद्यार्थीजीवनातील सर्वात आनंदाचा क्षण! केव्हा एकदा बेल होते अन् केव्हा सैराटपणे धावत घरी येतो, असं मुलांना का होतं? एखादा शिक्षक अचानक न आल्याचं कळल्यावर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची कारंजी का नाचू लागतात? 'शिकणं' या प्रक्रियेत आनंदाला, हास्याला शिबिरांतील भाषणात आपण स्थान देतो, पण तो आनंद प्रत्यक्ष वर्गात उतरवण्यात आपण कुठं कमी पडतो, याचा शोध घेण्याचीही आमची तरलता संपून गेली आहे का? झाडं वाढताना फुलतात. फुलत फुलतच ती मोठी होतात. पक्षी उडताना गातात. गात गातच ते भरारी घेतात. शाळा-महाविद्यालयांत अशी आनंदाची लकेर निर्माण करण्यात आम्ही कुठं कमी पडतो आहोत?

सतत नव्या रूपात समोर येणारी उमलती पिढी आणि अनेक पिढ्यांच्या अंतरावर असणारी शिक्षण सूत्रसंचालकांची मानसिकता- यामुळे मुलांच्या मानसिकतेत झुकणं वय वाढून ताठर झालेल्या हाडांना शक्य होत नसावं. 'ही माझी शाळा' यातला 'माझी' शब्द उच्चारताना अभिमानानं ऊर भरून येणं, हा केवळ भाबडेपणा आहे का? आंतरिक विकासाऐवजी कागदी गुणांनी मिळवायच्या तकलादू प्रतिष्ठेत मुलांवर लादली गेलेली ओझी आपण पूर्णपणे तर टाळू शकत नाही. पण ती सुसह्य होतील असं शैक्षणिक पर्यावरण आम्ही कसं तयार करू शकू?

मुशाफिरीत मला आढळलं- कल्पक आणि संवेदनक्षम नेतृत्वानं कित्येक शाळा अशा संगीतमय केल्या आहेत! त्यांना उपक्रमांचे पंख आहेत. खुणावणारं अथांग आकाश आहे. महानगरपालिकांच्या कित्येक शाळांमध्ये चित्र, रंगावली, हस्तकला यांच्या इतक्या स्पर्धा होतात, की नवनिर्मितीत दंग झालेली ती मुलं पाहताना वाटतं- 'धारावीच्या झोपडपट्टीतला हा मुलगा उद्याचा मोठा चित्रकार होईल!' मुलांनीच केलेल्या भेटकार्डांची इतकी सुंदर योजना काही शाळा राबवतात, की त्यातून त्या मुलांच्या कपड्यांचे पैसे सुटतात; शिवाय त्यांच्यातल्या कलावंतालाही साद घातली जाते. कोरस गीतगायनाच्या स्पर्धेत सारा वर्ग गाऊ लागतो. या क्षणांना हार्मोनियमचा सूर मिळतो. तबल्याचा ताल मिळतो. अशा वातावरणात मुलं अवचित रुळतात. रेंगाळतात. शाळा म्हणजे केवळ 'हे'च नाही, याची कल्पना आहे. शाळा म्हणजे गणित, रसायनशास्त्राची सूत्रं, इंग्लिशची स्पेलिंग्ज, इतिहासाच्या सनावळ्या, भाषेचं व्याकरण- हेही आहे. पण तेही तेवढ्याच आनंदानं करण्यासाठी शाळा हे मुलाला आपलं दुसरं घर वाटणं आवश्यक आहे. वाढणारी विद्यार्थीसंख्या, अपुरे वर्ग, हरवलेली मैदानं, देणग्यांची कुंपणं, गुणवत्तायादीची महत्त्वाकांक्षा, पाणी आणि उत्सजर्नाच्या कालबाह्य सोयी, शिक्षकांमागची इतर लचांडं- या चक्रव्यूहातून आपण भविष्यातला युवक तयार करीत आहोत. माणसानं आशावादी तर असायलाच हवं. त्यातून काही दिवे किनाऱ्याला लागत आहेत. पण मध्येच विझणाऱ्या असंख्य क्षमतांचं काय?

सगळा विचार, सगळे प्रयोग, सगळे उपक्रम पार्ले, डोंबिवली, पुणे इथलीच मुलं डोळ्यांपुढे ठेवून केले तर चंद्रपूरमधल्या आदिवासी मुलांचं काय? मोखाडा, वाडा येथील शिक्षकांचं काय? शृंगारतळी, गावलोली इथल्या मुलींच्या पायपिटीचं काय? अशा प्रश्नचिन्हांची उत्तरं जेव्हा एखाद्या शाळेत सुटलेली दिसतात, तेव्हा स्वप्नातली शाळा बघण्याचं अपूर्व समाधान मिळतं. स्वप्नातली शाळा- जी प्रत्यक्ष पाहिली, ती एरवी चर्चेत नसलेल्या बुलढाण्यातली. कदाचित गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वाशिम, हिंगोली इथंही काही आगळेवेगळे प्रयोग होत असतील. शाळा हीच एक प्रयोगशाळा- असं त्यांचंही रूप असेल. पण माझ्या प्रवासात बुलढाण्यातली भारत विद्यालय ही अशी एक शाळा पाहिली, की शाळा- शाळा म्हणून जे चिरे माझ्या मनात घट्ट होते, त्या दगडी आकृतीला तडे गेले. त्यातून अश्वत्थाचे लसलसते अंकुर आले.

आगाशे पुरस्काराच्या निमित्तानं तिथं गेलो अन् रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनाचं एक दालनच जणू माझ्यासाठी खुलं झालं. विद्यार्थ्यांनीच परीक्षकांची भूमिका करून निवडलेल्या पुस्तकाच्या पारितोषिकापासूनच या नवतेला सुरुवात झाली. आणि पुढे 'हे पाहू की ते पाहू? हवेत डोळे सत्रा' अशी अवस्था झाली. हिरव्यागार पर्णराजीत पहुडलेलं हे एक गोजिरवाणं घरकुलच आहे... तीन हजार मुलांचं. मणींद्र शुक्ल यांच्यासारखं कल्पक नेतृत्व मुख्याध्यापक म्हणून

तिथं अखंड राबत आहे. दिवाकरभय्या आणि शशीताई आगाशे या दाम्पत्याच्या मनातूनच अंकुरलेलं हे ‘भारत विद्यालय‘ विद्यार्थ्यांना फक्त परीक्षार्थी करीत नाही, तर समृद्ध माणूस करण्याचा ध्यास घेऊन कार्य करतं.
शाळेतून फिरताना गंमतच वाटली. एखादा मोरच तुमच्या जवळून पिसारा झुलवीत जाईल. तुम्ही त्या निळ्या-जांभळ्या चमकदार जगात हरवतानाच उड्या मारत जाणारं हरणाचं शावक दिसेल. शाळेत खरीखुरी हरणं, ससे, मोर ही मुलांच्या चित्रांच्या वहीतली मंडळी अशी समोर वावरताना इथं दिसतात. इथल्या कुठल्याही वर्गात भिंतीवरच्या वात्रट रेघोट्या आढळत नाहीत. कारण? हे वर्ग मुलांनी श्रमदानातून बांधले आहेत. शिक्षकही हातात वाळूची पाटी घेतात. सीमेंटची थापी घेतात. आपल्यासाठी असलेला वर्ग खास आपुलकीनं बांधला जातो.
‘गप्प बैस, बोलू नकोस. समजत नसेल तर चूप्प बैस. हाकलून देईन. आयकार्ड दे आणि चालता हो! लक्ष कुठं होतं? फोडून काढीन...‘ अशी वाक्यं इथं ऐकू येत नाहीत. कारण या भारत विद्यालयात निरोगी लोकशाहीचा प्रयोग सुरू आहे. इथले मंत्री शिकणारे तर आहेतच, पण विशेष म्हणजे ते सुसंस्कृतसुद्धा आहेत. हे विद्यार्थ्यांचं मंत्रिमंडळ शाळेतील कार्यक्रमांचं वेळापत्रक आखतं. पुस्तकातला अभ्यास आणि उपक्रमांची रंगतसंगत यांचा निर्विवाद मेळ घातला जातो. विधायक नेतृत्वाची जडणघडण या उपक्रमातून होते. शिक्षकांसह आमसभा घेतली जाते. दचकू नका. यात शिक्षकांबद्दलच्या सूचना, तक्रारी, प्रश्न यांना शिक्षकांना सामोरं जावं लागतं. शिकवण्याच्या, वागण्याच्या, वेशभूषेबद्दलच्या सूचनांचं अनुसरण शिक्षकांना बंधनकारक असतं. शेवटी शिक्षक कुणासाठी? विद्यार्थ्यांसाठीच ना!
कुतूहलाचे हजार डोळे उघडून मी मुख्याध्यापक मणींद्र शुक्ल यांना अनेक प्रश्न विचारीत होतो. शुक्लसर म्हणाले, ‘एकदा तर एका आमसभेत एका विद्यार्थिनीनं शिक्षकांना नम्रपणे सांगितलं, ‘सर, खिडकीतून वर्गातील मुलांशी कृपया बोलू नका.‘ शिक्षकानं ही सूचना सकारात्मकपणे न घेतल्यानं अपमानित होऊन राजीनामा दिला. व्यवस्थापनानं तो स्वीकारला आणि त्यांना जाऊ दिलं. भारत विद्यालयात तोच शिक्षक टिकू शकतो, ज्याची स्वतःला बदलण्याची तयारी आहे. मुलांचा चांगला मित्र होण्याची तयारी आहे. ‘मी शिक्षक, म्हणजे सगळं माझंच खरं!‘ या वृत्तीच्या शिक्षकांना या शाळेत करमणारच नाही, अशीच येथे व्यवस्था आहे.
थक्क व्हायची तयारी ठेवा. ही शाळा एक अनाथालयही चालवते. सुमारे वीस बालकांचं नाथपण स्वीकारते. त्यांचे आई-बाबा होणारं हे विद्यालय आकाशाला स्पर्श करणारं वाटतं. शाळेचे पूर्वीचे प्रकल्प ऐकले तर वाटतं- खरंच भारत विद्यालयातले आपण विद्यार्थी का नाही झालो? मध्य प्रदेशातल्या जौरा अलापूर येथील शरणार्थी डाकूंच्या मुलांसाठी या शाळेनं काम केलं. जळगाव जिल्ह्यातील खर्डी येथील आगीनं भस्मसात झालेल्या जनतेसाठी वीस दिवसांत पासष्ट घरं या शाळेनं विद्यार्थी-शिक्षकांच्या मदतीनं उभारली. लांजेवार यांच्यासारख्या उत्साही ग्रंथपालांच्या मदतीनं अधिकाधिक मुलं ग्रंथांकडे वळतात. त्या ग्रंथांची परीक्षणं करतात. शक्य असल्यास लेखकांना पत्रं पाठवतात. रोज किती विद्यार्थी ग्रंथालयात आले, देवघेव काय झाली, याची नोंद बाहेर लावली जाते. हे सगळं केलं तर प्रत्यक्ष शिक्षणाचं, निकालाचं काय? असा भेदक प्रश्न नक्कीच कुणीतरी विचारेल. ग्रामीण परिसरातल्या मुलांना कवेत घेऊन फुलणाऱ्या बुलढाण्याच्या या भारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९० टक्के, कधी त्याहूनही अधिक असतो. दरवर्षी गुणवत्तायादीतही मुलं येतात.
१९७० मध्ये दुष्काळाच्या दिवसांत तेव्हाचे वनमंत्री शाळेजवळून जाताना थबकले. ‘पाण्याचा दुष्काळ आहे, तर या शाळेत एवढी झाडी कशी?‘ अधिकारी म्हणाले, ‘ते सगळं वेगळंच प्रकरण आहे.‘
रवींद्रनाथांच्या मनातली शाळाच जणू मणींद्रनाथ चालवीत आहेत! अशी शाळा- जेथे मुलं वाट पाहतात शाळा भरणाऱ्या घंटेची! आणि कष्टी होतात शाळा सुटल्यावर! भारत विद्यालय काय, किंवा अशी प्रयोगशील अनेक विद्यालयं काय, हेच खरं तर उत्तर आहे- आधीच्या प्रश्नांचं! पण उत्तर उगवण्यासाठी आधी महत्त्वाचं आहे- प्रश्न पडणं.

## २०. अविवाहित: समंजस आणि असमंजस

त्याचं पूर्वायुष्य मला माहीत होतं. केवळ आईच्या दुराग्रहापायी त्यानं प्रेमभंग ओढवून घेतला होता आणि आता स्वतःच्या आईवरच सूड घेतल्यासारखा त्यानं अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला होता. मनातल्या वधूला ऐन बहरात तिलांजली द्यावी लागली आणि आता कुठल्याच मुलीकडे 'भावी पत्नी' म्हणून तो पाहू शकत नव्हता. त्याच्या प्रेयसीचंही लग्न अन्यत्र कुठंतरी झालं. वर्षं निघून गेली. आईलाही आता आपल्या दुराग्रहाची किंमत कळली होती. तो मात्र आपल्या निर्णयावर ठाम होता- 'तिच्याशी मी लग्न करणं नको आहे नं, आता कुणाशीच करणार नाही.' ही काळ्या दगडावरली रेघ त्यानं शेवटपर्यंत निभावली. त्यानं व्रत म्हणूनच प्रेम केलं होतं... भिल्लाच्या बाणासारखं. त्या प्रेमातून माघार घेणं त्याला शक्य नव्हतं, इतकं ते व्रतस्थ होतं.

तरीही आम्ही जवळची मंडळी केव्हा तरी सांगत असू- 'दिनकर, अजूनही तुझं वय गेलेलं नाही. आईच्या हातूनही मायेपोटीच घडली चूक. सोडून दे. तिच्या मनात होतं- भावाची मुलगी तू करावीस. तू इतका ठाम राहशील याची तिला कल्पना नव्हती. तीसुद्धा आता रडतेय. आपल्यामुळे दिनकर कायमचा अविवाहित राहिला. अन्नपाणी तिलाही जात नाही. ती प्रत्येक वेळी सुचवते- त्याला सांगा बाबांनो, कुठलीही मुलगी बघ, माझं काऽऽही म्हणणं नाही. फार तर मी पाया पडते त्याच्या.' पण आमचे प्रयत्न त्याच्या रिंगणापर्यंत गेलेच नाहीत. तो अढळच राहिला. आपल्या प्रेमाचं निर्माल्य त्यानं तसंच वाहू दिलं. तो किनाऱ्यावर एकटाच राहिला.

दरम्यान धाकट्या भावंडांची लग्नं झाली. भावजयी आपल्या एकट्या दीराचं आदरानं करीत राहिल्या. दिनकरचं मन एवढं मोठं, की आपली अभ्यासिका त्यानं धाकट्या भावंडाला देऊ केली. स्वतः हॉलमध्ये कोचावर झोपू लागला. तिथंच वाचू लागला, लिहू लागला. मोठा भाऊ अविवाहित आणि आपण मात्र संसारात रमलो... आपली मुलं 'काका-काका' म्हणून त्याच्या जवळ जातात, पण त्याची मुलं आपल्याला 'काका' म्हणण्याची शक्यता नाही- या वास्तवानं एकमेकांवर प्रेम करणारी धाकटी भावंडं कुढत राहिली.

एकदा तलावपाळीवर मी आणि दिनकर बसले होतो. समोरून एक चौदा- पंधरा वर्षांचा मुलगा शाळेतून येत होता. दप्तर घेतलेला. अनपेक्षितपणे दिनकर म्हणाला, 'आज माझाही मुलगा एवढा असता नै ?' मी चमकून त्याच्याकडे पाहत म्हटलं, 'दिनकर, अविवाहित राहण्याचा तुझ्या निर्णयाचा तुला पश्चात्ताप होतोय ?' दीर्घ श्वास घेत तो म्हणाला, 'पश्चात्ताप नाही. कारण तो मी स्वतःच घेतलेला निर्णय आहे. पण आता भोवतीच्यांचे संसार बहरले. माझे भाऊ, त्यांच्या बायका आणि मुलं यांची वेगवेगळी बेटं तयार झाली. सगळे माझ्यावर प्रेम करतात. उलट, मला एकटं वाटू नये म्हणून केवढी धडपड करतात. ती धडपडही मला नको वाटते. त्यांचं स्वतःचं आयुष्य आहे, त्यात माझं एकटं असणं 'उगीचच' याची मला जाणीव होते. बरं, मी घेतलेला निर्णय सूडापोटी होता, तो काही विवेकानंदांसारखा तपश्चर्येतून आलेला नव्हता. स्वतःशी एकांतात मी खूप संघर्ष केला. भावनांची प्रचंड वादळं मला मोडत गेली. त्यामुळे मी उग्र झालो. घरात चिडचिडा झालो. या ना त्या कारणानं सर्वांना माझ्या मुठीत ठेवण्याची पराकाष्ठा करू लागलो. मग आधीचं प्रेम कमी होऊन तेही माझा तिरस्कार करू लागले. मला पश्चात्ताप अविवाहित राहण्याचा होत नाही. माझं अविवाहित राहणं हे ध्येयशून्य होतं. कुठल्याच सामाजिक कार्यासाठी, कलेच्या ध्यासापोटी मी एकटं राहण्याचा निर्णय घेतला नव्हता. मी निस्सीम प्रेम केलं. त्या प्रेमाची किंमत मोजताना आता मी अनेकांना दुःख देतोय. आता ना घर, ना दार- कुठंच जाता येत नाही. त्रिशंकू झालाय!'

स्वतःची कातडी छिलून भेदकपणे स्वतःला पाहणं आणि निघणारे निष्कर्ष दुसऱ्याला दाखवण्यासाठीही हिंमत लागते. दिनकरकडे ती होती. म्हणूनच तर त्यानं ध्येयशून्य अविवाहिताची मानसिक फरफट स्वतःच माझ्यासमोर टांगली होती.

लग्न करणं- न करणं हा पूर्ण खासगी निर्णयही आपल्या समाजात सार्वजनिक होऊन जातो. कारण शंभरातला एखादा अविवाहित सोडला, तर उरलेले ९९ भरकटलेले ब्रह्मचारी असतात. 'इतक्यांची लग्नं झाली आहेत. कुणाचं

भलं झालंय!‘ हे विवाहितांचं दु:ख, किंवा ‘या धटिंगणाशी लग्न केलं, त्यापेक्षा राहिले असते मी एकटी, तर सुखी झाले असते!‘ या त्राग्याला काही अर्थ नसतो.

लग्नानंतरच्या असफल आयुष्याच्या निराशेपोटी येणारे अविवाहितांचे उद्गार हे काही ‘योगी‘ जीवनाची ओढ असणाऱ्यांचे नव्हेत. भावभावनांना कुठंही स्वैर सोडण्याच्या हव्यासापोटी, तसंच एकनिष्ठेनं संसार करण्यासाठी लागणाऱ्या अलिखित संकेतांची अडचण ज्यांना होते, अशांचे अविवाहितपण म्हणजे ‘ब्रह्मचर्य‘ नव्हे. आपली ऊर्जा उदात्त ध्येयासाठी समर्पित करण्यासाठी वळविणे ही दीर्घ साधना आहे. त्या साधनेतले असंख्य अडथळे पचवून आपल्या इच्छित ध्येयाकडे निघणारे योगीजीवन- हे केवळ लग्न केलं नाही म्हणून ‘ब्रह्मचारी‘ असणाऱ्यांचं काम नव्हे! असे ब्रह्मचारी घरादाराला तापदायकच होतात. ना धड आध्यात्मिक, ना धड भौतिक. अशा माणसांची जी दमछाक होते, तीच गत सूडापोटी वा स्वैरतेपोटी ‘एकटं‘ राहणाऱ्यांची होते.

सर्वांनी लग्न केलंच पाहिजे, असा कुठंही कायदा नाही. खरं तर बरीचशी वैतागवाडी लग्नानंतरच सुरू होते, हेही गमतीदार सत्यच. पण त्यावर ‘एकटं‘ राहणं हा उपाय आहे का? आपल्या ‘एकटं‘ राहण्याचा पुढे इतरांना उपद्रव होत नाही ना? याचाही स्वत:च विचार करायला हवा. स्वीकारलेलं एकटेपण स्वत:ला आनंददायी आणि इतरांना आदरणीय होईल याची काळजी घ्यायला हवी. न्यूटनसारखा शास्त्रज्ञ गंमतीने म्हणतो- ‘वेगवेगळ्या प्रयोगांत मी एवढा गुंतून गेलो, की लग्न करायचंच राहून गेलं.‘

सामाजिक चळवळी, जगप्रवासाचं रम्य निमंत्रण, अभिजात ग्रंथांचं विपुल वाचन, आध्यात्मिकतेतून होणारा आंतरिक विकास- एक ना दोन, हजार वाटा अशा आहेत, ज्या एकट्याच्याच आहेत. तिथं आपलं एकटेपण समष्टीत विरून जातं. असे आनंदयात्री अनेक आहेत.

काहींचा प्रपंच समाजाचाच असतो. कलेचं उत्तुंग शिखर गाठून कोट्यवधी मनांवर अमृताचा घनू होणारे कलावंत, भोवतीच्या वेदनेवर स्वत:च करुणेचा फुंकर होणारी देवमाणसं, हे राष्ट्र आतून सशक्त व्हावं म्हणून जीव उगाळणारे समाज- कार्यकर्ते यांना मुळी तुमच्या-आमच्या दृष्टीनं जो ‘प्रपंच‘ आहे, त्यात गुंतून चालणारच नसतं.

पण हे अपवाद सोडले तर आता वय निघून गेल्यानं दु:खी असणारे ‘एकटे‘ तापदायक ठरतात. आपण कुणालाही नकोसं होण्याइतका दुसरा पराभव नाही.

अविवाहित राहण्याच्या निर्णयाचा एक वेगळाच दृष्टिकोन एका परिचित स्त्रीकडून कळला. आपल्या अविवाहित असण्याच्या निर्णयाबद्दल सांगताना त्या म्हणाल्या, ‘मी आहे माणूसघाणी. हेकट. कुणाशीच माझं अजिबात पटत नाही. जन्मात पटणारही नाही. हे मला पक्कं माहीत आहे. माझ्यातले दोष कधीच जाणारे नाहीत. स्वच्छतेचं मला विकृती वाटावं असं वेड आहे. या माझ्या स्वभावामुळे दुसऱ्या व्यक्तीचं सगळं आयुष्य मी संपवून टाकावं, असं मात्र मला वाटत नाही. म्हणूनच मी हा निर्णय घेतला. पुढे चांगलासा वृद्धाश्रम बघेन. देहदानाचा निर्णय आधीच घेतलाय.‘

असेही समंजस अविवाहित असतात; जे एका पुरुषाला वा एका स्त्रीला त्यांच्याशी लग्न न करून वाचवतात. खरंच व्यक्ती तितकेच दृष्टिकोन, हेच खरं!

# २१. खरा दागिना

इयत्ता दुसरीतली गोष्ट एका घटनेमुळे सहज आठवली. गोष्टीचं नाव होतं- ‘खरा दागिना.‘ त्या गोष्टीत एक स्पर्धा होती- श्रीमंत असण्याची. खूप दागिन्यांनी सजलेला, पण विलक्षण हडकुळा, निस्तेज असा एक मुलगा आणि त्याच्याबरोबर निरोगी, तेजस्वी असा एक मुलगा- ज्याचे कपडे ठिगळ लावलेले, साधे असे. स्पर्धेत आपणच पहिले येणार, असं त्या श्रीमंत मुलाला वाटत असतं. पण पहिला येतो तो सुदृढ मुलगाच. श्रीमंत मुलाला स्वाभाविकच वाटतं- आपल्यावर अन्याय झालाय. जमतील तितके दागिने घातले आपण; पण हा फाटके कपडे घातलेला मुलगा पहिला येतो म्हणजे काय? गुरुजी सांगतात, ‘नुसतं सोनंनाणं घालून कुणी श्रीमंत होत नाही बाळा! खरी श्रीमंती- निरोगी देह! निरोगी मन! डोळ्यांतलं तेज! याचे कपडे साधे असतील, पण त्याची दिनचर्या चांगली आहे. हा व्यायाम करतो, अभ्यासातही पुढे आहे. त्याला कळलंय- खरा दागिना कुठला ते!‘

साधारणतः असाच आशय होता त्या गोष्टीचा. मी त्यात थोडी आता सुचलेली भर घालून सांगितली. पण ही गोष्ट आठवण्याचं कारण झाली एक साधी घटना! घराजवळ रिक्षात बसलो आणि कॉलेजात निघालो. वाटेत रिक्षावाला मोजू लागला- रस्त्याच्या लगतच्या इतर रिक्षा. म्हटलं, ‘रिक्षा का मोजताय?‘ तो म्हणाला, ‘साहेब, बघा वीस रिक्षा आहेत. वीस गुणिले पन्नास म्हणजे हजार रुपये फुकटच मिळणार इथल्या साहेबाला.‘

‘का रे?‘

‘मीटर पासिंग चाललंय. हे असंच चालतं. मी दिवसभर मरमर मरणार, मला दीडशे, फार तर दोनशे, आणि याला मात्र पंधरा मिनिटांत हजार. दिवसभरात किती हजार कोण जाणे!‘

रिक्षाचालकाचं दुखणं खरं तर बहुतेकांचं दुखणं असतं, तेच होतं. आम्ही एवढे कष्ट करायचे आणि आम्हाला एवढेसेच पैसे! आणि तो अमकाढमका साहेब, बसल्या बसल्या सही-शिक्क्याचे दोनशे घेतो. पैसे दाबल्याशिवाय एक फाईल पुढे सरकवेल तर शप्पथ! चुकीच्या मार्गाने भरपूर पैसा मिळवणाऱ्यांबाबत असूया असणाराही एक सरळमार्गी वर्ग आहे. या वर्गालाही खरं तर अशा पैशाचा मोह असतो. पण काही वेळा संधी नसते, काही वेळा संस्कारांमुळे आलेली भीरूता असते. ठरवून ठामपणे जे घाम गाळून पोट भरतात, जे पैसे मिळतील ते हक्काचे, श्रमाचेच हवेत, असा आग्रह असणाऱ्या माणसांना भ्रष्ट श्रीमंतांबद्दल असूया वाटण्याचं काही कारणच नसतं.

रिक्षाचालक पहिल्या वर्गाचा प्रतिनिधी. बिचारा अंदाजानेच (कदाचित् स्वानुभवानेही) समजत होता- मीटर पास करणाऱ्याला हजार रुपये; मला मात्र दोनशेच. सिग्नलला रिक्षा थांबली. त्याचा फायदा घेऊन मी म्हटलं, ‘तुम्हीही तसे श्रीमंत होऊ शकता. मीटर चार-पाच आकडे फास्ट ठेवून किंवा नव्या प्रवाशाला खूप लांबून वळसा घालून, मीटर वाढवून. फसवून लबाडीनं तुम्हीही पैसा मिळवू शकता. पण काय हो, हा पैसा शेवटपर्यंत टिकतो असं तुम्हाला वाटतं? असा गैरमार्गाने पैसा मिळवणारे सुखी- समाधानी जीवन जगतात, असं तुम्हाला खरंच वाटतं का?‘

‘तसं नाही, पण सायेब, हल्ली दुनिया अशाच लोकांनी भरलेय बघा. तो लालू, ती ललिता, तो वीरप्पन, मंत्री, पेपर फोडणारे, हे हवालदार, नगरसेवक... एक का दोन, कुटं काय बिगडतं यांचं? मजेत जगतात न् मजेत मरतात.‘

रिक्षाचालक युक्तिवादातही तरबेज होता.

‘अहो, पण ही नावं तुम्ही आदरानं घेतली का? तुम्ही पण त्याच यादीत-‘

‘पैसा महत्त्वाचा हो. आदरबिदर हे आपल्यापुरतं. ते बंगला-गाडीत धमाल करतात, आपण आपलं कष्ट करत तडफडत राहतो.‘

माझं ठिकाण आलं. मी उतरलो.

पण तो पुन्हा भेटला तर मला एक गोष्ट त्याला सांगायचीय्. कारण आज कोणत्याही मार्गानं श्रीमंत व्हायची घाई झालेली माणसं वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर दिमाखदारपणे झळकतात. त्यांच्याच हस्ते मुलांना बक्षिसं मिळतात. तीच उपदेशाच्या लसी टोचत गावगन्ना भटकताना दिसतात. भ्रष्टाचाराच्या आरोपाचे मथळे बघता बघता पुसट

होतात. 'काही घडलंच नाही' अशा चेहऱ्यानं डाकबंगल्यात 'चिअर्स!'च्या नादात आरोप करणारे आणि आरोपी गळामिठी घालताना त्यांच्या कातडीवर एक नवं कातडं चढत जातं. अशी अनेक कातडी चढली की मग काय, आपल्या देव्हाऱ्यातले नियम तिथल्या उकिरड्याला नसतातच!
पण अजून मतं आणि मनं आकाराला यायच्या पिढीला हे वास्तव दिसतं. मग निष्ठेच्या पायवाटा पक्क्या न झालेल्या पावलांना भलतीच दिशा मिळते; जी बघता बघता त्यांची दशा करते.
त्या रिक्षाचालकाला सांगायचीय् एक हकीकत. थोडी वैयक्तिक, पण तरीही याही प्रवृत्तीचे लोक आहेत, म्हणून त्या सर्वांची.
माझे वडील अशा व्यवसायात होते की, जिथं कुठलाच पुरावा न ठेवता उजळ माथ्यानं उदंड पैसा खाता आला असता. पाचशे सिमेंटच्या गोणी गोडाऊनमध्ये ठेवताना सांडलेल्या सिमेंटची दोन-चार पोती होतातच. ते खाली सांडलेले सिमेंट विकले तरी पोत्यांची संख्या अचूकच राहते. 'कुठेही बदली करा, माझं चंबूगबाळं तयार आहे,' या स्वाभिमानी कण्याचे वडील. त्यामुळे या गैरप्रकारात सहभागी न होण्याचे व्यावहारिक हाल त्यांनी सोसले. पण तीच सत्त्वपरीक्षा होती. महिना दोनशे वीस- पुढे वाढून चारशे दहा रुपयांमध्ये त्यांनी अनेक वर्षं फरफटत संसार केला. पण त्याचवेळी बरोबरचे लोक चारचाकी वाहनांतून फिरताना त्यांनी पाहिले. असाच एक बरोबरीचा सहकारी. जिथून मिळेल तिथे हात मारून गब्बरसिंग झालेला. वडिलांची 'बावळट सज्जन' म्हणून टिंगल करणारा. अनेकांप्रमाणे त्यालाही माहीत नव्हतं, गैरमार्गाने मिळवलेला पैसा ही 'लक्ष्मी' नसते. ज्या वैभवाला सरस्वतीचे अधिष्ठान, तेथेच ऐश्वर्य!
घामाचा गंध असलेला पैसाच व्यक्तीला अंतिम यश देतो, हे त्रिवार सत्य तारुण्याच्या ऐन भरात, सत्तेच्या कैफात वा व्यसनांच्या मगरमिठीत खोटे वाटते. भंपक वाटते. पण विनाश्रमाने मिळालेली संपत्ती नियती चक्रवाढ व्याजाने वसूल करते.
योगायोग म्हणा, काय वाट्टेल ते नाव द्या- वडलांबरोबर काम करणाऱ्या त्या भ्रष्ट व्यक्तीच्या आयुष्यातील ती दुर्घटना आणि ते दिवस मोठे करुण गेले. विकारांच्या पाऊलवाटेने आलेले दुर्गुण धिप्पाड झाले. मोठ्या मुलाने घराचेच मद्यालय केले. तरुण मुलगी अपात्र गृहस्थाबरोबर पळून गेली. त्यात अशा घरातल्या देव्हाऱ्यातली निरांजनं बहुधा देवालाही नको असावी. तुपाच्या मोहाने आलेला उंदीर जळती वात घेऊन जाताना ठिणगी गृहस्थांच्या गादीवरच पडली. आगीच्या भडक्यात पत्नी मनोरुग्ण झाली, तर या आगीत पतीचे हात इतके भाजले की ते कापावेच लागले. हे कळल्यावर वडील त्याला बघायला दवाखान्यात गेले. एकेकाळी वडिलांना हिणवणारा, पैसे खात नाही म्हणून बावळट म्हणणारा तो माणूस अश्रू अनावर होऊन म्हणाला, 'दवणे, ज्या हातानं काळी कृत्यं केली, तेच हात देवानं...'
सत्त्वगुणी माणसाच्या आयुष्यातही दुःखं येतात, संकटं येतात. पण अशावेळी त्याच्याकडे एक नीतीधैर्य असतं. श्रद्धा असते. सत्त्व असतं. पण भ्रष्टांकडे ही शक्ती नसते. वयाने खचत गेल्यावर ही मंडळी विकल होतात. भेकड होतात. विकृत होतात. पुष्कळदा बाहेरून वाटणारे अनेक इंद्रमहाल ही आतून त्यांची थडगी असतात.
दुसरीची गोष्ट आठवली. खरंच 'खरा दागिना' कोणता? मनःशांतीचा! परदुःखावर, शोषणावर आधारीत नसलेल्या घामाच्या ऐश्वर्याचा! पुन्हा तो रिक्षाचालक भेटलाच तर त्यालाही हे सांगायचंय् सगळं!

## २२.    गोष्ट :धागा तुटल्या पतंगाची!

'हाय सर!'

मी चटकन् तिला ओळखलंच नाही. नंतर सटपटून किंचाळलो- 'नयन तू?' ती खळखळून हसली. 'सर, प्रत्येकाचं हे असंच होतंय्.'

'अगं होणारच. काय हे माकड करून घेतलय्स स्वतःचं?'

'सर, आता लग्न झालंय माझं. त्यांच्या आवडी वेगळ्या. ते म्हणाले- काकूबाईसारखं राहायचं नाही. पॉश राहा. सर, लाईफ पार बदललंय माझं. स्विमिंगला जाते पहाटे. हॉर्स रायडिंगही जॉइन केलंय.'

'तू? घोड्यावर?

'येस. बघा- बघतच राहा.'

स्कूटरला किक् मारून नयन वळणावर दिसेनाशी झाली.

बॉयकट्, तंग जीन्स, बघणाऱ्याच्या डोळ्यांना स्पर्श होईल इतकी लिपस्टिक आणि बोलण्यातली बेदरकारी... नयनचं हे रूप जन्मात अपेक्षिलं नव्हतं. लांबसडक पिंगट केसांमुळे परिसरात कौतुकाचा विषय असलेली, सालस वस्त्रांमुळे आणि मृदू संवादी वृत्तीनं ज्येष्ठांच्याही आदराचा विषय असलेली नयन लग्नानंतर ही अशी कात टाकेल, हे फक्त हिंदी सिनेमातच शक्य होतं. नयनला बालपणापासून मी ओळखत होतो. अक्षरशः रस्त्यावर उदबत्त्या विकणाऱ्या बाबांची ही मुलगी. शेजारच्यांनी दया म्हणून दिलेल्या स्कर्ट-ब्लाऊजवर तिचं बालपण तरुण झालं. ज्ञातीच्या शिष्यवृत्त्या घेत तिचं शिक्षण झालं. तिच्या काळोख्या, कण्हणाऱ्या घरात एकच गोष्ट सुंदर होती; ती म्हणजे नयन! सात्त्विकतेमुळं उजळलेली नयन!

नयनला एका शिबिरात मिलिंद भेटला. मिलिंद! एक उमदा, रसिक तरुण! घरचा धनाढ्य व्यापारी! मनं जुळली. मग धनाची पत्रिका बाजूला पडली! नयन मिलिंदची झाली! भेटायची तेव्हा नयन मिलिंदबद्दल सांगायची. मिलिंदची रसिकता, मिलिंदची बुद्धिमत्ता, मिलिंदचा त्याच्या वडिलांकडून आलेला व्यापाराचा पिढीजात गुण! बस्स. मिलिंद! मिलिंद! आम्ही घरातही कौतुकानं बोलायचो, 'नयनचं उत्तम झालं देवकृपेनं!' एक गरीब, सोज्ज्वळ मुलगी तालेवार घरात गेली. आता त्या घरालाही मंदिराचं रूप येईल! लक्ष्मीला सरस्वतीच भेटली!

पण मिलिंदच्या रसिकतेच्या कल्पना चौकटीला तडा देणाऱ्या होत्या. पहिल्याच भेटीत मिलिंद जणू अंतर्बाह्य दिसला. म्हणाला, 'सर, बघाच तुमच्या नयनला सहा महिन्यांत कशी करतो! ओळखणारच नाही तुम्ही. नुसती काकू करून ठेवलेय सर्वांनी. जमाना कुठं चाललाय! आमच्या पार्ट्या, क्लब, हाय-फाय जगात हे असं ध्यान चालेल का?'

माझ्या काळजावर चर्रदिशी ओरखडा उमटला.

त्याच्याशी स्पष्ट बोलण्याइतका परिचय नव्हता. सावध करण्याइतकी जवळीक नव्हती. शेवटी आपल्याला आपले उद्योग असतातच, त्यात आपण व्यग्र होऊन जातो. पण त्या व्यग्रतेतही कुणीतरी येऊन सांगायचं- 'तुमची ती काकूबाई नयन ऑस्ट्रेलियाला जाऊन आली आणि आता पार बदललेय. स्लिवलेस काय, तोकडे स्कर्ट काय!' क्षणात् आठवायचा मिलिंद! एका निरांजनाचं बटबटीत रोषणाईत रूपांतर करणारा! रसिकतेच्या आचरट कल्पनेनं पछाडलेला मिलिंद!

रस्त्यात मिलिंद असाच भेटला. त्यानंच पाहून कार थांबवली. 'काय रे एकटाच?' 'नयनलाच आणायला चाललोय. स्केटिंगचा कोर्स करतेय. नंतर फ्रेंचचा कोर्स! सर, गूड न्यूज. टिळकवाडीत हॉटेल सुरू करतोय. बार कम् रेस्तराँ.'

कार भन्नाट गतीनं...

दुपारी अचानक नयनचा फोन. 'हाय सर! वाटलं नव्हतं भेटाल, जस्ट ट्राय केला. सर, गूड न्यूज. डान्सिंग क्लास जॉइन केलाय्.'

'नयन, तू एक गोष्टीतलीच मुलगी वाटतेयस्. एकाच वेळी स्केटिंग, फ्रेंच, ड्राइव्हिंग, डान्स, स्विमिंग...'

एक बेदरकार हसू फसफसत राहिलं माझ्या उद्गारावर. त्याकडे दुर्लक्ष करीत मी म्हटलं, ‘नयन, माझा तसा अधिकार नाही; तू शाळेत असतानाचा तुझा केव्हाचा तरी शिक्षक मी; पण एकच सांगतो नयन, हे सगळं जरूर कर. पण मग घर केव्हा? तुझा चुणचुणीत मुलगा अजिंक्य- त्याला केव्हा शिकवतेस? नवरा व्यापारात बिझी, तू ह्याच्यात. मग सासू- सासऱ्यांचं केव्हा बघतेस? नयन, मी तुम्हा दोघांवरही प्रेम करतो. म्हणूनच सांगतोय- मिलिंदलाही जरा आवर. पैसा- पैसा... हा प्रचंड पैसा तुम्हाला फरफटत नको त्या क्षितिजावर फेकून देईल.‘ अर्थात भन्नाट तारुण्य आणि बेछूट पैसा कधीही कुणाचं ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतात. पैसा सर्व बाजूंनी कोसळत राहतो. या एवढ्या पैशाचं काय करायचं, हीच एक मनोरुग्णाईत करणारी समस्या होते. मिलिंद-नयनचं हेच झालं होतं. एकीकडे अवाजवी उत्पन्न, दुसरीकडे उन्मार्गी रसिकता!

नयननं माझ्याशी संवादच थांबवला. तिला वाटलं- मी कौतुक करीन. पण खडसावल्यानंतर तिचा आवाजच लोप पावला. परंतु न सांगणंही शक्यच नव्हतं. अशा वेळी स्नेहाच्या नात्यांना तिलांजली द्यावी लागली तरी बेहत्तर! मनातलं परखड बोलावं! उपयोग झाला नाही तरी मग अपराधी वाटत नाही.

मध्ये काही वर्षं गेली. नयन-मिलिंद कधीच विस्मरणाच्या धुक्यात गडप झाले होते. पण हे धुकं एकदा रात्री अकरा वाजता प्रगट झालं. धुकं एकटंच होतं... मिलिंद नावाचं. केस मुळाशी पिकलेले. डोळे वर्तुळात काजळलेले.

‘तू?‘

‘प्लीज, थोडा वेळ द्याल?‘

मिलिंद भडाभडा बोलत होता. रडत होता. फसलेल्या आत्महत्यांच्या ठिणग्या आणि आता ‘काय करू?‘चा वणवा! मिलिंदच्या मित्राबरोबर नयन पंधरा दिवस बंगलोरला राहिली. ‘जस्ट एन्जॉय!‘ त्या लॉजचा पत्ता शोधत रात्रीच मिलिंद बंगलोरला गेला. अनपेक्षितपणे. पण अपेक्षित सत्याला त्याला सामोरं जावं लागलं. ‘सर, नयननं विश्वासघात केला. तरीही मी तिला स्वीकारणार आहे. आमच्या अजूसाठी. सर, मेंदू फुटून जाईल. काय करू?‘

मी काही ‘अक्सीर इलाज‘ सांगणारा बंगाली बाबा नव्हतो. चार गोष्टी लिहितो याचा अर्थ मला जगण्यातली गूढ कोडी लगेच उकलतात असा नाही. पण मिलिंदला एवढंच सांगितलं, ‘मिलिंद, नयनला तू- तू संपवलंस. प्रतिष्ठेच्या, चैनीच्या अमर्याद कल्पनांनी तुझं वाटोळं केलं. विश्वासघाताची पूर्वतयारी तू केलीस, तिनं शेवट केला, एवढंच. एका देवतेची तू राक्षसीण केलीस. आता आयुष्यच बदलायचं असेल तर मुळात व्यवसायापासून प्रामाणिक हो. अंतर्बाह्य बदलणं अवघड आहे, पण अशक्य नाही.‘

रात्री केव्हातरी मिलिंदला निरोप दिला. स्वातंत्र्य, प्रगती यांच्या उनाड कल्पनांनी विस्कटणारी अनेक घरं नयन-मिलिंदच्या वाटेवर असतात. आपली मुलं केव्हा येतात? कुठे जातात? दिलेला पैसा कुठे खर्च करतात? इतका पैसा त्यांच्या पाकिटात देणं योग्य आहे का? आपल्या मुला-मुलींच्या फॅशन्स, त्यांचं मित्रवर्तुळ, त्यांचं कॉलेजात नियमानं जाणं आहे का? मित्रमैत्रिणींचा केवळ संवाद आहे की घसट आहे? स्वातंत्र्य देतोय्, पण स्वातंत्र्याचा एक नियम ‘संयम‘ हा आहे. मिळालेल्या स्वातंत्र्यातून फुलबाग करायलाही माळ्याकडे तण उपटण्याची कातर लागते. आज ही कातरच हरवलीय!

‘सात्त्विक म्हणजे मागासलेला‘ अशी व्याख्या करणारा अश्रद्ध बुद्धिवादी समाज प्रसारमाध्यमांच्या रिमोट कंट्रोलने सारा समाज निराशेच्या खाईत नेत आहे. अशावेळी स्वतःचे ‘श्री‘मत घ्यायला हवे. नाती कुठलीही असोत, विकासाचं स्वातंत्र्य हवंच. पण ते जर विकाराकडे झुकत असेल, तर कठोरपणे पायबंद घालण्याचीही कुवत हवी. पाळत नको, पण वेध हवा! रसिकतेला अभिरुचीची चौकट हवी. प्रगतीला विवेकाचे आकाश हवे!

# २३.    प्रवासातली पथ्यं

कविवर्य बोरकरांनी म्हटलं होतं, 'मी वरून येतानाच 'घेऊन' आलोय!' त्याचवेळी जाणवलं- परमेश्वराकडूनच जे 'घेऊन' आलेत, त्यांची धुंदी आजन्म टिकते. त्या धुंदीनंच 'झाडे झाली निळी निळी' भासू लागतात, तर 'हवेत अत्तर तरते गं' याची उत्कट प्रचीती येते. बोरकरांचा तो परमेश्वरी सोमरस काही आम्हाला मिळाला नाही, पण बोरकरांच्या कवितेनं आम्हा रसिकांचे दिन मात्र 'इंद्रदिन' केले! त्या इंद्रदिनाचा असर या क्षणापर्यंत सरत नाहीये. त्या वयात चांदणं तर सुंदर होतंच. ग्रीष्मातला उन्हाचा चटकाही सुखद होता. हिरवळीवरून लोळताना बेधुंद व्हायचो. पण सुकलेल्या नदीत फुटलेल्या टायरची सायकल भरउन्हात फरफटत नेताना घामालाही मस्तीचा सुगंध असायचा. आज पंचतारांकित हॉटेलातील मसालेदार पदार्थांजवळून जाताना शेवटी 'दालफ्राय'जवळ येऊन थांबतो. कारण त्या मसालेदार देखण्या पदार्थांतील हृदयशून्यता जाणवते. पण तारुण्यातल्या त्या इंद्रदिनात शिदोरीतली पापुद्रा निघालेली बाजरीची चवदार भाकरी आणि हायहुय करून डोळ्यांत पाणी आणताना मनात गाणी फुलवणारा मिरचीचा ठेचा किती अपार चविष्ट होता, त्याची याद छळते. आज वातानुकूलित बेडरूममध्येही निद्रादेवीच्या हाता-पाया पडावं लागतंय. पण त्या 'चंद्रमंदिर घडीत' शेणानं सारवलेल्या भिंतींच्या मातीच्या घरात टोचणारी घोंगडीही उबदार गोधडी व्हायची. हजार पुस्तकांनी जे जगणं शिकवलं नसतं, ते निसर्गतःच रानपाखरांचे पंख असणाऱ्या दोस्तांमुळे शिकलो. आज स्वीमिंग टँकवर मुलाला नेताना पाण्यात डोळे आणि डोळ्यांत तेल घालून मुलावर 'पाळत' ठेवताना बाप झालेल्या हृदयाचा ठोका धाकधुकत असतो. पण तेव्हा 'बघ विहीर किती खोल आहे!' म्हणून दाखवताना ज्ञानेश्वर सिनलकरनं मला चक्क विहिरीतच ढकलून दिलेलं आठवतं. भरलेल्या विहिरीत आधीच उतरलेले पट्टीचे पोहणारे ठेवून मला ढकलण्याची काळजी त्यानं घेतलेली असते. त्यावेळी नाका-तोंडात गेलेलं पाणी, झालेला संताप, नंतर त्या संतापाचं झालेलं गमतीदार आठवणीतलं रूपांतर हे आजही विजेचा पाळणा रक्तात खेळवतं.

नसायचं कुठलंही प्लॅनिंग प्रवासाला. खिशात जेमतेमच पैसे, कुठं जायचं ते ठरायचं, आणि बस्स् निघायचो. अनवट पाऊलवाटेनं हाडं चिंबून बेधुंद होऊन भटकताना वातावरणाचीच सुरई व्हायची. मन तेव्हा पिसाट गरुडासारखं कुठून कुठेही भरारी घ्यायचं. कधी ट्रकने काही पल्ला, कधी टेम्पो, कधी बैलगाडी. एकच लक्ष्य- 'मुक्काम' गाठायचा! रविवारी मार्केटात निघालेल्या कोंबड्यांच्या टेम्पोतूनही मध्यरात्री वेडा प्रवास केलाय. कोंबड्यांची क्वॅक्ऽऽ क्वॅक्, त्यांच्या पिसांचा आणि अस्तित्वाचा उग्र गंध आणि मध्ये आम्ही! उतरल्यावर धबधब्यात आंघोळ केली की शेकडो गंगास्नानांचं पुण्य मिळायचं.

त्या दिवसांनी, त्या प्रवासानंच एक रग दिली. त्या ठेचा-भाकरीनं कुठंही काहीही, मिळेल ते खाऊन पचवण्याची, त्याचं अमृत करण्याची किमया दिली. आज या साऱ्याचाच खूप त्रास होतो. का? वाटतं- का आपल्यात एवढी धुंदी? का एवढी संवेदना? का आपण एवढे टोकाचे उत्कट? व्यवहाराच्या डांबरी वाटेनं जिवलगांच्या सहवासातील त्या मातीच्या पाऊलवाटा गिळून टाकल्या. उरला फक्त मृत्तिकागंध! खिशात पुष्कळ पैसे, पण दरिद्री जगतो आपण!

आजच्या भोवतीच्यांना टाळताही येत नाही आणि त्यांच्याबरोबर प्रवास जमतही नाही. परवा सज्जनगडावर गेलो. परिचित कुटुंबांबरोबर! गाडीतून उतरल्यापासून रुसून बसलेली मित्रपत्नी आणि मित्र. चेहऱ्यावर कुठलाही आनंद नाही. साध्याशाच हॉटेलमध्ये पहिला चहा घ्यायचा ठरलं. 'श्शी! हे काय हॉटेल? कुठं आणलं? त्यापेक्षा नसता घेतला चहा तर बरं झालं असतं!' बरोबरच्यांनाही संकोचल्यासारखं झालं. मित्र परोपरीनं समजावत होता- 'अगं, छोट्या गावात ही अशीच हॉटेलं असतात. हीसुद्धा गंमतच आहे.'

'गंमत कसली? ठाण्याला गेल्यावर आलं आजारपण म्हणजे निघेल गंमत!'

एका कुरकुऱ्या बाईनं साऱ्या सहलीची मजा खाऊन टाकली.

सज्जनगडावर पोहोचल्यावरही 'इथं आहेच काय बघण्यासारखं? या रूमही किती साध्या! मला वाटलं- काही लेणीबिणी असतील!'

तळपायाची आग मस्तकाला जात होती. सगळे संयमानं राग आवरून होते. ग्रुपने सहलीला गेल्यावर कुणी कसं वागावं, याचे अलिखित संकेत असतात. एकट्यानं कुठं गेल्यावर जपायची मिजास- समूहानं गेल्यावर दूर ठेवायची असते; हे

कळण्यासाठी वेगळे अभ्यासवर्ग नसतात. आपल्या हेकट, दुराग्रही वृत्तीनं आपण इतरांचा मूड घालवतो, हे अनेकांना कळत नाही. लपलेले व लपवलेले अनेक दुर्गुण प्रवासाच्या दीर्घकाळात बाहेर येतात आणि सोबत्यांना चावत राहतात. सभ्यतेपोटी इतर माणसं 'सहन' करतात, पण आतून निर्णय घेतात- यापुढे 'ही पीडा' असेल तर आपण नाही बुवा येणार!

प्रवास माणसाला आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेऊन असलेली अडचण साजरी करायला शिकवतो. म्हणून बालपणापासूनच वेगवेगळ्या सहली, कॅम्प, वनवासी शिबिरं यांना मुलांना आवर्जून पाठवायलाच हवं. मऊ गादी आणि उशी यांच्याशिवाय न झोपणारं आपलं कुक्कुलं लेकरू- शिबिरात साध्या सतरंजीवर हाताची उशी केल्यावर 'मॅच्युअर्ड' होत जातं. 'पिझ्झा-बर्गरशिवाय काही खात नाही हो मिनू!' असा इंग्रजी झटका देणाऱ्या ममा-पपानं पंधरा दिवस कॅम्पमध्ये मिनूला धाडायलाच हवं. तिथं रस्साभाजीत मिसळलेला निसर्ग पचवताना, स्वतःची ताट-वाटी स्वतः धुऊन ठेवताना लाडानं वाया जाणारं कोकरू मोठं होतं.

या कसल्याचीच सवय नसणारी मुलं-मुली जेव्हा मोठं होऊन कुणाची तरी नवरा-बायको होतात, तेव्हा चारचौघांत मिसळूच शकत नाहीत. कन्याकुमारीचा सूर्यास्त पाहतानाही त्यांना रात्रीच्या जेवणाला लिंबाचं लोणचं आहे की आंब्याचं आहे, याचीच विवंचना सतावते. दौलताबादची सिताफळं खाताना त्यांना उद्याच्या सर्दीचं भय वाटतं. रोतांग पासच्या पुढे हिमवर्षावात ही मनं कधी व्याकुळच होत नाहीत. तेव्हा यांना काळजी असते- आपला सेफ्टी लॉकर नीट लॉक केलाय ना?

आयुष्यातले काही क्षण नक्कीच वेडं होऊन मदिर जगण्याचेच असतात. आज ही 'आतली' धुंदीच घालवून बसण्याच्या योजना आखल्या जात आहेत. सुख बरसतं तेव्हा वेड्यासारखं बरसतं. ते असं आखीव-रेखीव बॉक्समध्ये गोळा करता येत नाही. भिरभिर, झिम्माड धावणारी वेडी, अधाशी ओंजळ निर्माण करावी लागते. सगळीच सुखं कॅमेऱ्यात टिपता येत नाहीत. ती अनंत, अपार असतात.

प्रवासात असं सुख ज्याला झेलायचं नसतं, त्यांनी निदान इतरांची सहल तरी नासवू नये. घराबाहेरचं विशाल घर ज्याला सहस्त्र डोळ्यांनी भोगायचं आहे, त्या घराचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी कुठलाही डोंगर पार करायची जिद्द आहे, त्यानंच प्रवासाला निघावं. प्रवासात निव्वळ पैसे उपयोगी येत नाहीत. सुसंवादी संभाषणाचीही गरज असते. ऐनवेळी उद्‌भवणाऱ्या अडचणींतून त्या क्षणी पार होण्यासाठी निर्णयक्षमता आवश्यक असते. नवं कागदावर आणि काळजावर टिपून घेण्याची अभ्यासक आणि आस्वादक नजर हवी असते. कोरड्या सौदेबाजीपेक्षा घरी जाताना पुढे कित्येक वर्षं पुरतील अशा रमणीय आठवणी नेईन, हा ध्यास हवा. प्रवासानंच प्रवासातली पथ्यं कळतात. अखेर ही प्रगल्भता येणं-हाही एक प्रवासच आहे की!

## २४. अशीही एक यशोदा !

प्रत्येक छायाचित्राचा अभिमानानं तपशील देण्यात रंगून गेलेल्या त्या बाईंना मी म्हटलं, 'फारच काळजीपूर्वक वाढवलंय तुम्ही मुलीला. आज टेबल टेनिसमध्ये तिचं नाव व्हायची शक्यता निर्माण झालेय, याचं एकमेव कारण तुम्ही आहात!'

'आईनं नाही काळजी घ्यायची, तर कुणी? हा बघा- राज्यपालांच्या हस्ते पारितोषिक घेतानाचा...'

बाई लेकीच्या कौतुकाचा एक क्षणही सोडत नव्हत्या. ऐन कोवळ्या वयात मुलीनं मिळविलेल्या यशाचं कौतुक त्या माऊलीच्या डोळ्यांत बघताना मी थक्क झालो. स्वतःच्या कष्टाला असा वसंत आलेला पाहताना, अनेक प्रशस्तिपत्रकं, मानचिन्हं यांची जंत्री दाखवताना त्या बाई क्षणोक्षणी सुखावत होत्या. अधीर मनानं मुलीची कामगिरी समजावून सांगत होत्या.

'सर, रोजचं तिचं जेवण, कपडे, स्वच्छता, अभ्यास, नंतर स्टेडियमवर नेणं-आणणं, परगावी स्पर्धा असेल तर तिच्यासोबत जाणं- सगळं मीच बघते. यजमानांचं कपड्याचं दुकान आहे. चोवीस तास बिझी म्हणायला हरकत नाही. वासंतीकडे मीच लक्ष देते. आता हा बघा- ' बाई समेवर यायच्या त्या लेकीच्या नव्या छायाचित्राकडेच... नव्या कौतुकशिखरापाशी!

आल्बम मिटून झाला.

आणि नवाच आल्बम उघडला.

छायाचित्रांचा नाही, समर्पणाच्या अतर्क्य भावविश्वाचा! मनातल्या मनात पुन्हा एकदा अंदाज घेत बाई म्हणाल्या, 'सर, हिच्याकडे पूर्ण लक्ष द्यायला मिळावं म्हणून मी मला मूल होऊ दिलं नाही.'

'अं?'

'ही प्रत्यक्ष मला झालेली नाहीच. यांच्या पहिल्या बायकोची...'

'सांगता काय?'

'सर, बालपणापासून एकच ध्येय मनाशी बाळगलं होतं- आयुष्य कुणासाठी तरी उपयोगी पडावं. पंधरा-सोळा वर्षांपूर्वी... दिसायलाही मी वाईट नव्हते. वय मात्र थोडं प्रौढ झालं होतं. धाकट्या भावंडांना उभं करताना मी वाकत गेले. पण बहीण-भावांना स्वतःच्या पायावर उभं केलं. नोकरी करून त्यांना शिकवलं. वडिलांच्या निधनानंतर आईचा संसार मीच पूर्ण केला. नातेवाईकांचं परकेपण अनुभवलं. कोण आपलं, कोण परकं, हे कळायचं असेल नं सर, तर आयुष्यात थोडी गरिबी यावी हो! आम्ही तिघी बहिणी तरुण. भाऊ लहान. वडील नव्हते. किती तऱ्हेचे पुरुष असतात, त्याच्या छटा सुरक्षित बायकांना नाही कळणार. आम्ही त्या अनुभवल्या. आता गंमत वाटते सगळ्याची. योग्य स्थळं शोधून बहिणींची लग्नं लावून दिली. तोवर मी झाले तिशीच्या पुढची. म्हटलं- आता लग्नच करायचं नाही. पण माझी आई हट्टच धरून बसली. 'तूही लग्न कर. त्याशिवाय माझ्या आत्म्याला मुक्ती नाही.' सर, इतर भावंडांचे सुखी संसार पाहताना खरं तर मी मजेत होते. इतरांसाठी राबण्यात केवढी धन्यता असते, ते अनुभवत होते मी. म्हटलं, लग्न केलं तरी अशाच व्यक्तीशी करावं, की त्याच्या आयुष्यात उपयोगी पडता यावं. मीच ज्ञातीत नाव नोंदवलं आणि अट घातली- एखादा अपंग, घटस्फोटित वा बिजवर मुलगा असेल तरच माझं नाव सुचवा. सर्वांनी वेड्यात काढलं. काहींना वाटलं, माझ्यातच काहीतरी उणीव असेल, म्हणून ही अट. पण माझा निर्धारच होता- अशापैकी कुणी मुलगा आला तरच लग्न करायचं. शेवटी हे स्थळ आलं. यांची पहिली बायको बाळंतपणात गेलेली... एका मुलीला सोडून. बिचारे स्वतःच करायचे तिचं. मी यांच्याशी लग्न केलं तेव्हा ही वर्षाची होती. पाळणाघरात ठेवायचे. मी तिची यशोदा झाले. योग्य वेळी मी यांना सुचवलं- मी मला मूल होऊ देणार नाही. हे चपापले. 'का?' म्हणून विचारलं. मी आई झालेय की, तुमच्याच मुलीची! पुन्हा नव्यानं आई झाले तर हिच्याकडे दुर्लक्ष होईल. सर, अजूनही यांचा चेहरा आठवतोय. गोरामोरा झालेला. वाटलं- आता रडतीलच. म्हणाले, 'स्वतःवर तू अन्याय करतेयस्.' म्हटलं, 'तो व्हायला नकोय, म्हणूनच हा निर्णय घेतलाय. आता आयुष्य वासंतीसाठी'. सावत्र म्हणजे छळवादी- असंच का हो सगळीकडे रंगवतात? माझ्यासारख्या अनेकजणी असतील. कदाचित अगदी असंच घडत नसेल, पण स्वतःच्या मुलाइतकंच आधीच्या मुलावर माया करणाऱ्या कितीतरी

आया असतील. पण सर, मला कणभर कधी दुःख होत नाही, मूल न होऊ दिल्याचं. देवकीचाही एक आनंद असेल. पण यशोदेचाही एक आनंद असू शकेल, हे कुणी जाणतच नाही. निघू? खूप वेळ घेतला तुमचा!'

मनातल्या मनात अनेक साष्टांग नमस्कार घातले त्या माऊलीला! त्यागाचा, समर्पणाचा किंचितही अहंकार त्या नितळ, पारदर्शी मनाला शिवला नव्हता. खरंच शिक्षण- शिक्षण ते कुठलं? पदवीच्या कागदी पाऊलवाटेनं येणारं? की जगण्याचे कढ सोसत मायेच्या सायीत रूपांतरित होणारं? आयुष्य कुणासाठी तरी उपयोगी पडावं, या ध्यासाचं बीज ज्या क्षणी मनात पडतं, तेव्हा चिंतांचे कुटुंबगुंते थिटे वाटतात. उंबरठ्यापलीकडचं विशाल घर निमंत्रण देऊ लागतं.

सावत्रपणाच्या अनेक छळकथा ऐकल्या होत्या. पण म्हणायला सावत्र असणारी नाती काही वेळा केवढी जिवलग होतात, याचा प्रत्यय असाही येत गेला.

सावत्र आईच्या छळाचेही आभार मानणारा माझा बालपणीचा रहाटळ नावाचा बालमित्र नुकताच भेटला. त्याला घडणारा वनवास मी पाहिला होता. त्या शाळकरी वयातही मला वाटायचं- बिचाऱ्या विकासनं असा कोणता गुन्हा केलाय? त्याची दुसरी आई त्याला डब्यात आंबलेली भाजी का देते? तीन जिने चढून दोन हातात दोन पाण्याच्या बादल्या- असं सर्व पाणी भरून का घेते? दुसऱ्या आईची मुलं विटीदांडू खेळत असत, त्यावेळी विकास मात्र तांदूळ निवडत बसे. पण विकासनं कधी दुसऱ्या आईबद्दल तक्रार केली नाही.

आयुष्यही थांबतं थोडंच? गाळ मागे टाकून जीवन धावत राहतं. परवा फलटणच्या कार्यक्रमाला विकास भेटला. तोच जवळ आला. 'मी रहाटळ... विकास.'

मी सर्रकन ३० वर्षं माघारी गेलो- तेच हसू, वयाची न खटकणारी प्रौढता, केसाला फुगा पाडून भांग पाडण्याची तीच स्टाईल.

'वेळ आहे का? चहा घेऊ या.'

संयोजकांना हुलकावणी देऊन मी ७०-७१ साल जगलो. वाटलं- फक्त गप्पा व्हाव्यात. फक्त गप्पा.

'केवढं सोसलंस रे! किती छळलं तुला तुझ्या दुसऱ्या आईनं. पण जिद्दीनं शिकलास. आज पाटबंधारे खात्यात सर्वोच्च अधिकारी झालास. ग्रेट! यू आर रिअली ग्रेट!'

'ग्रेट कसलं? अरे, त्या आईचीच ही कृपा. माझी जन्मदात्री तर मला पाचव्या वर्षी सोडून गेली देवाघरी! हिनं माझ्याकडून कष्ट करून घेतले; पण दोन वेळा जेवायला तर दिलं ना? वडिलांचं तिच्यापुढे काही चालत नव्हतं. कुठं हाकलूनही देऊ शकली असती ती! तिनं दिलेल्या कष्टांमुळेच मी अभ्यासात अधिक जिद्दी झालो. आठवतं? नेहमी पहिल्या पाचात असायचो. इतर भावंडं गाढ झोपलेली असायची. मी पहाटे उठून, रात्री जागून फक्त अभ्यास करायचो. वाईट वाटतं. खूप लाडामुळे माझी सावत्र भावंडं मॅट्रिकसुद्धा झाली नाही. व्यसनी निघाली. आई-बाबांना त्रास देऊ लागली. आई-बाबा दोघंही आज माझ्या घरी असतात. आता निवळलेय ती. केव्हातरी रडते. म्हणते, 'बाळा, मी कसं वागवलं, न् तू मला देव मानतोयस! देव तुला कधी काही कमी पडू देणार नाही.' अरे, सूडानं का कधी कुणी घडतं? नशिबाच्या भोगाचं भांडवलं करून आलेलं नवं सुख माणसं अनुभवतच नाहीत. आता सोन्याचे दिवस आलेत. बायकोही प्रेमळ आहे माझी! सासू-सासऱ्यांना पाया पडल्याशिवाय जेवत नाही. तुझं कसं चाललंय्?'

कथेतच शोभावीत अशी कित्येक गुणी माणसं आपल्यात असतात. आज ठळक रंगवली जातात ती दुष्ट, कुटिल माणसं! पण तेवढीच माणसं नाहीएत जगात! जग खूप चांगल्या माणसांचंही आहे! तशा वेगळ्या आईचं, आणि अशा गुणी मुलाचंही! तशीही एक यशोदा आणि असाही श्रावण बाळ!

# २५.        सावलीची चव

कारगिल युद्धात अजोड कामगिरी केलेला एक लष्करी अधिकारी माझ्यापुढे खाली मान घालून उभा होता. इतक्या उंच्यापुऱ्या, शूर सैनिकाची- ज्याच्या शौर्याचा गौरव झाला होता अशा वीर जवानाची मान माझ्यासमोर खाली जावी, असा कुठलाच पराक्रम मी केलेला नव्हता. त्यांची मान खाली गेली होती त्यांच्या मुलाच्या बेछूट वागण्यामुळे. या मुलाच्या वर्गाचा मी 'पालक शिक्षक' होतो. काळ्या यादीत चिरंजीवांचे नाव घोषित झाल्यामुळे त्याच्या वडिलांना बोलवावे लागले होते. तो उडाणटप्पू दिवटाही माझ्यासमोर होता. ज्यांना उठून मी 'सॅल्यूट' करावा, अशा व्यक्तीला मला धारेवर धरावं लागत होतं. या मुलाच्या पराक्रमांची यादी मोठी होती. सीमेवरच्या कर्तव्यामुळे घराकडे सहा-सहा महिने फिरकता न येणारी नोकरी. वडील बर्फाळ वाऱ्या-वादळात गनिमाला 'टिपून' काढतायत आणि वडिलांच्या अपार कष्टांची, अभिमानास्पद कामगिरीची मुलाला मात्र दखलही नाही. वडिलांच्या अगतिकतेची जराशीही लाज मुलाच्या चेहऱ्यावर नव्हती. त्याला माहिती होतं- पंधरा दिवसांनी वडील निघून जाणार, पुन्हा रान मोकळं! सतरा-अठरा वर्षांची ताडमाड झालेली ही बेदरकार मुलं आईला आवरणं कठीण; बापानं पदोपदी नजर ठेवणं अशक्य!

असाच एक अनामिक फोन येतो. मनानं चिंध्या झालेले पालक. 'आम्ही कुठं कमी पडलो कुणास ठाऊक! मुलीला काही कमी केलं नाही. सगळे लाड केले. कपडालत्ता, खाणं-पिणं, फॅशन्स... सगळं हवं ते करू दिलं. आणि मुलीची एके दिवशी तार येते- 'मी लग्न केलंय' म्हणून. सांगा- आम्ही कुठं कमी पडलो? सगळं घर महिनाभर जसं सुतकात आहे. पत्नीला अन्नपाणी जात नाहीए. सलाईन लावलंय. ज्या आईशिवाय ती एक क्षणही राहू शकत नव्हती, त्या आईचं या धक्क्यानं काय झालं असेल, हेही तिला बघावंसं वाटत नाही? आम्हीही तरुण होतो, आम्हालाही भावना होत्या. पण घरात मायेची छाया देणाऱ्यांची आम्हाला कदर होती. दर गुरुवारी उपास करणारी, प्रत्येक संकष्टी चतुर्थीला सिद्धिविनायकाचं दर्शन रांगेत उभं राहून घेणारी माझी मुलगी एवढी बनेल निघेल असं वाटलं नव्हतं. सांगा- आम्ही कुठं कमी पडलो?'

अशा प्रश्नांची पुस्तकी उत्तरं नसतात. जगणंही छापील नसतं. प्रत्येकाचे प्रश्न वेगळे, उत्तरं वेगळी! काही प्रश्न उत्तरंच नसलेले... पोरके!

मुंबईच्या उच्चभ्रू वस्तीतल्या आलिशान कॉलेजमध्ये कार्यक्रम. पाऊणएक तास आधीच पोहोचल्याने कोपऱ्यावरच थांबलेलो. जवळच खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर, हॉटेल्समध्ये उसळलेली तरुणांची श्रीमंत गर्दी! बहुतेकांकडे मोबाईल फोन. एका ग्रुपमध्ये दोघांकडे तरी कानाला वॉकमन लावून च्युईंगम चघळणे सुरू... आणि दोन्ही हातांनी टाळ्यांचा खेळ!

कार्यक्रम सुरू झाल्यावर एक टारगट ग्रुप कोपऱ्यात बसून माझी रेवडी उडवायला टपलेला. प्रास्ताविक करणाऱ्या त्यांच्या प्राध्यापकांचंही ती मुलं ऐकून घेत नव्हती. शेजारीच बसलेल्या प्राचार्यांना म्हटलं, 'तो पंधरा-वीसजणांचा ग्रुप...'

'राजकीय पक्षांच्या बड्या मंडळींची ही पोरं आहेत. त्यांना कोण बोलणार? नावं काढून टाकली, तरी वरून दबाव येतो. '

त्या विशिष्ट ग्रुपचा गोंधळ सुरूच होता. बोलण्याचा सूर लागणं अशा वातावरणात अशक्यच. मी त्या मुलांना शांत राहण्याचं आवाहन केलं. शांती म्हणजे दुर्बलता- असा एरव्हीही समज आहेच. मुलांना वाटलं- आलेल्या पाहुण्याला उधळून लावणं सोप्पं आहे. पण मीही काही कच्च्या गुरूचा चेला नव्हतो. मैदान सोडून पळणं माझ्या स्वभावात नाही. वातावरणाची गरज म्हणून माझा भीमदेवी स्वर काढला, आणि म्हटलं, 'दोन मिनिटं फक्त तुमच्याशी बोलतोय. ऐका. ही एवढी सगळी मुलं शांत बसलेली असताना तुम्ही असे अस्वस्थ का? एखादा कार्यक्रम पाडण्यात पुरुषार्थ आहे का? हा उन्मत्तपणा कुठल्या जिवावर तुम्ही करता आहात? या क्षणी तुम्ही परिश्रमानं मिळवलेली कुठली गोष्ट तुमच्याकडे आहे? हे फॅशनेबल कपडे? सेल्युलर फोन? गाडी? शोफर? लाखो रुपयांच्या देणग्या भरून तुम्ही ॲडमिशन घेता, आणि एका नामवंत महाविद्यालयाचं रूपांतर एका पबमध्ये करता? तुम्हाला माहितेय- नाही शिकलं

तरी बिघडणार नाही. तीर्थरूपांची बेकायदा अमाप संपत्ती आहे. पण लक्षात ठेवा- पूर्वजांनी जमवलेली ही संपत्ती घट्ट धरून ठेवणारं मनगट तुमच्याकडे नसेल ना, तर हा पैसाच मानगुटीवर बसून रेसच्या घोड्याच्या मागच्या पायांना बांधलेल्या इसमासारखी तुमची फरफट करील.' वातावरण चांगलंच तापून स्तब्ध झालं होतं. तो ग्रुप चिडीचूप झाला होता. कॉलेज सुरू झाल्यापास्नं त्या प्रत्येकाचं चरित्र असं कुणी वेशीवर टांगलं नव्हतं. हा कुणी लेखक- कवी नसून, बहुधा अंदमानातील जेलरचा वंशज आलाय की काय? केवढा आवाज!

स्वराची पट्टी खाली आणून म्हटलं, 'मित्रांनो, मुळात तुम्ही गुणी आहात. पण पौरुषाची, पराक्रमाची तुमची कल्पना चुकीची आहे. केवळ बुद्धीची देणगी पुरत नाही आयुष्यात. योग्य दिशा देणारी एक आंतरिक इच्छाशक्तीही हवी असते. आज सोळा-सतरा वर्षांचे आहात. बघता बघता चाळिशीचे व्हाल. स्वतःच्या कर्तृत्वाचं आकाश उभारा. वडिलांच्या संपत्तीची अनुकूलता, ते बिझी असण्यानं तुमच्याकडे होणारं दुर्लक्ष, अतिलाडामुळे आणि गरजेहून वारेमाप मिळणाऱ्या पॉकेटमनीमुळे तुम्हाला एक आंतरिक रिकामटेकडेपणा आलाय. ही निराशा घालवा. आपण एकटेच आहोत, आणि संपूर्ण आयुष्याची उभारणी एकट्यालाच करायचीय, हा ध्यास घ्या. तुम्हीच तुमच्यातला कोलंबस जागा करा. किनारा स्वतः धुंडाळा.'

हे वय असं असतं- करुणेनं व्यक्त केलेल्या रागाचाही योग्य तो परिणाम होतो. त्या ग्रुपमधील तीन-चारजणांचे तरी नंतर फोन आले, 'सर, जन्मात कुणी असे कान उपटले नव्हते. बघा- बदल दिसेल आमच्यात.'

मी सामान्य माणूस. थोरांच्या वाणीचं सामर्थ्य माझ्यात नसेल, पण त्या तळमळीशी नातं असेल, तर किमान एक तरी दिवा अंकुरेलच!

रेल्वेच्या डब्यात बूटपॉलिश करणारा राजू गायकवाड आठवतो. तीन रुपयांच्या पॉलिशचे पाच रुपये दिल्यावर, 'दोन रुपये ठेवून घे तुलाच' असं मी म्हटल्यावर तो ठिणगीबाज डोळ्यांचा कुर्रेबाज पोरगा कडकडला, 'नका भलती सवय लावू. जितके श्रम, तेवढेच मिळू द्या. उरलेले दोन रुपये मला खड्ड्यात नेतील. कारण ते माझे नाहीत.' हा मुलगा सकाळी बूटपॉलिश, रात्री 'नाईट स्कूल'ला शिकतोय.

परवा योगायोगानं गुरू पार्वतीकुमार यांच्या सहवासात राहायला मिळालं. गुरू-शिष्य नात्याबद्दल बोलताना ते श्रेष्ठ नृत्यगुरू बोलून गेले, 'खऱ्या शिष्याला शिकवावंच लागत नाही. तो तर स्वतःहूनच शिकतो.'

खरंच घडायची, उड्डाण घ्यायची ज्याला आच- तोच शिष्य! वातानुकूलित सुखात पहुडलेल्यांना सावलीची चव काय कळणार? सावलीची चव कळण्यासाठी आधी अंगावर घ्यावी लागते उन्हाची प्रखर धग! आज तीच अनेकांच्या बाबत हरवलेय. क्षणोक्षणी अनुकूलतेची छत्री घेऊन उभ्या असणाऱ्या पालकांनी केव्हातरी ती छत्री जरा तिरकीही करावी- आणि जगणं असंही असतं, हेही त्यांना कळू द्यावं. नाही तर स्वतःच्याच डोळ्यांदेखत दोघांचीही छत्री उडताना दिसेल; जी पकडता येणं अवघड जाईल. उन्हाच्या धगीनंतरच कळते- सावलीची चव!

# २६.        व्वा !!

'भगवद्गीता आयतीच समजून घ्यायची असेल तर आमच्या घरातली 'सून' व्हावं,' चापेकरवैनी परिसराचा वेध घेऊन सांगत होत्या.

क्षण- दोन क्षण काही कळलं नाही. मला न कळलेलं त्यांना कळलं. 'अहो, फळाची अपेक्षा न धरता कर्म- फक्त कर्म करीत राहा, हा उपदेश आमच्या घरात तंतोतंत अनुभवतेय मी. कसलं म्हणून मेलं 'ॲप्रिसिएशन'च नाही. मरमर मरून एखादा नवा पदार्थ करा, सगळ्यांचे डबे करून, सासूबाईंचं वेगळं पथ्याचं जेवण करून आठला निघते मी कामावर जायला; पण चौदा वर्षांत एकदाही कौतुक नाही. त्यांचे चिरंजीव- तुमचे मित्र- तेही तसलेच.'

'का ? मी काय केलं ? वेळोवेळी तुझं कौतुक केलंय मी. आईचं आता दे गं सोडून.'

'हं, तुमचंही सोडून दिलंय.'

'गेल्या वेळी तू रव्याच्या का खोबऱ्याच्या वड्या केल्या होत्यास- केलं की नाही कौतुक मी ?' मित्रवर्य अपराधी चेहऱ्यानं म्हणाले.

'केलंत कौतुक! पण सहा वेळा पुनः पुन्हा 'कशा वाटल्या, कशा वाटल्या, विचारल्यावर! ट्रंकेत कपडे कोंबावेत तसे पदार्थ घशात कोंबता तुम्ही. एक पदार्थ करण्यासाठी घरातली बाई किती राबते तुम्हाला कधी कळतं ? चार पाहुणे आले तर जाणारा पाहुणा पोट भरून तृप्त होऊन जावा, म्हणून आधी किती टेन्शन असतं. वाढताना प्रत्येक गृहिणी पाहुण्याचा अंदाज घेते- आवडतंय ना आपण केलेलं ? एखादाच सांगतो, बाकीचे तुमच्याचसारखे. ॲप्रिसिएशन म्हणून नाही.'

गप्पांच्या ओघात चापेकरवैनी बोलत होत्या. बोलण्यात तक्रारीचा रंग असेल, पण कटुता नव्हती. स्वाभाविक अपेक्षा होती. कुठलं तरी प्रासंगिक कारण घडलं असेल, थोडी चीडचीड झाली असेल. कौटुंबिक मैत्रीपोटी सांगत होत्या, झालं!

योग्य वेळी मिळणाऱ्या योग्य त्या प्रतिसादाची फुलण्याच्या प्रवासात प्राणवायूइतकीच गरज असते. अवास्तव, खोटी दाद जशी विकासाच्या पाऊलवाटा अडवते, त्याचप्रमाणे मख्ख रसिकांमुळे समोरचा तरल अंकुर गाभ्यातच कोमेजला जाण्याची भीती असते. आपण दाद देत नाही, याचाच काहींना एक उग्र अहं असतो. सगळे 'व्वा' करतायत्, पण आपण चेहऱ्यावरचं मेणकापड काही सोडायला तयार नाही, याच मिजाशीत स्वतःचा मेंदू कुरवाळणारे आंतरिक बहराला मात्र वंचित होतात. दाद दिल्यानं समोरच्या कलावंताला आनंद होतोच, पण दुसऱ्याला योग्य सृजनक्षणी 'व्वा' म्हटल्यानं रसिकही आतून प्रकाशमान होतो. ही अनुभूती ज्याची-त्याचीच. प्रत्येक वेळी दाद उघड अशी नसते. उत्कटतेच्या खोल डोहात विलक्षण स्तब्ध, मूक करणारीही कलाकृती असते. पंडिता प्रभाताई अत्रे यांचा एखादा हुरहुरता 'मारवा' असा घायाळ करील, की फक्त अश्रू टपटपू लागतील. हीसुद्धा दाद असते. टोकाच्या संवेदनक्षम कलावंताला ती जाणवते. कुणीतरी फुकट पास दिलाय म्हणून आलेला हृदयशून्य श्रोता हे कलावंताचं दुर्दैव असतं.

अंतर्यामीतून डवरून येऊन कधी लकाकत्या डोळ्यांनी, कधी उबदार हस्तांदोलनानं, कधी भरभरून पत्रानं दाद देण्यानंच रसिकाचा 'रसिकराज' होतो. पुलंनी रामूभय्या दाते यांचा 'रसिकराज रामूभय्या' हा गौरव सहजपणे केल्याचं आठवतं. भावगीतगायक अरुण दाते नेहमी सांगतात- 'ताजमहालसुद्धा 'बराय' म्हणणाऱ्या व्यक्तींना वाटत असावं- 'ताज'ला उत्तम म्हटलं तर लगेच प्रवेश फी वाढवतील की काय!'

द्वेष नसलेली सहृदय टीका हीसुद्धा दादच. मात्र, लेखणीच्या एका फटकाऱ्यात समोरच्याच्या झालेल्या चिंध्या 'एन्जॉय' करणं- ही विकृतीच. योगायोगानं आलेली खुर्चीची सत्ता जवळ असताना कळत नाही, पण हे सारं काळाच्या ओघात वाहून जातं. मग अनेकांना दुखावलेल्या या मनांना एकाकीच राहावं लागतं. जमलेली वा फसलेली कलाकृती निर्माण करताना त्या-त्या कलावंतानं स्वतःच्या कुवतीनुसार जिवाचा आटापिटा केलेला असतो. फूल- मग ते साधं रानफूल असो, की घमघमणारा मोगरा- रोपानं आतून मेहनत घेतलेलीच असते; ती आपण एका

फटकाऱ्यात आडवी-तिडवी करण्यात कसली फुशारकी आहे? प्रतिकूल मतही संयमानं, सहृदयतेनं व्यक्त करण्यातच रसिकाच्या माणूसपणाचे संस्कार कळतात. परखड सत्य पचवण्याचंही एक मानसिक वय यावं लागतं. त्याआधीच कुणी तलवार चालवेल, तर आपण भविष्यातल्या अनेक शक्यताच नाहीशा करण्याची भीती आहे. विच्छेदन करून एखाद्याला भुईसपाट करण्यात कर्तृत्व वाटणं, हे न्यूनगंडाचंच लक्षण आहे. म्हणूनच अशा मनांकडून 'नवनिर्मिती' होणं अवघड असतं.

विद्यार्थी-शिक्षक, पाल्य-पालक नात्यात तर या प्रतिसाद संवादाला अमोल मोल आहे. पुष्कळदा सुमार निबंध, सपक कविता घेऊन नवे विद्यार्थी येतात. आघात करून त्यांना दूर सारण्यात कुठलं 'गुरूपण' आहे? लेखनातल्या पहिल्या वाटा अडखळत्याच असतात. पाऊल चुकलंय सांगायचं, पण त्याच वेळी वाटा कशा धुंडाळायच्या, हाही भाव हवाच!

पियानोवर लयदार धून वाजवणारा आपला कोवळा मुलगा, रेषांतून निराळा आशय मांडू इच्छिणारी मुलगी, भातुकलीचा संसार दाखवणारी धिटुकली खारकुंडी असणारी नात, तबल्याचा पहिलाच 'ताल' आपण कंटाळलेले असताना आग्रहानं दाखवणारा पुतण्या, नवीन कविता मामाला दाखवणारी भाची प्रत्येकालाच असते. अंकुरलेल्या रोपाच्या मुळात सबलता येतानाच वादळं उपयोगी नाहीत. तण उपटताना रोपावर दणकट पाय पडणार नाही, याची काळजी घ्यायलाच हवी.

समाजात तर मन:पूर्वक दाद द्यावी अशा जागा ठायी ठायी असतात. दाद थेट गळ्यापर्यंत येते, पण 'व्वा!' म्हणण्याचं औदार्य असलं की आपला आनंद अधिक वाढतो. कुणी अंगणात घातलेली रेखीव रांगोळी असते, तर कुणाच्या अंगणात हौशीनं फुलवलेली बाग असते. तो हरित कोपरा मन वेधून घेतो. घरमालकाच्या त्या हौशीला दाद देऊन बघाच, त्याच्या श्रमाला फुलं येतील. एखाद्या शाळेत गेलात, तर तिथं विलक्षण मोहोरदार अक्षरात मजकूर लिहिलेला असतो. हा मजकूर कुणी लिहिलाय, हे विचारून त्या शिक्षकाला गाठून तुमचा आनंद करा पाहू व्यक्त! दुसऱ्या दिवशीचा मजकूर लिहिताना आदल्या दिवशीची तुमची दाद खडूत एकवटून येईल. ओठाशी आलेला 'व्वा' रोखून पुन्हा गिळून टाकणं, हा आंतरिक अपराध आहे. हे सत्य जेव्हा अनेकांना कळेल, तेव्हा समाज अधिक खेळकर होईल, निरोगी होईल.

नात्यात ओलावा भरतो तो एकमेकांतील प्रतिसादामुळेच! आवडलेल्या गोष्टीला 'व्वा!' म्हणण्यानंच मग उणिवा सांगण्याचा व ऐकण्याचा प्रांजळपणा निर्माण होतो. कुठल्याही नात्यात एकतर्फी प्रेम नंतर लोप पावू लागतं. नाती गुंफून राहण्यासाठी प्रामाणिक 'व्वा!'ची गरज असतेच. परवा वडाळ्याच्या ज्ञानेश्वर विद्यालयात गेलो होतो. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या हसतमुख प्राचार्या सुकन्याताई आपटे प्रत्येक शिक्षक- शिक्षिकेचं माझ्याजवळ भरभरून कौतुक करत होत्या. शेवटी ऑफिसमध्ये आम्ही दोघंच उरलो. मी म्हटलं, 'सुकन्याताई, आपल्या शिक्षिकांचं एवढं कौतुक करणारे प्राचार्य क्वचित दिसतात.' त्या म्हणाल्या, 'शेवटी शिक्षणसंस्था चालवतं कोण? हे माझे शिक्षकच! त्यांनी जे उत्तम केलंय त्याला दाद दिली तर ते प्रोत्साहित होतील, त्याचा लाभ माझ्या मुलांनाच मिळेल ना?' आदरमिश्रित पाणी डोळ्यांत भरून आलं.

लेख पूर्ण होता होता भल्या पहाटे समेवर आल्यासारखा गरम चहा आलाय. चहाचा एक घोट घेऊन मी तिला नकळत म्हटलं- 'व्वा!'

ती म्हणाली, 'बहुधा लेख जमलेला दिसतोय!'

## २७. बंदुकीवरचं फुलपाखरू

'काय सांगणार साहेब, आमचं दु:ख तुम्हाला? आम्ही असतो मायेचे भुकेले. लहान मुलं आम्हाला बघून पळतात. आई त्यांना लहानपणापासून सांगते- मस्ती केलीस तर पोलिसाकडे देईन. इकडं घरी वेळ देता येत नाही, म्हणून बायको कातावते. तिकडे आमचे साहेब त्यांच्या साहेबांचा राग आमच्यावरच काढणार. समाज अनादरानं बघणार. अहो, टेन्शन तरी किती! दोन-दोन दिवस, कधी आठ-आठ दिवस घराचं तोंड नाही बघता येत. टेन्शन... टेन्शन! मेंदू फुटून जातो साहेब. घ्या, चहा घ्या.'

चक्क पोलीस स्टेशनात मला 'च्या-पाणी' होत होतं. बोलणारा पोलीस अधिकारी युक्तीनं मला बसवून ठेवत होता. 'थांबा हो, तुमच्यासारखी माणसं येतात कशाला इथं? आम्हालाही वाटतं- चांगलं ऐकावं, वाचावं. पण छे! खोटं वाटेल, मी चांगलं गायचो. पण वडील हवालदार. त्यांनी टाकलं याच लायनीत. अहो, बघा- गळ्याचा पार खराटा झालाय.' मला हसू आवरेना. गळ्याचा खराटा! व्वा! 'तुम्ही हसा हो साहेब, पण खरं आहे, सायेब. पहिली एक शिवी देता येत नव्हती. आता अख्खी डिक्शनरी लिहून दाखवेन शिव्यांची. साहेब, केव्हा केव्हा वाटतं- तुरुंगात कोण आहे? कैदी की पोलीस? वाटतं- आम्हीच आहोत तुरुंगात. बाहेर नाही पडता येत या चक्रातून.'

'ते खरं. पण तुमच्याबद्दल ऐकलं जातं, ते सगळंच थोडं खोटं असतं?'

'साहेब, जमिनी विकून माणसं इथं भरती होतात. पार वरून कीड आहे हो. वसुली करणार कुठनं? उद्या एखाद्या डॉक्टरला मेडिकलला ॲडमिशनसाठी पंचवीस लाख दाबावे लागले, तर तो ते पैसे काढणार कुठनं? तुमच्याचकडनं ना? सगळाच दोष आमचा नाही साहेब. अजून च्या मागवू का साहेब?'

अजून थोडं थांबलो असतो तर तिथंच मला भरती व्हावं लागलं असतं. म्हणून पटकन् उठलो. 'येत जा अधनंमधनं. टाळू नका. आम्हीही माणसंच आहोत!'

पोलीस खात्याचे अनेक चेहरे पाहिले होते, पण खाकी वर्दीतही हिरवंकंच मनही असतं, हे फार क्वचित कुणी सांगितलंय. नोकरीच्या अगतिकतेनं एकदा का इथं तुम्ही लागतात, की बघता बघता भोवतीचं जग बदलून जातं- हे मी माझ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पाहिलं होतं. 'एक खडक वाटेकडे डोळे लावून पाहायचा, तुझ्यासाठी मोगऱ्याच्या चार कळ्या आणायचा...' अशा तरल ओळी लिहिणारा माझा आवडता विद्यार्थी या खात्यात शिरला आणि 'एन्काऊन्टर'ची भाषा करायला लागला, तेव्हा पहिली गोळी फुटली ती माझ्या मेंदूत. मोगऱ्याच्या ओंजळीत टपकणारं रक्त दिसायला लागलं. तरल काव्याची जागा बेदरकार मग्रुरीनं घेतली. ज्याच्याकडून कुसुमाग्रजांची 'कणा' कविता वारंवार ऐकायला मला आवडायचं, तो वेश्यावस्तीत आता रात्रीची गस्त घालतोय. तिथंही त्याच्यातला कवी फुलला असता तर वेदनेची भेदक खोली त्याच्या शब्दांना आली असती. पण वातावरणातलं मानवी क्रौर्य कोवळे अंकुर खुडून टाकतं. मी वाट पाहतोय- केव्हातरी या सुकलेल्या खांबांतून पालवी येईल.

पोटासाठी नोकरी करावी लागते. काही नोकऱ्यांतून सेवाही घडते. पण काही नोकऱ्या अशा असतात, की त्या थेट मनाच्या मुळापर्यंत शिरतात. अंतर्बाह्य बदलून टाकतात. सतत जर गुंड, खुनी, गुन्हेगार यांच्याच भोवती वावर असेल तर असा पोलीस घरी गेल्यावर रविशंकरजींची सतार ऐकायला बसेल- हे दृश्य डोळ्यांपुढे येऊच शकत नाही. पण मी हेही अनुभवलंय, की अशा काजळीत आतला दिवा उजळलेला ठेवणारेही अनेक पोलीस असतात. डोंबिवलीला आमच्या काव्यरसिक मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात एक पोलीस न चुकता कविता वाचण्यासाठी संधी मागायचा. कविता कशीही असेल, पण त्याला शब्दांतून भावना मांडावीशी वाटायची. संयोजक नियम बाजूला ठेवून त्या पोलीस कवीमित्राला कवितेची संधी द्यायचे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांशी झालेल्या एका भेटीतलं त्यांचं वाक्य आठवलं- 'सकाळी नांगर धरणारा शेतकरी संध्याकाळी जर कविता करीत असेल तर तो चांगला कवी नसेल कदाचित, पण बरा माणूस तर निश्चितच असेल!'

मी नांगराच्या जागी 'बंदूक' शब्द ठेवून हे वाक्य म्हणून पाहिलं. असेही अनेक कलावंत पोलीस आहेत. पण त्यांच्या व्यवसायाचं स्वरूपच असं, की कलेतील तरलता जपायला अवधीच कुठे आहे? असे हजारो दबलेले हुंदके,

मनातले अंगार इथं असतील, की ज्यांना कधी व्यक्तच होता येत नसेल. मनात एखादी प्रेमकविता उमलत असताना दंगलीची बातमी येऊन थडकली की प्रेम आणि कविता कोषातच गुदमरणार. असेही काही कोंडमारे असतील याचा आम्ही कधी विचारच नाही करत.

एकीकडे पोलीस आणि तोच दुसरीकडे कवी- असं वास्तव समाज सहसा स्वीकारत नाही. 'बघा, पोलीस असूनही कवी आहे,' असं कौतुक होतं. बिचारा मनात म्हणत असतो- 'वर्दी खाकी आहे, पण मन कोवळं आहे ना!'

आठवतं- मध्यरात्री दोन वाजता कार्यक्रमाहून परतत असताना आमची गाडी 'राऊंड'च्या एका पोलिसानं अडवली. 'शुक्रतारा' कार्यक्रमाहून आम्ही परतत होतो. गाडीत गायक अरुण दाते होते. दातेसाहेबांनी लगेच लायसन वगैरे दाखवण्याची तयारी केली. ड्युटीवरच्या त्या पोलिसानंही डायरी काढली होती. माझीही झोप उडाली. प्रकार काय आहे? समोरचा पोलीस मित्र म्हणाला, 'साहेब, तुमची गाडी थांबवली ती लायसन बघायला नाही. तुमची सही हवीय, साहेब. उद्या घरी गेल्यावर माझ्या पोराला मी सही दाखवून म्हणेन- 'भातुकलीच्या खेळामधली' गाणारे अरुण दातेसाहेबांना मी पाहिलंय.'

त्या मध्यरात्रीही डोळे पाणावले. पोलिसांच्या विनोदबुद्धीचाही अनेकदा प्रत्यय घेतला. एकदा मित्राबरोबर स्कूटरवर निघालो होतो. चुकून 'वन वे'मध्ये स्कूटर शिरली. झालं! 'फुर्रर्र' शिट्टी वाजली. गाडी बाजूला घेतली. मनात म्हटलं, 'हो गया ना कबाडा!' मित्रही गांगरला. पण पटकन् म्हणाला- 'अहो, हे मागे बसलेले आहेत ना- ते सिनेमात गाणी लिहितात. त्यांनी तुमच्यावरसुद्धा गाणं लिहिलंय. 'दे दणादण'मध्ये 'पुलिसवाल्या- सायकलवाल्या.' तो हवालदार हसला. म्हणाला, 'तुम्ही वो ते? अरे, पळा मग- जा- अजून गाणी लिवा आमच्यावर.'

साहित्य संमेलनातल्या नेहमीप्रमाणे रटाळ चाललेल्या कवी-संमेलनाच्या बंदोबस्ताला दोन पोलीस पेंगताना मी पाहिले. एकाचे डोळे जरा उघडलेले पाहून मी विचारले, 'तुम्हाला अशा ठिकाणी बंदोबस्ताला काय वाटतं?'

तो पोलीस मोठा वस्ताद! म्हणाला, 'त्याचं काय आहे भाऊ, छोटी-मोठी चूक जर आमच्या हातनं झाली ना, तर शिक्षा म्हणून कवी-संमेलनाला पाठवतात बंदोबस्ताला.'

एकच हशा उसळला!

जरा पोलिसातल्या माणसाशीही जिव्हाळ्याने गप्पा मारा; मग कळेल- तिथंही एक मन आहे. पोलीस स्टेशनहून निघताना पुन्हा त्या पोलीस अधिकाऱ्याचा मोबाईल वाजला.

'नाही गं, सांग सोनूला- पुन्हा फोन करीन मी.' आणि त्यांनी फोन कट् केला. त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावलेल्या वाटल्या.

मी म्हटलं, 'काय हो?'

'हे दुसरं वर्ष- मुलीच्या वाढदिवसाला मी घरी नाही जाऊ शकत. असं आहे बघा साहेब! आम्हालाही मन असतं, घर असतं... माया हवी असते हो आम्हाला. सगळेच सारखे नसतात साहेब...'

# २८.        थेंबातलं आभाळ

आमच्या महाविद्यालयातल्या राष्ट्रीय सेवा योजनेतल्या विद्यार्थ्यांनी दीपोत्सव साजरा केला, तो रानावनात राहणाऱ्या अनिकेत आदिवासी मुलांची तोंडं गोड करून! 'करंजी' हा प्रकार ज्यांना स्वप्नातसुद्धा येणं शक्य नव्हतं, अशा मुलांच्या तोंडात करंजीची मधुर पिठी जाताना त्यांच्या डोळ्यांत उजळलेली दिवाळी बघणं, हाच शहरातल्या मुलांच्या मनावरील महत्त्वाचा संस्कार होता. गोष्ट साधीच, पण अनमोल! दुसऱ्याला आनंदी होताना पाहण्याइतका मोठा आनंद नाही! खूप पोट भरून ताटात अन्न टाकून देणाऱ्याला आपण आणखी कसून वाढतो. पण खरोखर अन्नात भुकेची चव मिसळते, तिथे मात्र आपण आपलं अन्न जाऊ देत नाही. पंचतारांकित हॉटेलात प्रतिष्ठेच्या भंपक कल्पनेपोटी शंभर-दीडशेच्या नोटा 'टिप्' म्हणून बडिशेपेच्या पोटात खुपसणारा 'फाइव्ह फाइव्ह फाइव्ह' धनिक स्वतःच्या घरातला अनवाणी नोकर पाहून मात्र द्रवत नाही. गोष्ट साधीच असते आपल्यासाठी; पण समोरच्या गरजवंत आयुष्याला सकारात्मक कलाटणी देण्याचं अपार सामर्थ्य आपल्या या किंचित् मदतीत असतं. आपलं तर काही जात नाहीच; पण जवळचं एक आयुष्य, एक संसारही सावरला जातो.

वृक्षारोपणाचे सुहास्य छायाचित्र मिरवणारा एखादा वर्तमानपत्री मंत्री आपण पाहतो; पण कणभर प्रसिद्धीची लालसा न धरता दरवर्षी हजारो रोपं रुजवणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्या वाटेनं केव्हातरी जाताना ते कार्यकर्ते झाडाहून अधिक फुलून येतात, आनंदून जातात. काल ही वाट उघडीवाघडी, रुक्ष होती, आज इथं वाटसरू विसावताहेत. क्षणाची प्रसिद्धी क्षणात विरून जाते, निरपेक्ष वृत्तीनं केलेलं काम चिरंतन समाधान देतं.

अशाच मुशाफिरीत पाहिलं- अकोल्याजवळच्या एका छोट्या गावातलं पाळणाघर! गायींचं पाळणाघर! अनाथ गुरावासरांचं प्रेमळ अनाथालय मी अनुभवलं. त्या गोरक्षण शाळेत गेलो तेव्हा थबकलोच. एका जखमी गायीची शुश्रूषा करण्यात एक कार्यकर्ता निमग्न होता. वेदनेने बाहेर आलेले, आर्त झालेले गाईचे डोळे आणि मणक्यावरच्या सोललेल्या कातडीतून भळभळणारं रक्त! अधिक वेळ बघणं अशक्य होतं. अशी अनेक गुरं पाहिली. गोरक्षण शाळेच्या प्रमुखांनी सांगितलं, 'बेकायदेशीरपणे खाटकाकडे नेणारी गुरं आम्ही पकडतो. छोट्या ट्रकमध्ये तीन-तीनशे गुरं निर्घृणपणे कोंबतात. कापायलाच न्यायचीत ना, न्या कशीही. दुष्काळग्रस्त शेतकरी कवडीमोल किमतीत गुरं कसायांना विकतात. काही वेळा तर अगतिकतेनं सोडून देतात. आम्ही सेवाभावी वृत्तीनं त्या गाईंना येथे आणतो. अनेकदा संघर्षालाही तोंड द्यावं लागतं. पण मरणाकडे निघालेली गाय जेव्हा इथे पुन्हा आपल्या पायावर उभी राहते, जवळच्या वासराला चाटू लागते, तेव्हा तिच्या हंबरण्यात जीव वाचल्याचा ओलावा येतो. तेव्हा आमच्या जीवात जीव येतो.' ऐकताना डोळे पाणावत होते.

हे असं कार्य हाती घ्यावंसं वाटणं हेच मानव्य! कुणाच्या तरी जखमेवर फुंकर होतं, तेच माणूसपण! आज फक्त 'मी-माझी बायको- माझं मूल...' बस्स. संपलं जग. हाच कुसंस्कार जगणाऱ्या स्वयंकेंद्रित मनांनी अशा कार्यकर्त्यांचं ऐश्वर्य पाहावं! हे ऐश्वर्य बँकेच्या पासबुकात मावणार नाही. त्यासाठी आभाळाचीच ओंजळ हवी! गोष्ट थेंबाएवढीच, पण आभाळ धारण करणारी!

आपल्या कल्पकतेनं अनेकांची घरं फुलवणारं एक 'मन' नुकतंच पत्रातून परिचित झालं. पुण्याच्या निर्मला लाठी. फक्त कचरा वापरून घरातल्या बाल्कनीत, गच्चीत फुलबाग फुलवता येते, हे त्यांनी सिद्ध केलंय. निर्मलाताईंनी अथक परिश्रमांनी दाखवलंय- जगात कुठलीच गोष्ट 'कचरा' नाही. स्वतःतला निरुत्साह आणि नकारात्मक प्रवृत्तीचा कचरा तेवढा झटकावा; मग चोहीकडे प्रकाशाच्याच पाऊलवाटा आहेत. या छंदाने निर्मलाताई लाठी यांनी अनेकांच्या घरांमध्ये फुलबाग फुलवली. लोकांना हल्ली बागेत जायला सवड नाही. निर्मलाताईंनी बागेलाच लोकांच्या घरात नेलं. कचऱ्याचंही नशीब उमलतं. फक्त स्पर्श निर्मलाताईंचा हवा! त्या सहज लिहून जातात, 'कचऱ्याचंही योग्य व्यवस्थापन झालं तर बागही छान फुलते.' कुठल्याही गोष्टीचं व्यवस्थापन हीच मुळी सृजनशीलता. ते जमलं, की फुलं सज्ज असतात!

असंच एक फुललेलं आयुष्य मी अनुभवलं नागपुरात. डॉ. वर्षा झाडे आणि डॉ. गजानन झाडे हे व्यवसायाच्या सहज वाटेनं अनेकांना 'दृष्टी' देणारं जोडपं मी पाहिलं. डॉ. गजानन हे भूलतज्ज्ञ आहेत, तर डॉ. वर्षाताई या नेत्रतज्ज्ञ. मला मात्र भूल पडली ती त्यांच्या कामाची. त्यातून 'दृष्टी' मिळाली. बारीक बारीक गोष्टींतून त्यांच्या व्यग्र दिनक्रमातही काही 'निराळे' घडून जाते.
नव्या घरी राहायला आल्यावर लगेचच या दोघांना जाणवलं- वसाहतीतले रस्ते अस्वच्छ आहेत. कारण स्वच्छता कामगार एकच. तोही आठवड्यातून एकदाच येणारा. दोघांनीही स्वतःच्या घरातील सेवकाला अधिक मेहनताना देऊन रोज वसाहतीतील स्वच्छता करण्यास सांगितलं. पुढचा टप्पा होता- लोकांना रस्त्यावर कचरा टाकण्याच्या सवयीपासून परावृत्त करण्याचा. अशी कामं न बोलूनच करायची असतात. शब्द आले, की विरोध आलाच. गजानन-वर्षा यांनी हे जाणलं होतं. दोघांनी आठवडाभराचा कचरा मावेल असे मोठ्ठे डबे सर्वांना सप्रेम दिले. छान रंग लावलेले, दोन्ही बाजूला कड्या असलेले. विनामूल्य भेटीचा आनंद असतोच. तोही अनेकांना झाला. बेघर कचऱ्यालाही रंगीत घर मिळालं. रस्ता स्वच्छ राहू लागला. ते येथेच थांबले नाहीत. वसाहत सुशोभित दिसावी म्हणून त्यांनी स्वतः शे-सव्वाशे फुलझाडं वसाहतीत वाटली, कुंपणाजवळ रुजवा, अशी विनंती केली. अशा गोष्टीला फारसे पैसे खर्च होत नाहीत, सौंदर्याची ओढ हवी असते. डॉ. गजानन आणि वर्षा झाडे यांना ही ओढ आहे. म्हणूनच त्यांनी या गोष्टी केल्या. महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून धडाडीचे टी. चंद्रशेखर नागपुरात आले. शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा त्यांनी चंग बांधला. याकामी त्यांना जागरूक नागरिकांची मदत हवी होती. हजारो नागपूरकरांनी तशी मदत केलीच. पण वर्षा-गजाननरावांनी ही मदत कशी केली, हे कळल्यावर कौतुक वाटलं. अगदी वेगळ्या ठिकाणाहून आलेल्या आयुक्तांना चटकन् शहराचं अंतरंग कळणं अशक्य असतं. शहरात वाहतुकीला अडथळा कुठे कुठे आणि नेमका कशामुळे होतो, कुठले पुतळे, कुठली प्रार्थनालयं हे अडथळे आणण्याचं काम करतात, याची यादीच त्यांनी उपायुक्तांना सादर केली. त्यानुसार कारवाईची विनंती केली. शासनाला नागरिकांचा सहयोग हवा म्हणतात, तो हा! नाही तर पडलाय ना खड्डा, पडू द्या. आपण त्यात पडत नाही, तोपर्यंत धास्ती नाही! ही वृत्ती आज बोकाळलीय.
आपल्या व्यवसायातही झाडे दाम्पत्यानं काही बंधनं स्वतःहून घालून घेतली आहेत. काही वेळा एखाद्या शस्त्रक्रियेत रुग्णाला आपला डोळा गमवावा लागतो. हे दु:ख रुग्ण व त्याच्या कुटुंबियांना असह्य असतं. अशावेळी त्यांच्याकडून शस्त्रक्रियेची फी घेतली जात नाही. रुग्ण समोर असताना मोबाईलवर बोलणं टाळायचं, इंटरनेटवर काही बघण्यात 'टाइमपास' करायचा नाही, हा दोघांचा निश्चयच आहे. याचबरोबर दर महिन्याला एखाद्या गरजू मुलाचा शिक्षणाचा खर्च ते करतात. बुद्धिमान, गरजू मुलांना वह्या-पुस्तकं देणं आणि त्याची अभ्यासाची वाटचाल सुकर करणं, हा दोघांचा आनंद आहे. कवयित्री असलेल्या डॉ. वर्षा झाडे म्हणतात, 'हे आम्ही जे काही करतो, ते आमच्या स्वार्थासाठीच! त्यातून इतरांना मदत होत असेल तर चांगलंच आहे, पण आम्हाला मात्र खूप समाधान मिळतं.'
हे समाधान हेच तर जीवनाचं श्रेय आहे. प्रपंच करताना, व्यवसाय करताना अनेकांची जीवनं सुरळीत करणारे असे असंख्य आहेत. त्यांची नोंद नसते प्रसार माध्यमांना! पण म्हणून त्यांचं मोल कमी ठरत नाही. अशा माणसांमुळेच तर जगण्यावरचा विश्वास दृढ होतो. सगळ्यांनाच आभाळव्यापी कार्य करता येणार नाही कदाचित्; असेल थेंबभरच! पण त्या थेंबातही क्षमता असते- आभाळ धारण करण्याची!

# २९.        दानत

कुणाकडे तरी मन मोकळं करावंसं वाटणं, ही अन्नपाण्याइतकीच गरज असावी. अन्यथा कणभर ओळख नसताना, केवळ आवारातल्या बाकड्यावर बसलेल्या माझ्यासारख्या इसमाकडे त्या ड्रायव्हरनं मन मोकळं केलंच नसतं.
एक कार कंपाऊंडमधून आत येते काय, माजोरड्या चेहऱ्याला न शोभणारा गॉगल घालून, शुभ्र कपड्यातला 'शेठ' उतरतो काय, डिकीतून जिलेटीन पेपर लावलेला बॉक्स ड्रायव्हरकडून काढून घेतो काय... आमच्या इमारतीत तो बॉक्स घेऊन शिरतो काय... पंधरा-वीस मिनिटं करमणूक म्हणून इमारतीच्या आवारात थांबलेल्या मला, इतक्या गतिमान, चित्रमय दृश्यांची नवलाई पुरेशी होती.
...पण आपला 'शेठ' इमारतीत शिरल्याची खात्री करून, त्या ड्रायव्हरला काय वाटलं कोण जाणे- 'साब, आपको क्या लगता है- ये गिफ्ट है?'
थोडा हडबडलोच मी! दिवाळीच्या अशा भेटी देण्या-घेण्याची पद्धत सर्वांनाच माहिती आहे. मी म्हटलं, 'गिफ्टही होगी.'
'नही साब, ये सरासर रिश्वत है-'
आपल्या 'शेठ'बद्दल एकदम अशी प्रतिक्रिया, तीही संपूर्ण अनोळखी अशा माझ्याजवळ? अर्थात मोठ्या विश्वासानं त्यानं ही 'बातमी' लिक् केली होती. माझा-त्याचा आणि त्याच्या शेठचा न् माझा जन्मात संबंध येणार नाही, या खात्रीपोटी.
'लाच? लाच कशी काय?'
'नही तो क्या- मिठाईच्या खाली नोटांचा पुडका मी भरलाय, माझ्या हातांनी. वर मिठाई आत रुप्पाई. सरकारी लोकांच्या घरी दोन दिवसांत किती बॉक्सेस दिले. चार कारखाने आहेत. कुछ रहेगा अंदरका मामला. पण साब, मी तीन महिन्यापासनं सांगतोय. दिवाली को और एक पगार दो- दिया नही.'
एक कचकचीत शिवी सोडावॉटरच्या बाटलीतून गोटी बाहेर यावी तशी निसटली.
'पगार किती रे?'
'क्या बताऊँ! सिर्फ दो हजार, आपही बोलो, क्या होता है दो हजार में? तो पण रडत देतो. कधी धा तारीख, कधी पंधरा- बंबईमें दो हजाराचा काहीतरी मतलब है क्या? दिवाळीला म्हटलं, एक पगार दे दो. पण म्हणाला, धंदा नही है आजकल, साब लोगोंके लिए अंदर दसदस हजार है, गरीबोंके लिए- जो तुझ्याजवळ रात्रंदिवस ड्रायव्हिंग करतो- त्याला घर नाय काय रे? एक दिन भेजा फुटा ना, देईन ठोकर.'
'आँ?'
'मग काय? साब, अंदर जलन है जलन, जळतोय जीव रात्र न् दिवस- पेडर रोड, मलबार हिल, जुहू बीचच्या बंगलेवाल्यांसाठी घसिटारामची मिठाई वाटतो, माझ्या दोन बच्चांसाठी एक बर्फीचा तुकडा नाय दिला. सांगा काय दानत या ...' पुन्हा एक अणकुचीदार शिवी.
'पटत नाही तर दे नोकरी सोडून.'
'बंबई में मिलती है क्या नोकरी? ज्याम ढुँढतोय, अच्छीसी मिल गयी तो लाथ मारूंगा. साब यांचा संसार कधीच सुखाचा नाय होणार.'
'का रे?'
'कसा होणार? आमची हाय लागते ना त्यांना, एवढ्या मोठ्या बंगल्यात दोघेच आणि चार कुत्ते, डर है, कोई लेके भागेंगे. बीबी के साथ रोज झगडा.'
'मेमसाब तरी प्रेमळ आहेत का ?'
'दोनो भी वैसेच'

एक नवी शिवी हासडून त्यानं हवेतल्या हवेत जणू तिचा चेहरा पाहून घेतला, मग विनाकारण थुंकला. दानत नसलेल्या अमीरांच्या गर्भरेशमी चिंध्या लळथळत लोंबत होत्या समोर.

शेठ आला. काहीच न घडल्यासारखा तो चटकन् गाडीत शिरला. एक भडकलेला अपरिचित अंगार माझ्यासमोर हा असा निघून गेला.

त्या ड्रायव्हरची काही फार मोठी अपेक्षा नव्हती. पण हाताखालच्या कामगारांना शोषणात झुलवत ठेवायचं ही अनेक भ्रष्टांची रीत मी अनेकदा पाहिलेय. देण्यासाठी केवळ पैसा नको असतो, 'दानत' हवी असते.

...आपल्या कुटुंबियांप्रमाणे आपल्या घरातील, आपल्या छोट्याशा कंपनीतील, कारखान्यातील नोकर-चाकरही आपले कुटुंबीय असतात. अनेकदा जवळचा वाटणारा नातेवाईक जेवढा धावून येणार नाही हाकेला, त्याहून हीच माणसं एखाद्या कर्दनरात्री धावून येतात. आपल्या नोकरांच्या, उसाशांचं आणि दिलास्यांचंही एक पर्यावरण घरात तयार होतं. घरातल्या लक्ष्मीचं अस्तित्व समाधानी असायला ही माणसंही समाधानी ठेवणं गरजेचं असतं. गरजवंताला अगतिकच ठेवायचं या वृत्तीची माणसं असलेल्या संपत्तीचा निरोगी आनंदही उपभोगू शकत नाहीत. त्यांच्या पैशाचं 'वैभव' होत नाही, कारण या संपत्तीत आपल्या भोवतालाचाही काही वाटा आहे, हे त्यांना मुळी पटतच नाही.

अशीच एक मध्यरात्र आठवली. मी आणि माझा एक संगीतकार मित्र रस्त्यातले चावरे कुत्रे चुकवत प्रभादेवीच्या लॉज गुलमोहोरवर गेलो होतो, एका निर्मात्याचा शोध घेत. नुकत्याच ध्वनिमुद्रित झालेल्या चित्रपटांच्या गाण्याचा एक पैसा माझ्या संगीतकार मित्राला मिळाला नव्हता. घरात आई आजारी, भाऊही कंपनी बंद म्हणून घरात टाळेबंद होऊन बसलेला. लहान दोन मुलं, घरात नवा पैसा नाही आणि उद्या गणपती घरी येणार, तर मूर्ती आणायला पैसे नाहीत. आमच्यासमोर गायक हजारच्या काही नोटा घेऊन गेले, वादक पैसे घेऊन गेले. कवी आणि संगीतकारला सांगितलं गेलं- 'इथंच थांबा. रात्री अकराच्या आत माणूस येईल माझा.'

माणूस आलाच नाही. सांताक्रूझ ते दादर आणि नंतर प्रभादेवीपर्यंतचा प्रवास करून मध्यरात्री पोहोचलो, तर स्वारी 'नको तिथं' पोहोचलेली. दरवाजा उघडल्यावर शिवीच हासडली त्यानं- 'ही वेळ? पैसे मागायची?'

'पण तुम्ही माणूस पाठवणार होतात. उद्या गणपतीची मूर्ती आणायला पैसे नाहीत.'

'मग नका करू पूजा. ' दरवाजा लागला.

ते दिवस आठवले. दरवाजा उघडल्यावर जे दिसलं, त्या 'तयारी'साठी पैसे होते, पण राबलेल्या एका कलावंताला त्याचे हक्काचे पैसे मिळत नव्हते.

...अधिकचं देऊ नका, पण निढळाच्या घामाचं देण्याची 'दानत' तर ठेवा! पण मला वाटतं, माणूस जितका धनाढ्य होत जातो, तेवढा तो आतून 'आकुंचित' होत जातो की काय? एखादाच पुलंसारखा! देण्यानंच गर्भश्रीमंत होत गेलेला!

लहानपणी मी आईला विचारलेला प्रश्न आणि आईनं दिलेलं उत्तर आठवलं- घरात केली होती बासुंदी. आईनं एक वाटीभर बासुंदी वेगळी काढून ठेवली. भांडी घासणाऱ्या भीमाबाईसाठी. मी म्हटलं, 'अगं, आपण तिला पगार देतो नां?'

आई म्हणाली, 'अरे, उद्या ती बासुंदीचं पातेलं घासेल, तेव्हा तिला वाटणारच ना, आपल्यालाही मिळावी पेलाभर बासुंदी. हे मनातलं ओळखायला शीक. केवळ पगार नाही, मनं जपायला हवीत.'

तेव्हा किती कळलं कुणास ठाऊक!

संपत्ती येते न् जाते. नाती उरतात, ती या मानव्यानं.

रामदासस्वामींच्या चरित्रातली एक कथा आठवली. 'जयजय रघुवीर समर्थ' म्हणत एका सामान्य झोपडीशी स्वामी उभे राहिले. आतली स्त्री बाहेर आली आणि म्हणाली, 'स्वामी, मनात खूप आहे, झोळीत टाकावं काही, पण घरात काही नाही!'

स्वामी म्हणाले, ‘हरकत नाही. ती चिमूटभर माती झोळीत टाक. आज नाही तुझ्याकडे काही, पण येईल तेव्हा देण्याची सवय जायला नको, तो संस्कार आहे.‘

‘देण्यावरच तर निसर्गचक्र सुरू आहे. निसर्गाला समांतर जगा‘, असं आचार्य विनोबा म्हणतात, मला वाटतं, त्यांना हेच सांगायचं आहे.

# ३०. महाशंख

दोनशे पुरत नव्हते, दोन हजार पुरत नव्हते आणि आता वीस हजारही महिन्याला पुरत नाहीत, अशा काळात नेमकं 'पुरतं' काय? 'उरतं' काय? इथं झोपडीतही दुःखं आहेत आणि बंगला, हवेलीसुद्धा हुंदके देतायत्- तिथं हसणारी घरं कोणती?

...भरूनही उरणारं समाधान नेमकं कशात आहे? ताटातल्या श्रीखंडपुरीत आहे? की गळ्यातल्या सात-आठ तोळ्याच्या रत्नजडीत चंद्रहारात आहे? की वातानुकूलित शयनगृहातल्या मऊ गादीत आहे? रोज मथळ्यातून झळकणाऱ्या, डोळ्यात बोट घालणाऱ्या प्रसिद्धीत आहे?- कशात आहे समाधान? यातच आहे म्हणावं- तर एखादी प्रसिद्ध नटी अचानक बाल्कनीतून उडी मारून जीव का देते? एखादा जडजवाहिराचा व्यापारी कुटुंबासह विषप्राशन का करतो? सत्तेच्या खेळात परस्परांचा जीव घेण्याइतकं क्रौर्य दाटून का येतं? प्रसिद्ध राजकीय घराण्यातले कुटुंबकलह सार्वजनिक चर्चेचा विषय का होतात?

मग समाधान कशात आहे?

घराच्या लांबी-रुंदीत, सजावटीत की ताटातल्या मेवामिठाईत, की आणखी कशात? अनेकदा मतीच कुंठित होते. पंचतारांकित हिलवरच्या एखाद्या धनाढ्याच्या डोळ्यात 'आणखी हवंय' या लालसेची जीभ वळवळताना दिसते, तर आळंदीला माऊलींच्या मंदिरात अश्वत्थाच्या पायरीवर एखादा समाधानी वारकरी दिसतो! डोळ्यांनी हसणारा!... ही दोन टोकं... वाटचालीत दिसत राहातात. संभ्रमात टाकत राहातात.

ओशोंनी

महाशंखाची एक झकास रूपककथा सांगितलेय. पोटापुरता देणारा शंख देऊन त्या बदल्यात एक महाशंख गृहस्थ घेतो. हा शंख मागेल त्याच्या दुप्पट देतो. दहा हजार मागितले की वीस हजार. ठीकाय् वीस हजार दे म्हटलं की, महाशंख म्हणतो, चाळीस हजार देईन. देत तर काहीच नाही, फक्त म्हणत राहातो.

जे मिळालंय त्याबद्दल कुरकुर करून आहे तेही गमावणारी माणसं आपण पाहातो. काही वेळा आपणही तोच माणूस असतो. पण अनेकदा माणसं असूयेपोटी हातातला परीसही विरघळून टाकतात. एका दरिद्री माणसाला देव प्रसन्न होतो न् देव मोठा अजब वर देतो- 'एकच वर- एकदाच देईन, पण जे मागशील ते शेजाऱ्याचं दुप्पट होईल. काहीही माग ते शेजाऱ्याचं दुप्पट होईल, एवढं लक्षात ठेव.' आता हा अजब वर ऐकून हे दरिद्री गृहस्थ पेचात पडले. 'आपण शंभर एकर शेती मागितली, तर शेजाऱ्याला दोनशे मिळेल, आपण दोन कोटी मागितले तर पंचाईतच आहे, शेजाऱ्याला चार कोटी मिळताहेत. शेजाऱ्याचं भलं चिंतणारा शेजारी, अजून जन्माला यायचाय्, हे देवालाही बहुधा माहिती नसावं. त्यानं या दरिद्री माणसाची भलतीच पंचाईत केली. बहुतेक माणसांसारखाच त्या अठराविश्वे दरिद्री माणसानं विचार केला. हीच संधी आहे शेजाऱ्याचा सूड घ्यायची. मागे केव्हा तरी सतरा वर्षांपूर्वी त्यानं केलेल्या अपमानाचा बदला घ्यायचा याहून सुंदर मोका कुठला? एकच न् अखेरचा वर आहे- त्या दरिद्री माणसानं सांगितलं, 'देवा, मागणी तयार आहे.' देव तर आधीपासूनच 'रेडी' होता. देवाला वाटलं, दरिद्री माणूस जास्तीत जास्त काय मागेल? सोनं! रत्नपाचू! जमीनजुमला! भव्य राजवाडा! पण देवाचाही अंदाज सपशेल चुकला. शेजाऱ्याचं दुप्पट करण्याच्याही तयारीत देव होताच. देव म्हणाला, 'हं, मी तयार आहे, माग.' दरिद्री माणूस म्हणाला, 'माझा एक डोळा फुटू दे!' झालं. तसंच झालं, इकडे एक डोळा फुटला, तिकडे शेजाऱ्याचे दोन डोळे फुटले.

सुडात, जवळच्या माणसाचं वाट्टोळं करण्यात तर लक्षावधी माणसांची सारी ऊर्जा करपून जाते.

सगळे गुंते आहेत, ते 'आत'. नियती निर्मित संकट एखादद्दुसरंच, कर्मानं मात्र असंख्य दुःखं शिजत ठेवलेली. दैव संकेतही देतं, पण माणसं ते संकेत झुगारतात. मग 'दैव- दैव' करीत राहातात.

माझ्या ओळखीचं एक कुटुंब आहे. मला खात्री नव्हे, प्रचंड खात्री आहे, असंच एखादं कुटुंब तुमच्याही ओळखीचं असणार. हे तीन भाऊ. स्वाभाविकच तीनही भावांची आपापल्या पाताळयंत्री, भांडकुदळ बायकांवरून होणारी पोरकट भांडणं, म्हणूनच मनाच्या दरीला सीमेंटच्या वेगळ्या भिंती! गंमत पुढे आहे- एकच बिल्डिंग, तीन 'ब्लॉक'!

त्या तिघांची एकुलती एक आई. वडिलांनी आधीच कैलासाचं बुकिंग केलेलं. या घरात नाही पैशाचा प्रश्न, नाही खाण्यापिण्याचा, जे मूलभूत प्रश्न असतात ते या घरात नाहीच. मग प्रश्न कुठला?
आई कुणाकडे ठेवायची?
आईची पंचाईत. सॉलीड पंचाईत. खरं तर तीन मुलगे- 'कर्तबगार' चांगले बँकेत, एलआयसीत, बिलाआयसीत कामाला. प्रत्येकाला खरंतर वाटलं पाहिजे, आईनं आपल्याकडे राहावं.
एका 'मोठ्ठ्या' भांडणात तिघांनी ठरवलं- या म्हाताऱ्या आईचा 'भार' एकावरच नको, त्यांनी इस्पिक- बदाम- चौकट पत्ते वाटावेत तसे महिने वाटले- जाने., फेब्रु., मार्च मोठ्याकडे, एप्रिल- मे- जून मधल्याकडे, जुलै- ऑगस्ट- सप्टें. धाकट्याकडे. आता उरले तीन महिने. मग ऑक्टो.- मोठा, नोव्हें.- मधला, डिसें.- धाकटा.
वर्ष संपलं.
ठीकाय्, म्हातारीची 'व्यवस्था' तर झाली.
तरीही पंचाईत ठरलेली.
प्रत्येकानं आईला अट टाकली. माझ्याकडे येशील तेव्हा दुसऱ्याशी बोलायचं नाही. दिसला तरी हसायचं नाही. मुलांना आधीच बंदी केली होती, आता आईलापण. अशा घरातली लहान मुलं किडवण्याची भरपूर व्यवस्था त्यांच्या भांडकुदळ आई-बापांनी केलेली असते. ही मुलं जाऊन बाबांना सांगायची- 'बाबा, आजी त्या काकाकडे गेली होती.' झालं, आजीबाईंना घरातल्या कोर्टात उभं करणारे चिरंजीव!
'अरे, त्याला ताप आला कळलं, म्हणून गेले बाळा!'
आईचं मन सर्व लेकरांकडे सारखंच ओढ घेतं. आजारी, अपंग मुलाकडे तर ते अधिकच झेपावतं. पण हे चाळिशीच्या पोराला कुठून कळणार? म्हातारीला लाखोली वाहाणं, अपशब्द... हा गदारोळ!
आता तुमच्या भांडणात त्या माऊलीची फरफट कशाला?
या वयात तिचं मन रमेल तिथं राहूद्या की. गुंता कुठे आहे?
काही माणसांनी मुळी दुःखी राहायचंच व्रत घेतलेलं असतं!
सारखी तुलना! शेजारी जी वस्तू आली, ती आपल्याकडे हवीच! झाले कष्ट सुरू. त्यांच्या गरजा, त्यांची आवक वेगळी! आपले संदर्भ वेगळे!
स्वतःच्या मुलाचे नव्वद टक्के 'एन्जॉय' नाही करणार, कारण शेजारच्याला ब्याण्णव मिळालेत. आता काय म्हणावं कर्माला?
महाशंख- बस्स् महाशंख!
यातून सुरू होतं जीवघेणं सूडचक्र.
कलावंत कलावंतांसाठी 'सुपाऱ्या' देतात. आपल्या हातून निर्मिती होण्याऐवजी, दुसऱ्याच्या हातून ती होऊ नये, यासाठी षड्यंत्र रचतात! मरायला टेकले तरी कोर्टकचेऱ्या सुरू ठेवून, समोरच्याचं मानसिक स्वास्थ्य खाऊन टाकतात. निनावी पत्र टाकून एखाद्याचं लग्न मोडतात. मध्यरात्री गलिच्छ फोन करतात! शेजारच्यांचं फळलेलं फुललेलं झाड ऐन दुपारी कुऱ्हाडीचे घाव घालून तोडून टाकतात.
एक ना दोन, दरिद्री माणसांच्या तऱ्हा तरी किती?
दारिद्र्यरेषेखालची माणसं मोजायची तर मोजणार कशी? घरं न् आतली भांडीकुंडी यावरून का दारिद्र्य कळतं! चाळीत असताना पिठल्याला 'क्या बात है' करीत जगणारे आपण हजार स्क्वेअर फुटाच्या फ्लॅटमध्ये डायनिंग टेबलवर अबोल, धुसफुसत घास ढकलतो.
चाळीत असताना पगार पुरत नसतानाही अतिथी आला तरी दोन घास ऊनऊन जेवायचा आंबटवरण भाताचा! आता माणसंच आलेली आवडत नाहीत.
सतत कपाळावर आपली आठी! दुसऱ्याला काही देऊ नये, हीच वृत्ती! दुःख कशात? आनंद कशात? माणसं कसा सोयीनं अर्थ लावतात पाहा- सतत हे पाहिजे, ते पाहिजे. यात कातावलेल्या बायकोला माझा मित्र म्हणाला, 'ते फक्त

रस्त्यावर कुटुंब, मोठ्या पाईपमध्ये चूल मांडलेय, तिथंच पोरं खेळतायत्, बघ पाईपमध्ये आनंदात जगतायत्. त्यांच्याकडे बघून काहीतरी शिकून घे!‘ मित्राची बायको म्हणाली, ‘आपल्यासाठी कुठला पाईप शोधायचा ?‘

कप्पाळ!

शेवटी एकच खरं!

महाशंखच!

# ३१.        सौजन्याची ऐशीतैशी

बाहेरगावी कार्यक्रम असेल तेव्हा कार्यक्रमाचे संयोजक नेहमीच काळजी घेतात. त्याच जिव्हाळ्याने आलेला फोन विचारीत होता, ‘सर जेवणाबद्दलचं तुमचं काही पथ्य?‘

इतकं प्रेमानं कुणी विचारलं की, ‘पथ्य‘ मुळी काही उरतच नाही. मी मोकळेपणाने सांगतो, ‘पथ्य काही नाही.‘

‘तरीही गोडात काय आवडतं?‘ पुन्हा एकदा मिट्ठास जिव्हाळा टपटपतो. माझी जबाबदारी फारच वाढते. मी सहजपणे म्हणतो, ‘छे हो, साधंच असू द्या.‘

‘असं कसं, साधं म्हणजे?‘

‘हे बघा, साधं म्हणजे अगदी या क्षणी तुमच्या घरात तुम्ही जे जेवणार असाल ते चालेल मला!‘

जेवणाचा विषय एकदाचा संपवावा म्हणून मी सांगून टाकतो. गेली कित्येक वर्षे सकाळ- संध्याकाळ मी जेवतो आहे. आता त्याबद्दल नवं काय सांगायचं मला प्रश्न असतो. परंतु येणाऱ्या वक्त्याच्या आतिथ्यात कणभरही कमतरता नको म्हणून प्रिय संयोजक काळजी घेतात. त्या काळजीचाच भाग म्हणून पलीकडला फोन मला विचारीत होता.

‘सर, निवासाची व्यवस्था?‘

‘हे बघा, संस्था नवी आहे, त्यात ती ग्रंथालयाशी संबंधित आहे. खर्चिक व्यवस्था नको. आठ-दहा तासांचा तर प्रश्न आहे. प्रवासानंतरच्या पुरेशा विश्रांतीसाठी आणि शांतपणे टिपण काढण्यासाठी खासगीपणा मिळेल इतपत ठीक आहे.‘

‘थँक्यू सर.‘

माझ्या साधेपणानं भारावलेला स्वर फोन आटोपता घेतो. समोरच्या व्यक्तीचं अकृत्रिम प्रेम पाहून इतकी काळजी करणारं मन योग्य ती सोय करणारच या खात्रीनंच आपण समोरच्याला अडचणीत आणत नाही.

प्रत्यक्षात काय घडतं?

कार्यक्रमस्थळी पोहोचतो. ठरलेल्या गाडीवर संयोजक आलेलेच नसतात. ११ तासांच्या प्रवासाचा शीण खांद्यावरील बॅगेसारखा वागवीत मी स्टेशनातूनच फोन करतो. ‘काय हो, घ्यायला आला नाहीत ते?‘

‘अरेच्या, आलात का? पत्ता सांगू का?...‘

मी मुकाट पत्ता उतरवून घेतो. फोनवर जेवण, राहणं यांची आत्मीयतेनं विचारपूस करणारा गृहस्थ प्रत्यक्षात त्याच्याच गावी स्टेशनवर न्यायलाही येत नाही.

पत्त्यावर पोहोचतो. गृहस्थ उभा असतो.

‘काय हो, स्टेशनवर तरी यायचंत!‘

‘म्हटलं, मी यायचं स्टेशनवर, पुन्हा स्टेशनवरून इथंच यायचं. संस्था नवी आहे. खर्च तेवढाच...‘

बोलता बोलता एका टपरीवजा गोठासदृश जागेकडे गृहस्थ घेऊन जातो. ‘ही तुमची निवास व्यवस्था, हे पाणी. ओके.‘

सात-आठ तासच, पण तेही कसे काढायचे, ही विवंचना बुबुळात घेऊन मी माझी निवास ‘व्यवस्था‘ न्याहाळतो. कोपऱ्यातली जळमटं, पाण्याचं जुनं केव्हाचं तरी मडकं, कॉट नव्हे, खाटेवरची नक्षी उडून पांढरट पडलेली चादर...

‘इथं मी राहायचं?‘

‘कुणी डिस्टर्ब करणार नाही.‘

फोन संवाद आठवला. माझं ॲडजेस्ट होणं गृहस्थानं व्यवस्थित गृहीत धरलं होतं.

‘छे, इतक्या ओंगळ ठिकाणी मी राहणं शक्य नाही. गावातला एखादा लॉज बघू या.‘

‘अहो, इथं साने गुरुजीही राहिले आहेत.‘

गृहस्थ त्या जागेचे ‘पावन‘पण ठणकावून सांगतो. आतापर्यंत सोसून धरलेला सारा ठणका, ठणकावीत व्यक्त होतो. मी कडाडतो.

'हे बघा, साने गुरुजी महान होते. ते इथं राहिले असतील. दवणे गुरुजी राहणार नाहीत. मुकाट्याने व्यवस्था बदला, अन्यथा आल्यापावली मी निघालो!'

फोनवरचा मी आणि प्रत्यक्षातला मी केवढा भीषण वेगळा आहे, या दरीमध्ये न सावरलेल्या त्या संस्था प्रतिनिधीचा चेहरा चिडचिडा होतो.

'अहो, तुम्हीच तर म्हणालात, साधी व्यवस्था...'

'म्हणालो, पण ही साधी अ-व्यवस्था आहे. हे बघा, दमलोय मी. काय ठरवायचंय? लवकर बोला.'

पुढचं चित्र त्याहून धक्कादायक असतं. गावातल्या बऱ्या लॉजमध्ये माझ्या नावावर खोली 'बुक' असतेच. गेल्यावर लगेच कळतं- नावावर रूम घ्यायची, प्रत्यक्षात अंदाज घेऊन तिथली पावती संस्थेला दाखवून, ते पैसे हडप करायचे, पाहुण्याला फुकट व्यवस्थेत ठेवून!

शिसारी येते. अशा भ्रष्ट कार्यकर्त्यांमुळे चांगल्या संस्था लयाला जातात. जुन्या बाजारातील रद्दीतील पुस्तके त्याच भावात घेऊन त्यावरच्या किमतींचं नवं बिल संस्थेला लावणारा एक 'वाळवी' कार्यकर्ता असाच एकदा भेटला होता. नवी व्यवस्था करून झाल्यावर तो गृहस्थ पुटपुटला, 'आम्हाला वाटलं, तुम्ही ॲडजस्टेबल असाल.'

'ॲडजस्टेबलचा अर्थ कळतो का?'

'फोनवर तर...'

'संस्थेवर, व्यक्तींवर अधिक भार नको म्हणूनच मी बोललो. पण त्यात तुमची किमान व्यवस्था गृहीत होती.'

दार मिटून कॉटवर पडल्या पडल्या डोळे उद्वेगाने पाणावले. माणसं तरी कशी कशी असतात! ती आपल्याला हे असं वागायला का लावतात? डामडौल, अनाठायी खर्चाला चाट देण्याच्या आपल्या स्वभावाचं पायपुसणं करीत कित्येक माणसं आपल्याला 'गृहीत' धरायला लागतात, तेव्हा मनात नसताना थोडा फणा काढावा लागतो. जिथं साध्या, सरळ, मोकळेपणाचा अर्थ या माणसाला 'कणा'च नाही, असा घेतला जातो, तेथे समोरच्याला त्याची 'जागा' दाखवावीच लागते, आपली कुठली तेही सांगावं लागतं. तो दुसरा समजूनच घेतोय, की तो आपल्याला काही वेगळं समजतोय, याची चाणाक्ष जाण हवीच. आपल्या निरंहकारी स्वभावातही दुबळेपणा नको. समोरच्या स्वार्थी, कोडग्या माणसाला टिचकी मारण्याचं बळ हवंच हवं!

नजरचुकीनं निमंत्रण पत्रिकेत नाव छापलं जात नाही. आपण म्हणतो, 'नावात काय एवढं? होतं केव्हा केव्हा- छोड दो!' समोरचा तुम्हाला लगेच पहिल्या रांगेतून तिसऱ्या रांगेत बसवतो. एखादा सहकारी आपुलकीनं पट्कन पाणी आणून देतो. आपण लगेच त्याला 'ए, एक चहा मागव रे!' सांगून टाकतो. 'नमस्काराचं काय एवढंसं? सून कसली, आम्ही मायलेकीच आहोत' म्हणणाऱ्या सासूला, सिनेमाला जाणारी सून सांगून जाते, 'तेवढी गवार मोडून ठेवा.' लोकलमध्ये गर्दीत उभ्या असलेल्या एखाद्या लेकुरवाळ्या बाईला आपण म्हणतो, 'बाई, बसा तुम्ही!' बाई हर्षभराने बसते. दोन स्टेशनांनंतर बाईच्या शेजारची जागा रिकामी होते. आपण त्या जागेवर बसू लागतो. ती लगेच म्हणते, 'एक मिनिट, मिस्टरांना बसायच्य. ओ, या हो!'

चालत्या लोकलमधून आपण उभ्या उभ्या कोसळतो. याचा अर्थ 'जुळवून घ्यायचं नाही', असा नाही किंवा मदत करताना हात आखडता घ्यायचा असाही नाही. आपल्या आपुलकीचा, सौजन्याचा समोरच्यानं दुबळेपणा असा अर्थ घेऊ नये, इतपत काळजी घ्यायलाच हवी. जुळवून घ्यायला पूर्ण तयार असलेल्या एका युवतीचं 'बघण्याच्या समारंभातलं' ते बाणेदार उत्तर मला नेहमी आठवतं.

एकमेकाला जाणून घेण्याच्या 'समारंभात' ती पदवीधर उपवर मुलगी वेगवेगळ्या प्रश्नांना प्रांजळपणे सामोरी जात होती. हल्ली असे प्रश्न कुणी विचारीत नाही, हे खरं आहे. पण असतात काही शिल्लक, उरलेले, गेल्या शतकातले.

'हे बघ, लग्नानंतर असं घडलं की ऐनवेळी चार पाहुणे आले, घरातली भाजीच संपलीय तर तू काय करशील?'

'पिठलं भात करीन.' मुलगी नम्रपणे.

'समजा, तांदूळही नाहीत, डाळीचं पीठही नाही. मग काय करशील ?'

'भाकरी करेन, नाहीतर चपात्या करीन.'

चुणचुणीत तरुणी होणाऱ्या मामंजीचा तऱ्हेवाईक प्रश्न झेलीत उत्तरते.
पण नव्या युगात, जुना हेकटपणा न सोडणारे मामंजी अजूनच पुढे जातात, म्हणतात- ‘समजा, पीठही नाही, घरात लसूणही नाही, लोणचंही संपलंय. तर तू काय करशील ?‘
शांतपणे, पण धारदारपणे ती मुलगी म्हणते, ‘हे बघा, इतक्या दरिद्री घरात जायलाच मी तयार होणार नाही.‘
समजून घेण्याच्या तिच्या सौजन्याची ऐशीतैशी करणाऱ्या हेकटपणाला तिनं योग्य तिथं, योग्य प्रकारे थोपवलं.
सौजन्यही ‘बाणेदार‘पणानं खुलतं. आणि दुसऱ्याच्या सन्मान ठेवण्याच्या वृत्तीनं सौजन्याचीही पूजा होते!.

# ३२. शिक्षकाची इयत्ता

स्नेहसंमेलनांचा ऋतू वाहू लागला आहे. अनेक शाळा-शाळांमधून 'पाहुणा' म्हणून, नवनवे रंगीत बिल्ले मिरवीत फिरतो आहे. चकित होतो आहे. मुबलक सोयींनी युक्त अशा शहरातल्या शाळांना संकोच वाटेल, असे अप्रतिम प्रयोग खेडोपाडी होत आहेत. कुठल्याही सहज उपलब्ध साधनांशिवाय केवळ शिक्षकांच्या मार्गदर्शनात फुलणारे भारताचे भावी शास्त्रज्ञ, चित्रकार, कलावंत पाहताना वाटतंय, आजही शिक्षक मनात आणलं तर केवढी किमया घडवू शकतात! ना त्यांना कुठल्या सन्मानाची ओढ, ना वेगळ्या धनाची अपेक्षा. केवळ आपल्या हातून विद्यार्थी घडावेत, एवढाच ध्यास असणारे शेकडो शिक्षक मी पाहत आहे. प्राचार्यही अभिमानानं सांगतात, 'हे इतकं उत्कृष्ट रांगोळी प्रदर्शन, ही केवळ या सावंतसरांची धडपड. रात्रंदिवस कष्ट घेतलेत यांनी! हे विज्ञान प्रदर्शन, साठ मुलांना सहा महिने शाळेच्या वेळेव्यतिरिक्त रोज दीड तास या गायकवाडबाई मार्गदर्शन करीत होत्या, म्हणून हे घडू शकलं!' आपापल्या प्रयोगांजवळ उभी असलेली धिटुकली मुलं आणि जवळच संबंधित शिक्षक. विद्यार्थ्यांचे प्रयोग वेगळे असतील, पण खऱ्या शिक्षकाचा जिवंत प्रयोग म्हणजे विद्यार्थी! तो यशस्वी झाला की शिक्षकाच्या श्रमाचं चीज होतं. प्रत्येक काळात शिक्षकाला सन्मान आहेच. अभिव्यक्तीच्या छटा बदलल्या असतील, काही अपवादानं हा सन्मान जरासा डहुळला असेल, पण आपल्याला कुठेही भेटलेल्या जुन्या शिक्षकाबद्दल अनादर व्यक्त करणारा विद्यार्थी अजून मला भेटायचाय्! वाटचालीत याही नात्यात क्वचित कंपनं उमटतात, पण अंती उरतो फक्त आदर! जिव्हाळा!

हा पेशाच असा आहे, की जसं शिवालयात शिरल्यावर बेलपत्राच्या गंधानं मनात सत्यम् शिवम् सुंदरम्च्याच लहरी उमटाव्यात, त्याप्रमाणं शिक्षकी पेशात शिरल्यावर आपोआपच जबाबदारीची, सत्त्वयुक्त वागण्याचीच प्रेरणा होते. श्रद्धा असो नसो, गंगेच्या दर्शनानं मन विशाल होतंच, यमुनेच्या भेटीनं मनात मुरली वाजतेच, तसं आपण 'शिक्षक' झालो, या जाणिवेतच एक झेप आहे! विकास आहे! प्रकाश आहे!

मी महाविद्यालयात नियुक्त झालो अन् मनात आलं, काय गंमत आहे आता 'रोज मी कॉलेजात जातोय्' असं म्हणणार. 'कामावर' किंवा 'कचेरीत, ऑफिसात' नाही. आपोआपच निवृत्त होईपर्यंत मी तरुण राहणार! शाळेचे शिक्षक अजूनच भाग्यवान! सगळ्यात कौतुक मॉन्टेसरीच्या शिक्षकांचं- अडीच-तीन वर्षांच्या अगदी चिमुकल्या मुलांशी या शिक्षिका बोलतात कशा, त्यांना रमवतात कशा, त्यांच्याकडून नाच, गाणी बसवतात कशा याचं मला अनावर कौतुक वाटत आलं आहे. 'केवळ पंचवीस मिनिटं छोटा शिशूच्या वर्गाला शिकवा' असा आदेश 'सरस्वती' मंदिरच्या रोहिणी रसाळबाईंनी मला दिला आणि पहिल्या पाचच मिनिटांत त्या निरागस कलकलाटानं मी असा काही कावराबावरा झालो, की विचारू नका. दहा हजारांच्या गर्दीपुढे वैचारिक विषयावरचं गंभीर भाषण शक्य आहे, पण तीन वर्षांच्या चाळीस मुलांना वात्सल्यानं गुंफून ठेवणं ही शिक्षकी पेशातली सर्वात अवघड गोष्ट आहे.

पण पुष्कळदा होतं काय, शिकवण्याची शिक्षकाची कायमची इयत्ता होते. सातवीला शिकवणारा शिक्षक 'सातवी'चाच होतो. बारावीचा अध्यापक बारावीचाच, तर तिसरीच्या बाई आजन्म तिसरीच्याच राहतात. व्यवहारासाठी कुठल्याही इयत्तेत शिक्षकानं शिकवावं, पण त्याच्या आत्मिक विकासाची इयत्ता सतत पुढचीच राहावी! त्या अर्थानं शिक्षकानं एकाच इयत्तेत राहू नये. नव्या अधिक वरच्या इयत्तेची मानसिक ओढ खऱ्या शिक्षकाला असते.

ही इयत्ता परीक्षेने वाढत नाही. खरं तर त्या विकसित करणाऱ्या इयत्तेची परीक्षा चार भिंतीत कागदावर घेतलीच जात नाही मुळी! तशी ती घेतल्यावर कसं उत्तीर्ण व्हायचं, ते सरावानं शिक्षकांना कळलेलं असतं. त्यानं फार तर गोदरेजच्या कपाटातल्या सर्वात खालच्या चोरकप्प्यात दडवलेली तुमची सर्व्हिस फाईल, आणखी एका पदवीनं भरली जाईल. पण विद्यार्थ्यांच्या मनाची एक पायरी अजून खोल उतरून वरच्या पायरीवर चढण्याचा आनंद मिळणार नाही.

म्हणूनच त्यासाठी हवी प्रयोगशीलता. विद्यार्थ्याला घडवणं- बिडवणं अहंकारासाठी नाही. स्वत:साठी! 'आतली', आपली गरज म्हणून! प्रयोगशीलतेनंच शिक्षक ताजा होतो. कात टाकून, त्याच्या नव्या नव्या पुनर्जन्माचे सोहळे तो

स्वतःही अनुभवतो. त्यासाठी आधी स्वतःला प्रयोगात लोटून द्यायला हवं. प्रसंगी अपयशाचीही तयारी हवी. सराईत, शिळ्या यशाहून, नवं कोरं अपयशही देखणं असतं!

पुष्कळदा सहकारी शिक्षकांशी तुलना करीत आपल्या अध्यापनाचे श्रम ठरवणारे शिक्षक असतात. अशी तुलना ही फार मोठी अडचण आहे. आपल्या श्रमाचा, प्रयोगाचा आनंद हा आपला आनंद आहे! स्वतःहून नव्या परिश्रमात, उपक्रमात वाहून घ्यायला हवं. 'ते आराम करतात, मग मी कशाला करू?' यानं त्यांचं नुकसान होत नाही, 'आपलं' होतं. प्रत्येकाची एक जीवनशैली असते. काही जण कामचुकारपणा करायलाच जन्माला आलेले असतात. अशा प्रवृत्तींशी संगनमत करायचं की या क्षेत्रातल्या तेजस्वी शिक्षकांच्या वाटेवर आपलाही एक दिवा उजळायचा, ही वादाची गोष्ट नाही. असलीच तर संवादाची आहे. नवा उपक्रम हा आपल्या धडपडीचा आरसा असतो. स्वतःच्या समोर असलेल्या विद्यार्थ्यांचा आर्थिक, सामाजिक, बौद्धिक दर्जा, त्याला मिळणारी शैक्षणिक साधनं, भोवतीचं सांस्कृतिक पर्यावरण ओळखून स्वतःच नवे प्रयोग शोधून काढायचे असतात. वर्गात केवळ मुलं शिकताहेत (म्हणजे ऐकताहेत किंवा सत्तर सालातल्या नोट्स उतरवून घेताहेत) आणि शिक्षक शिकवताहेत (म्हणजे- चौदा वर्षांचे पाठांतर उतरवून देताहेत) असं दृश्य न दिसता दोघेही शिकण्याच्या प्रक्रियेचे घटक आहेत, असं चित्र निर्माण होतं, तेव्हा तास संपण्याचा टोल दोघांनाही नको असतो. नाहीतर शिक्षक बेलची वाट पाहत आहेत. (कारण मजकूर आधीच संपला) आणि विद्यार्थी तर 'हे गृहस्थ आज रजेवर असते तर-' असं मनात पुटपुटताहेत, अशा 'जांभई'दार वातावरणात अध्यापन ही एक वैतागवाडी होते तर विद्यार्थीदशा ही नुसतीच 'दशा' होते.

केव्हातरी मिळालेलं सुवर्णपदक, बोर्डात मिळालेलं डिस्टिंक्शन, कलेक्टरसाहेबांनी संमेलनातल्या निवेदनाचं केलेलं कौतुक, प्राचार्यांनी अहवालात गुंफलेलं नाव, कुठल्यातरी सेमिनारमधल्या सहभागाबद्दल पेपरात आलेलं नाव याचं कौतुक तेवढ्यापुरतं ठीक आहे. पण काही शिक्षक वर्षानुवर्षं या कौतुकाचा गुलाबजाम खाण्यातच गुंग झालेले असतात. शिक्षकाच्या चेहऱ्यावरच कळतं, प्रवाह की डबकं? शिक्षकाची सुंदरता त्वचेची नसते, त्याचा आतला ध्यास, त्याचा समृद्ध व्यासंग, सूक्ष्म निरीक्षण, भरपूर प्रवास, ललितकलांशी त्याचा असलेला कायम संवादच शिक्षकाला 'सुंदर' ठेवतो. तो आतल्या व्यासंगसागराला वाचा फुटावी असा बोलू लागला की, तो आपोआप सुंदर दिसतो. तो आतला गाभाच नसेल, तर हा बाह्य डामडौल एका क्षणात फळ्यावर न उमटणाऱ्या तेलकट खडूसारखा तुटून पडेल.

शिक्षकांच्या सुट्ट्यांचा गहजब केला जातो. पण शिक्षकाची सुट्टी ही केवळ दिवसाची रिकामी जागा म्हणून नसतेच, तर वर्गात आल्यानंतरचे अध्यापन अधिक आशयघन व्हावे म्हणून असते. अरे हे नवं प्रायोगिक नाटक पाहिलंच नाही, वेळ नव्हता, आता पाहू या. साधनाताई आमटे यांचं 'समीधा' वाचलेलं नाही, सुट्टीत वाचू या, यासाठी शिक्षकाची सुट्टी असते. अशी सुट्टी म्हणजे खरं तर अधिक काम!

अंतर्मुख होणं ही नव्या इयत्तेची प्रवेशपरीक्षा आहे आणि मग पुढे फक्त आत्मानंदच आहे! यशातही आणि अपयशातही! कारण दोन्हीतही गती आहे! मला वाटतं, योगानं मिळालेल्या अध्यापन व्यवसायाचा 'भाग्ययोग' करणं हे फक्त स्वतःच्याच हातात आहे.

## ३३. इच्छेचं अंतर

भल्या मोठ्या पटांगणात १५-२० च डोकी. तीही मंदिरातील कट्ट्याऐवजी व्याख्यानमालेत फिरून येऊ, अशा उदासीनतेनं बसलेली. त्या श्रोत्यांमध्ये ज्यांना कळवळून आवाहन केलं होतं, अशा चार-पाचशे विद्यार्थ्यांपैकी दोन-चार तरी आहेत का, हे मी वेड्या आशेनं पाहत होतो. पण आशेचा एकही किरण नव्हता. शहरातल्या सांस्कृतिक कार्यक्रमात युवकांनी उपस्थित राहावं, व्यासंगी वक्त्याच्या विचारांनी आयुष्याला एखादा नवा पैलू पडतोय का ते पाहावं, या हेतूनं संयोजकांनी व्याख्यानमालेचा घाट घातला होता. बरं हेही सांगितलं होतं- व्याख्यान विनामूल्य आहे, कार्यक्रम आटोपून घरी जाण्यासाठीही सोयीची वेळ आहे. अडचण कुठलीच नव्हती. होतं- ते इच्छेचं अंतर.
ज्या पिढीनं लाभ घ्यावा, तीच पिढी दूर, तर मग ही यातायात कशाला, असं वाटून गेलं तर नवल नाही. विनामूल्य, पण अमूल्य अशा सहज उपलब्ध गोष्टींची जाणीवच अनेकांना नसते, हेच खरं. 'युवकांनी वाचन करायला हवं' हा विचार ऐकवणार कोणाला, तर पंच्याहत्तरीच्या युवकांना. आणि मग विशीच्या युवकांनी ऐकायचं केव्हा? समोरची अक्षरं दिसेनाशी झाली की?

विद्यार्थी म्हणतात, 'वाचनालयाची फी परवडत नाही. तुम्ही पुस्तकांची यादी देता, पण फी परवडत नाही म्हणून वाचणं जमत नाही.' त्यांना मुक्तद्वार संदर्भ ग्रंथालयाचे पत्ते देतो. 'माझं नाव सांगा,' असं सांगून ग्रंथपालांनाही दूरध्वनी करून सांगून ठेवतो. कसंच काय! इच्छेचं अंतर! चित्रपटाला ५० रुपयांचं ज्यांना तिकीट परवडतं, येता-जाताना रिक्षा, मध्यांतराला बटरस्कॉच आइस्क्रीम- हा खर्च करताना नोटा घसरगुंडीवरून सटकतात, पण वाचनालयाचे महिना १५-२० रुपये अवघड जातात. अडचण कुठली आहे? पैशाची की 'वाटतच नाही- नव्याचा शोध घ्यावा' या मरतुकड्या वृत्तीची!

ते दिवस सहज आठवतात. बेडेकर महाविद्यालयात शिकत असतानाचे! कॉलेज सुटल्यावर दुपारचे ४.३० केव्हा वाजताहेत असं होऊन जायचं. आवडती खुर्ची मिळावी म्हणून. जिथून येणारा-जाणारा दिसू नये, पुढे फक्त पुस्तकांचं कपाट- अशी ठाण्याच्या संदर्भग्रंथालयाची खुर्ची. एकदा बसून हव्या त्या पुस्तकांची यादी आणि अनुक्रमांक काढायचे. मग १५-२० दिवस यादीवर वाचल्याची टिक मार्क करण्यात धुंदीत जायचे. मित्रांबरोबर फिरायची वेळही रात्री ८.३० नंतर. खिशात पैसा नसायचा, पण वाचनालयाचा जिना उतरताना एक शब्दांपलीकडचं 'फीलिंग' यायचं. निराळ्याच आशयघन श्रीमंतीचं! वाटायचं- या गर्दीहून आपण वेगळे आहोत. सुमती देवस्थळींचं 'टॉलस्टॉय', 'स्वाइट्झर' वाचल्यावर मनगटात वेगळ्याच बिया फुरफुरल्या होत्या. कुठे, कधी पैशाची अडचण आलीच नाही. कारण प्रबळ इच्छा होती. दरवाजाची किल्ली घेऊन नियती त्या इच्छेतच उभी होती. काही माहीतही नव्हतं- लेखक होऊ, कवी होऊ, प्राध्यापक होऊ! अगदी स्वतःसाठी, आतल्या स्वतःसाठीचं ते वाचन होतं. हेतूंची पुटं त्यांना नव्हती. त्याचा पुढे उपयोग नक्कीच झाला. पण उपयोगासाठी ते नव्हतंच!

कारणांच्या ढाली पुढं करून कुणाचं काय जातं? समोरचा म्हणतो, 'ठीकाय!' पण गेलेलं असतं आपलंच! आपलं जाऊ नये म्हणून धावपळ करावी लागते. पण त्यासाठी कौटुंबिक कडबोळ्यापलीकडेही एक सुंदर जग आहे, हे बघण्याची ओढ हवी. रांधा-वाढा-उष्टी काढा सर्वांनाच आहे. सकाळी ७ ते रात्री ८. चक्र नोकरीचं कुणाला सुटलंय? पण हे एवढंच करण्यासाठीच जन्म आहे का, याचा शोध स्वतःच घ्यायचा अन् स्वतःच त्याचं उत्तर द्यायचं. समर्थनाचा शब्दछल कशाला? आपली कारणं, वर्षानुवर्षे तीच ती! त्या- त्या वेळची सगळी कारणंही अगदी प्रबळ. या कारणांची कुचेष्टा करण्याचं काहीच कारण नाही. पण त्यातली तीव्रता 'आपल्याला कुठं पोहोचायचंय' या निश्चयाने कमी-अधिक होऊ शकते. आपण फक्त सुरळीत जगण्याच्या घटनांना अग्रक्रम देतो. पण काही प्रसंग असे असतात की, ज्यामुळे जीवन सुंदर होतं. त्या घटनांपर्यंत आपण पोहोचू शकत नाही. यात नाइलाज किती आणि इच्छेचं अंतर किती? हा शोध ज्याचा त्यानं घ्यायचा असतो.

पुष्कळदा 'पैसा' आड येतो, हे मध्यमवर्गीयांचं लाडकं कारण आहे. पण पैसाही लागत नाही- अशाही काही गोष्टी असतातच की! शहरात पुस्तकांचं प्रदर्शन भरतं. लिहिलेलं असतं- मोफत प्रवेश! पण घेतलेला प्रवेश मोफत जाणार

नसतो. काही जण म्हणतात- पुस्तकं केवढी महागडी! इथं वांगी न् तोंडली नाही परवडत! पुस्तकं कोण घेणार? खरंही आहे ते ज्याच्या त्याच्या आर्थिक स्थितीनुसार! पण प्रदर्शनात पुस्तकं बघायला कुठं पैसे पडतात? आता या क्षणी पुस्तकं घ्यायला खिसा परवानगी नसेल देत, पण जेव्हा चार पैसे हातात खुळखुळतील तेव्हा पुस्तकं घेण्याची इच्छाच उरली नसेल तर! वेगवेगळी अनोळखी पुस्तकं बघणं, त्या पुस्तकांना हातात घेऊन ती चाळणं, त्यांच्या कोऱ्या पानांमधून येणारी मृद्‌गंधासारखी झुळुक अनुभवणं हाही एक महोत्सव आहे. गरजांचा क्रम उलटसुलट होऊ शकतो. नवा शर्ट फार तर नंतर घेऊ, पण अब्दुल कलामांचं 'अग्निपंख' वाचायलाच हवं. कोपऱ्या- कोपऱ्यावर जाहिराती ओरडत असतात- 'विनामूल्य प्रवेश.' पण विनामूल्यमधलं अमूल्य अनेकांना जाणवत नाही. अनुभवसमृद्धीचे समुद्र गावात प्रगटतात न् आपण अवगाहन केल्यावाचूनच नाहीसे होतात. काय कारण? पैसा? वेळ नाही? कारण एकच- 'ग्रंथोपजिविये' व्हायचा आतून हट्टच नाही! हा अंतर्यामीचा हट्ट नसेल, तर कोण काय करणार! कप्पाळ!

जरा कंटाळा आलाय! खिडकी उघडा जराशी- शेवग्याच्या फुलांचा बहर आलाय! गंध नाही त्याला! पण शुभ्र गुलाबी फुलांचे घोस... कुठं कर्णफुलासारख्या डुलणाऱ्या कोवळ्या शेंगा... सहज आतलं एकाकीपण रुणझुणतं करतील! जरा बाहेर या. सोसायटीच्या बाहेरच्या कट्ट्यावर बसा. बघा- मुलांची शाळेतून यायची वेळ झालीय. एकेक रिक्षा, शाळेच्या बस येऊन कंपाऊंडजवळ थबकू लागल्या. मुलं टणाटण उड्या मारीत घराकडे पळू लागली आहेत. त्या पळण्याला हसण्या-खिदळण्याचा झंकार आहे. त्या गोड खळ्या बघून आपणही आपल्या नकळत हसू लागतो. तितक्यात कुणी गोजिरवाणं जवळ येतं. 'हाय अंकल! हाय आन्टी! कशा आहात?' आपण म्हणतो, 'बराय्.'

'तू गं कशी?'

'मी अशीच, मज्जेत!'

बुलबुलाचं एक रंगीत पीस बागडत घरात जातं. एकाकीपण डहुळलं गेलं. साचलेली ऊर्जा खळखळती होऊन मोकळी वाहू लागली! घर आणि अंगण किती अंतर होतं? फक्त इच्छेचं अंतर! समोरच असतं, पण दिसत नाही. बालपणी जेव्हा रूढ अर्थानं 'काही कळत नाही या वयात' असं लोक म्हणतात, तेव्हा हे निसर्गच शिकवत असतो. शिकायला लागलो पुस्तकातलं, की निसर्ग आपलं शिकवणं आखडतं घेतो बहुधा! बालपणी वाटलं- पावसात भिजावं, भिजतो! उद्याच्या सर्दीची फिकीर नसते! वाळूचा किल्ला करावा, वाळूत गडबडा लोळावं, लोळतो. कुणी बघतंय- हे कवच नसतं. सहज घडत जातं. परिणामाची पर्वा नसल्यानं हे निरागसपण मोठेपणी अशक्य आहे, ते संकेतांना धरून नाही, हे माहीतेय! पण काही वेळा आपण या बाह्य प्रतिष्ठांचा जरा अतिच बाऊ करतो. मोकळं जगत नाही. मोकळं हसत नाही. सारखं भीत भीत कुढत वावरतो. हे कुढणं माणसाला आतून खचवतं. सुख-दुःखाच्या येरझारा सुरू असतातच. आपण सुखाच्या आगमनक्षणीही दुःखाचा आल्बम चाळत बसतो. घडलं ते घडलं. आता नवं चांगलं घडतंय ना! पुन्हा घरात कुठल्या वेगळ्या रूपानं नवं काही अंकुरतंय ना! मग करा ना त्या अंकुराचं स्वागत! लोक काय म्हणतील, म्हणून का हे रंग-गंध नाकारायचे? भोवतीच्यांना जरूर महत्त्व द्यावं. पण ते काही वेळा इतकं वाढतं, की आपण होतो कळसूत्री बाहुल्या! आणि आपले आसू-हासूचे सूत्रधार होतात ते सर्व! जरा मोकळं जगूया. 'विनामूल्य'मधलंही अमूल्य पाहू या! बहिणाबाई म्हणतात ना- दिवस न् रात्र यात फक्त एका पापणीचं अंतर आहे! तसंच आहे- मुक्तीचा श्वास सहज घेऊ शकतो. हवंय फक्त पार करणं ते इच्छेचं अंतर!

# ३४.        घरात मी वनवासी

एखाद्या काश्मिरी शालीला गोधडीचं ठिगळ लावावं, तशी त्या चकचकीत श्रीमंत फ्लॅटची ती बाल्कनी! कणाकणात संगमरवर उधळलेला. उंची सोफासेट्स. लोलकबाज झुंबरं. तरल लॅण्डस्केपस्.. सगळं काही. पण मखमली गालिच्यावरून चालताना बाभळीचा काटा रुतावा तसं मला झालं. त्या अमिरी घराला ही अशी बाल्कनी का? तिथं अनपेक्षित साहित्य- स्टोव्ह, दोन भांडी, तवा, पोळपाट.

तोंडानं दाबलेली अस्वस्थता, डोळ्यांतून उसळतेच. आत्तापर्यंतचं माझं- 'व्वा!' थांबून एक स्तब्धता निर्माण झालेली. ती जाणून डॉ. महेश म्हणाले, 'लपवण्यात अर्थ नाही. त्यामुळे तुमच्या मनातील संभ्रम वस्तुस्थितीला सोडून निष्कर्ष काढेल, म्हणूनच सांगतो. ही वडिलांची बाल्कनी. त्यांना या घरातलं काहीच पटत नाही. जेवणही नाही. स्वतःच हातानं करतात. सर्व प्रकारे कॉम्प्रमाईज केलं; पण आता अशक्य. आता घरानं पत्करून टाकलंय. वडील स्वतःच हातानं खिचडी करतात. त्या तिथं. आम्ही डायनिंग टेबलवर बसून चायनीज फ्राईड राईस खात असतो. खाववत नाही; गैरसमज करू नका. खिचडी आणि चायनीज हा भेद नाही. खिचडी त्यांना इथंही मिळेल, पण त्यांना मुळी या घरातलं काही नकोच. आत्ताच नाही- हा हट्टी, दुराग्रही स्वभाव गेली अनेक वर्षे मी पाहतोय. कळायला लागलं तेव्हापासून. आधी आईशी पटत नव्हतं. सतत भांडणं, अद्वातद्वा बोलणं. हाडं हाडं खाल्ली तिची. कंटाळून ती 'फ्रेम'मध्ये जाऊन बसली. आईनं प्रथेप्रमाणं सहन केलं. आता माझी डॉक्टर बायको करील का सहन?'

तेवढ्यात नोकराकडून चहा आला. जणू विषयाला आयताच परिच्छेद पडला. कमी ओळखीत जेवढी डागडुजी करायची असते, तेवढी करून स्नेहानं बोलावलेल्या त्या सुविद्य चाहत्याचा मी निरोप घेतला.

भरल्या घरात असा 'वनवास' पत्करण्याची त्याच्या वडिलांचीही काही कारणं असतील. त्यांच्या घराचे आर्थिक, सामाजिक, मानसिक असे काही धगधगते संदर्भही असतील. त्यामुळे केवळ चिरंजीवांच्या उसाशांनी एकदम त्या न पाहिलेल्या त्याच्या तीर्थरूपांबद्दल काही ठोकताळे बांधणं अन्यायकारकच होतं. त्यामुळे विशिष्ट उदाहरण सोडून द्या, पण घरात राहून घराचा आनंद न घेणारी अनेक मनं असतात, हेही खरं आहे.

आता बदललेल्या आर्थिक स्थितीचा धबधबा त्यांना पेलत नाही, मानवत नाही. नव्या पिढीची लाखाची आवक असते. त्यांना आपल्या आई-वडिलांना त्यांच्या मताप्रमाणं 'सुखी' ठेवायचं असतं. पण एक नवा पैसाही न जाता ते 'सुख' या बुजुर्गांना पटत नाही. 'गाडीची चैन कशाला? वाटलं, गरज पडलीच तर करता येते की रिक्षा!' हा दृष्टिकोन व्यावहारिक असेलही, पण तो दोन्ही घटकांचा आनंद कातरून टाकतो. पुष्कळदा आपल्या आई-वडिलांना, सासू-सासऱ्यांना पुष्कळ आनंदी पाहण्याचं, त्यांना पूर्वी जे मिळालं नाही ते वैभव, तो थाट उपभोगू देण्याचं अनेकांचं स्वप्न असतं. आपण हिंडतोच की नेहमी या बिलोरी देखण्या जगात; केव्हातरी आपल्या शिणलेल्या आईनं 'सेंटॉर' पाहावं, असं खूपजणांना वाटतं. गेलाबाजार गावातल्या वातानुकूलीत 'टॉप' हॉटेलात न्यावंसं वाटतं. पण तिथलं मेनूकार्ड पाहून उगीचच धास्तावलेल्या तिच्या मनाची तगमग पाहून मुलांचा आनंद शून्यावर येतो. 'एवढ्या खर्चात आमच्या वेळी वर्षभराचा तांदूळ घेता यायचा,' या वाक्याची तिथं गरज आहे का?

गरज नसताना, केवळ एकमेकांना आनंद देण्याच्या उत्साहापायी घरात खर्च होतो. काही वेळा थोडा अधिकही होतो. पण तो समजून घेऊन उपदेश करण्याचाही एक वेगळा क्षण असतो. त्या क्षणाच्या अति अलीकडे केलेला उपदेश 'किटकिट' या सदरात जमा होतो.

प्रत्येक घरात नव्या-जुन्या पिढीचे वेगवेगळे आनंदाचे विषय असतात. काही वेळा मनाचा एक कोपरा दुमडून एकमेकांच्या कौतुकात रमणं, हेही आनंद उमलता ठेवण्यासाठी आवश्यक असतं. पुराणकाळातल्या ऋषिमुनींनी आध्यात्मिक आनंदासाठी, चिंतनासाठी पत्करलेला वनवास हा कदाचित प्रगल्भ वाटचालीतील एक वानप्रस्थ असेलही; पण आज आधुनिक घरात वावरताना सतत दोन्ही पिढ्यांनी घरादाराचं अरण्य करण्याची गरज नाही. चारजणांची तोंडं चार दिशेला. ती उघडतात दोनदाच- एकदा खाताना, नंतर भांडताना. उपयोग काय त्या घराच्या डामडौलाचा?

आयुष्यातले नवे अंकुर, नवे बहर जुनं विसरून, शक्य तर क्षमाशील राहूनच जगायचे असतात. केवळ नवऱ्याचा सूड घ्यायचा म्हणून पासष्टीत घटस्फोट घेण्याचा विचार असणाऱ्या बाईंचा नुकताच परिचय झाला. त्यांचं दुःख खरंच होतं. आयुष्यभर नवऱ्यानं छळलं, सगळी सुखं ओरबाडून पोतेरं केलं. आता मुलं रांगेला लागल्यावर नवऱ्याला 'एकटेपण' कळावं, या एकाच उद्दिष्टानं ती स्त्री पेटून उठली आहे! आता सत्तरीत विकल झालेल्या त्या एकेकाळच्या मग्रुर नवऱ्याला ती धडा शिकवणार आहे. शिकवू दे बापडी! पण निष्कर्ष काय निघणार? आधी त्याच्या छळात ती दुःखी, आता सूडामुळे कष्ट! आयुष्य इतकं वारेमाप का असतं? त्याच्या महामूर्खपणामुळे हरवलेले क्षण गेलेच, आता मुलांच्या यशस्वी साक्षीनं उरलेलं आयुष्य तुलनेनं समाधानानं व्यतित करायचं सोडून सूडामुळे फुकट घालवायचं? हेही नशीबच का? आधी नव्हतं म्हणून शून्य आणि नंतर भोगता येत नाही म्हणून शून्य! शेवटी शून्यच!

करुणा हरवलेल्या ढोंगी समाजसेवकांचं घरातलं वावरणं साऱ्या घराला शिशिरवन करून टाकतं. समाजातली सारी घरं मिठ्ठास वाणीनं जुळवून देणारे कित्येकजण स्वतःच्या घरात मात्र एक-दोघांशी जुळवून घेऊ शकत नाहीत, तेव्हा नवल वाटतं! काही वेळा- तर वाटतं- हा आतला, ठायी ठायी दडलेला आनंद न कळल्यानंच ही मंडळी 'बाहेरची' सुखाची दुकानं शोधतात की काय? घरातले चिमुकले आनंद ज्यांना स्पर्शातून गोंजारून घेता येत नाहीत, इतरजण हसता-नाचताना पाहिले की यांचे जर वीस वर्षांपूर्वीचे पोटशूळ भडकत असतील तर बाहेरची कृष्णाष्टमी- घरात मुरली कशी वाजवेल? बोरकर म्हणतात ना, 'अमृतघट भरले तुझ्या घरी, का वणवण फिरशी बाजारी?' त्यांनी हे दांभिक बुद्धिवादी तरुणांना म्हटलंय. पण खरं तर ते प्रत्येक माणसाला लागू आहे. जे दांभिक, कर्मकांडी आध्यात्मिकांचं, तेच प्रसिद्ध कलावंत, लेखकांचं आणि फॅशनेबल समाजसेवकांचंही! उरात करुणेचा पाझर नसेल तर सारा देखावा व्यर्थ आहे! कुणाला चकवता आहात? उत्तर कदाचित् आरशातच मिळेल! मेकअप् केलेले विचारवंत घरात तोंड धुतल्यावर भेसूर दिसतात.

स्वभावांच्या अनंत त्रुटींचं संमेलन म्हणजे घर असतं! कुणीच परिपूर्ण नाही! कुणीही नाही. पण एकमेकाची अपूर्णता एकमेकांच्या प्रेमळ सोबतीनेच भरून काढायची असते. केवळ एकट्याच्या 'परिपूर्ण'तेला जगात सन्मान असेल, पारितोषिकांची मान्यता असेल, पण त्याला घरात मान नसेल, तर साऱ्या पुष्पगुच्छांचा घरात कचरा होतो.

घर म्हणजे सर्वांत टोकाची सुरक्षितता! जगाचे सर्व वादळवारे सावरून, मनाच्या अवयवांना घाटदार करणारी जणू आईची उबदार कूसच! ती तशीच हवी. ही आईच नसेल तर... तर काय? तर काहीही नाही!